

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
अं. क्र. ८६६
१२५८

REFBK-0009870

# राजा शिव छत्रपति

# राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे



मराठी ग्रंथ संग्रह, ठाणे.
अनुक्रम 26842 वि.
क्रमांक
REFBK-0009870

## भाग पांचवा : शाइस्तेखान आणि सुरत

चित्रकार श्री. दलाल
मुद्रण आनंद
प्रकाशन राजहंस

मूल्य रु. तीन फक्त सर्वाधिकार स्वाधीन

प्रकाशक : ब. मो. पुरंदरे, राजहंस प्रकाशन, १५०० सदाशिव, पुणें २.
मुद्रक : य. गो. जोशी, आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणें २.

मकर संक्रमण

१४ जानेवारी १९५८

प्रिय वाचक,

' राजा शिवछत्रपति ' या माझ्या सत्यकथनरूप शिवचरित्राचा हा पांचवा भाग. यांत मुख्यतः शाइस्तेखानाचा पराभव व सुरतेवरील छापा हीं प्रकरणें आलीं आहेत.

हा कालखंड इ. स. १६६० ते १६६४ या दरम्यान चार वर्षांचा आहे. या कालखंडापासूनच महाराजांचें संघर्ष-क्षेत्र दक्षिणेकडून उत्तरेकडे सरकलें असें म्हणावयास हरकत नाही. दक्षिण हतबल केली. आता गाठ खुद्द दिल्लीपतीशीं !

या माझ्या शिवचरित्राच्या एकूण स्वरूपाविषयी माझी भूमिका काय आहे तें मीं सविस्तरपणें पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत सांगितलेंच आहे. अधिक कांही नाही.

बहूत काय लिहिणें ? आमचें अगत्य असो द्यावें.

**ब. मो. पुरंदरे**

# अनुक्रमणिका


- किल्ले चाकण आणि पन्हाळगड ५
- कान्होजी जेधे आणि बांदल देशमुख १८
- कारतलबखान आणि रायबागन २४
- दाल्भ्येश्वर आणि राजापूर ४१
- संगमेश्वर आणि शृंगारपूर ५३
- नामदारखान आणि शाइस्तेखान ६४
- इंग्रजकैदी आणि महाराज ७४
- रायगड आणि लाल महाल ७८
- लाल महाल आणि किल्ले कोंढाणा ९५
- बर्हिजी नाईक आणि मोंगलांची सुरत १०५
- महाराजांचा हेजीब आणि इनायतखान ११८
- सुरत शहरांत आणि शहराच्या बाहेर १२४
- महाबतखान आणि जॉर्ज ऑक्झेंडन १४२



यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥

समकालीन अस्सल चित्र
चित्रकार : मीर मुहम्मद



किल्ले
राजगड

महाराजांच्या बैठकीची जागा—राजसदर.



बालेकिल्ल्याचा दरवाजा

## किल्ले चाकण
## आणि
## पन्हाळगड

विशाळगडावरून तोफांची सरबत्ती सुरू झाली आणि गजापूरच्या खिंडींत वज्राघात झाला! तोफांचा आवाज ऐकत असतांनाच बाजीप्रभु ठार झाले. सतत सहा तासपर्यंत अवघ्या तीनशेच मावळ्यांनिशी[१] सिद्दी मसूदच्या तीन हजार[२] फौजेशीं झुंजत होते ते. जखमांमुळे देहाची चाळण उडाली होती. अखेरच्या क्षणीं तोफांचे आवाज ऐकत ऐकत ते ठार झाले. स्वामीकार्यावरी खर्च जहाले!

महाराजांचा एक मोती काळाने गिळला. महाराजांस फार दुःख झालें- अत्यंत मोलाचीं माणसें इरेस घालावीं आणि मृत्यूने तीं अलगद उचलून न्यावीं असें सतत चाललें होतें. दौलतीचें हें नुकसान कोणत्या तागडीने तुळायचें?

बाजीप्रभूंचा संसार मोठा होता.[१] त्यांचा एक मुलगा बाबाजी प्रभु हा चांगला जाणता कर्तबगार होता. महाराजांनी त्याला सरनौबतीच्या जमेनिशीचा दरख सांगितला. बाजींच्या कुटुंबियांस महाराजांनी उघडें पडूं दिलें नाही. त्यांचें सांत्वन केलें.

पण महाराजांचें सांत्वन कोण करणार? मोठेपण पदरीं आलें की, दुःखहि फार करतां येत नाही. मुकाट्याने एकांतीं तो कडू घोट गिळावा लागतो. पण मन मात्र दुःखाने कण्हत असतें.

शिवाजी आपल्या हातून निसटला याचें दुःख सिद्दी जौहरला अतोनात झालें. पण आता उपाय काय होता? निदान आपण नेटाने झुंजून पन्हाळगड जिंकायचाच, असा निर्धार जौहरने केला आणि

शि....५...१

गडाचा वेढा सख्त केला. तलवार केव्हाच निसटून गेली होती; आता जौहर झुंजत होता रिकामें म्यान मिळविण्याकरिता !

आपल्या शिवाजीमहाराजांना जौहरने अचूक कोंडींत गाठलें होतें. पण तेथूनहि अखेर ते पळालेच; विशाळगडावर त्यांचा मुक्काम आहे, अशा बातम्या स्वराज्यांत गडागडांवर पोहोचल्या आणि आनंदाची अन् नव्या जोमाची फुंकर मराठ्यांच्या मनावर पडली. हीच बातमी अर्थात् राजगडावर जिजाबाई आईसाहेबानांहि समजली. त्यांना किती आनंद झाला असेल ?—तें फक्त मातृमनालाच नेमकें समजूं शकेल. शिवबाच्या भेटीसाठी त्या अहोरात्र तळमळत होत्या.[५]

महाराजांनाहि आईच्या भेटीची अतोनात ओढ होती. लहानग्या संभाजीराजाला व राजगडावर असलेल्या सर्वच कुटुंबियांना ते गेल्या संबंध वर्षांत आजिबात भेटले नव्हते. त्यांतच कितीतरी मोठमोठ्या घटना झाल्या. आणि त्यांतच संभाजीराजांच्या आई म्हणजे सईबाई राणीसाहेबहि मरण पावल्या ( दि. ५ सप्टें. १६५९ ). आता महाराजांचें मन राजगडाकडे ओढ घेत होतें. अतिशय दमलेल्या आपल्या सैन्याला विश्रांति मिळावी म्हणून विशाळगडावर कांही दिवस महाराजांनी मुक्काम केला.[६] नंतर एके दिवशीं महाराज राजगडावर जाण्यास निघाले.[७]

आपल्या एकुलत्या एक पुत्रावर आणि राज्यावर संकटांमागून संकटें येत होतीं. आईसाहेब स्वराज्याच्या रक्षणासाठी पदर बांधून अहोरात्र उभ्या तर होत्याच,[८] पण देवदेवतांची आराधना आणि व्रतवैकल्येंहि करीत होत्या.[९] वास्तविक शिवाजीराजाची आई होणें हेंच केवढें मोठें अवघड व्रत होतें.

महाराज राजगडावर आले. आईच्या भेटीसाठीं अतिशय अधीर झालेले महाराज त्वरेने आईसाहेबांस भेटावयास धावले. एक पावसाळा ओसरला होता. दुसरा पावसाळा एकदम गदगदून आला, आनंदाश्रूंचा.[७]

राजगडच्या नगारखान्यांत नगारे चौघडे झडूं लागले.[८] महाराजांनी आईसाहेबांच्या पावलांवर मस्तक ठेवलें. आईसाहेबांनी शिवबाला आसवांनी न्हाऊन काढलें. बरोबर एक वर्षानंतर मायलेकरांची भेट होत होती ही. अफजलवध आणि इतर अनेक दिग्विजय करून आणि मृत्यूच्या दाढेंतून सुटून शिवबा आलेला होता.

तो दिवस केवळ आईसाहेबांच्याच सान्निध्यांत महाराजांनी घालविला. एक वर्षाची तहानभूक दोघेहि तृप्त करून घेत होते. सबंध वर्षातल्या कितीतरी घटनांच्या हकीकती आईला शिवबाने सांगितल्या.[९] घडविलेला इतिहास प्रत्यक्ष महाराजांच्या मुखांतून त्यावेळीं ज्यांनी ज्यांनी ऐकला ते खरोखर धन्य होत. त्यांपैकी एखाद्याने जरी त्या सर्व हकीकती लिहून ठेविल्या असत्या तर काय बहार झाली असती !—तशा लिहून ठेविल्या आहेत की ! कवींद्र परमानंद नेवासकरांनी नाही का ठेविल्या लिहून ? त्यांचा ' शिवभारत ' ग्रंथ तर अमोल आहे. कदाचित कवींद्र परमानंद या प्रसंगीं असतीलहि हजर राजगडावर !

यावेळीं चाकणच्या किल्ल्याला शाइस्तेखान वेढा घालून बसलेला होता. चाकणचा किल्ला अगदी लहान, पण जबरदस्त चिवट होता. वेढा पडला ( दि. २१ जून १६६० ) आणि आठवड्यामागून आठवडे उलटूं लागले. पूर्वीच्या अनुभवांचे चटके खाल्लेले फाजलखान, रुस्तुमे-जमान, सादतखान वगैरे सरदार आपलीं पोळलेलीं बोटें फुंकीत फुंकीतच पन्हाळ्याचा वेढा चालवीत होते. पण तिकडे तो शाइस्तेखान अजूनपर्यंत महाराजांस कांहीहि किंमत देत नव्हता. तो म्हणत होता की, शिवाजी म्हणजे काय ? त्यासी जातांच कैद करतों. गड, कोट मुलुख घेऊन फत्ते करतों.[१०] त्या बंडखोराची काय किंमत ! बोटांच्या वाढलेल्या नखांएवढीच !

पण महाराज पन्हाळ्यांतून निसटल्याचा परिणाम शाइस्तेखानावर

थोडासा झालाच. त्याला धाक बसला.[७] खान सतत विचार करीत होता की, चाकण जिंकण्यासाठी काय करावें ? एक महिना उलटून गेला होता. अन् एके दिवशीं खानाच्या छावणींत एक युक्ति निघाली. तोफा, बंदुकांचा इलाज मराठ्यांपुढे चालत नाही असें पाहून, वेढ्यांतून म्हणजे छावणीपासूनच थेट किल्याच्या बुरुजापर्यंत, जमिनींतून एक भुयार पोखरीत न्यावयाचें आणि बुरुजाखाली सुरुंगाची दारू नेऊन भरायची असा विलक्षण गुप्त बेत शाइस्तेखानाच्या डेऱ्यांत शिजला.[११] लगेच गुप्तपणें कामाला सुरुवातहि झाली. या बेमालूम युक्तीची कल्पना किल्ल्यांतील मराठ्यांना अजिबात नव्हती. खानाचें हें गुप्त भुयार किल्ल्याच्या रोखाने पुढे पुढे सरकूं लागलें.[११] तो एवढासा लहान किल्ला अवघ्या तीन साडेतीनशे मराठ्यांनिशी जवळ जवळ एकवीस हजार मोंगलांशीं व त्यांच्या प्रचंड शेकडो तोफांशीं गेले पन्नास दिवस झुंजत होता. अजिबात डरला नव्हता. उलट, महाराज पन्हाळ्यांतून निसटल्या-मुळे तर त्याला अधिकच उधाण आलेलें होतें. पाऊस धो धो पडतच होता.

वेढ्याचा पंचावन्नावा दिवस ( दि. १४ ऑगष्ट १६६० ) उजाडला. किल्ल्याचा घातवार उजाडला. मोंगल सैन्य आपल्या छावणींत जय्यत तयार होऊन उभें राहिलें. चाकणचा किल्ला बेडरपणें उभा होता. असे कित्येक हल्ले किल्लेकऱ्यांनी आतापर्यंत पार उधळून लाविलेले होते.[११] आणि आजचा हल्लाहि उधळून लावण्याकरिता ते तयार होते.

शाइस्तेखानाने सुरुंगाची भयंकर स्फोटक दारू किल्ल्याच्या बुरुजाखाली खोदलेल्या गुप्त भुयारांतून नेऊन ठासण्याची व्यवस्था पार पाडली होती. सर्व गोष्टी अगदी चोख तयार झाल्या आणि खानाने हुकूम दिला की, सुरुंगाला बत्ती द्या ! लगेच डांबरबत्ती पेटली आणि सर सर सर वेगाने चेतत जाऊन सुरुंगाला भिडली. धडाडाडा करात

केवढा मोठा तो पूर्वेच्या कोपऱ्यांतील बुरुज महाप्रचंड आवाज करीत आस्मानांत उधळला गेला ! बुरुजावरच्या तोफा, माणसें, मोठमोठे दगड उंचच उंच उडाले.[११] आवाजाने कानठळ्या बसल्या. हवेंत उडालेलीं मराठी माणसें पाखरांसारखीं मरून पडलीं. किल्ल्याच्या काळजावरच जखम झाली. मराठ्यांना तर हें काय झालें आणि होत आहे हेंच समजेना. आवाज, धूर आणि किल्ल्याला पडलेलें खिंडार पाहून ते सुन्न बधीर झाले. हें काय झालें ? असें कसें झालें ?

किल्ल्याला खिंडार पडतांच हल्ल्यासाठी तयार असलेली मोंगल फौज एकदम किल्ल्यावर चालून आली. मराठ्यांनी तें दृश्य पाहिलें

चिवट मराठ्यांचा तिखट प्रतिकार.....



मात्र, आणि एका क्षणांत भानावर येऊन ते हल्ला अडविण्यासाठी खिंडाराकडे धावले. वास्तविक किल्ल्याला झालेली जखम, शत्रूचें राक्षसी दळ आणि किल्ल्यांतील चिमूटभरच फौज, असा कठीण सामना डोळ्यापुढे उभा राहिल्यावर कोणींहि हातपायच गाळले असते. आता कांहीहि केलें तरी किल्ला राखणें अशक्य आहे, असे हताश शब्द बोलून शरण जाण्यासारखीच परिस्थिति होती. परंतु किल्लेदाराने व मराठयांनी त्याहि स्थितींत किल्ला लढविण्यासाठी खिंडारावर ठाण दिलें. हत्यारें उपसून ते लढायला उभे राहिले. किल्ल्यावर भगवाझेंडा फडफडत होता. मोंगलांचा लोंढा गर्जत आक्रंदत किल्ल्यावर चालून आला. दोन्हीहि बाजूंनी आरडाओरडा होत होता. 'हरहर महादेव!' 'दीन्, दीन्, दीन्!' आणि भयंकर रणकंदन सुरू झालें. अगदी अरेतुरेची लढाई सुरू झाली. मोंगलांचा आवेश तरी केवढा भयंकर! जांबाझ इस्लाम सिपर्हाए हिफ्ज इलाहीरा पेशरू गिरफ्तह! सरदार शम्सुद्दीन-खानाने तर कमाल कमाल चालविली होती.[११] त्याच्या मदतीला अनेक सरदार होते. त्यांत राव भावसिंहाने पराक्रमाची शिकस्त चालविली होती.

मराठेहि कमी नव्हते. कोसळलेल्या बुरुजाच्या लगतच्या तटावरून त्यांनी दारूचे पेटते बाण, हुक्के, गोळे गनिमांवर सोडण्याचा आणि मोठमोठे धोंडे मोंगलांच्या डोक्यांत घालण्याचा बेसुमार धडाका लावला.[११] सबंध दिवसभर खिंडारावर लढाई चालू होती. मोंगलांचे हल्ल्यांवर हल्ले ताज्या दमाने येत होते. पण मराठे मात्र तेवढेच आणि तेच होते. अविश्रांत लढत होते. अपरंपार शत्रुसागराशीं अगस्तीच्या आत्म-विश्वासाने लढण्याचें धैर्य त्यांच्यांत आलें तरी कसें? कोणीं शिकविली ही चिवट चिकाटी? हें सर्व त्यांना शिकविलें राजा शिवाजीने! निष्ठा आणि महत्त्वाकांक्षा असल्याशिवाय राज्य आणि विद्या प्राप्त होत नसते.

अनुक्रमांक 28486.4 दि. 11/12/51

त्यासाठी ही अशी निष्ठा, अशी जिद्द, अशी महत्त्वाकांक्षा आणि असा अभिमान असावा लागतो. हेंच सामर्थ्य मराठ्यांचें होतें. महाराजांच्या तालमींत तें त्यांनी कमावलें होतें. क्वचित् एखाद-दुसऱ्या लढाईंत पराभव झाला तरीहि या मूळ सामर्थ्यामुळे त्यांच्या सर्वस्वाचा पराभव करणें शत्रूंना कधीहि शक्य झालें नसतें.

सबंध दिवस खिंडारावर मोंगल मराठ्यांची झुंज झाली. मराठे खूपच मेले. पण शत्रूंना मारीत मारीत मेले. मोंगलांचे एकूण दोनशे अड्डसष्ट लोक ठार व सहाशे लोक जखमी झाले.[११] रात्र झाली. कांहीहि दिसेनासें झालें. तरीहि मराठे खिंडारावर उभेच होते. मोंगलांनीहि कायमचा पाय मागे न घेतां जवळच ठाण मांडलें.[११] सबंध रात्र अशीच गेली.

दुसरा दिवस उजाडला ( दि. १५ ऑगस्ट १६६० ). मराठ्यांचे लोक फार पडले होते. मोंगलांच्यापुढे वास्तविक तासभरहि टिकाव धरण्याचें सामर्थ्य नसतांनाहि त्यांनी इतकी झुंज दिली ही गोष्ट आश्चर्याची होती. शाइस्तेखानाला महाराजांच्या मराठ्यांची ओळख पुरेपूर झाली ती चाकणच्या वेढ्यांतच.

मोंगली फौजेने खिंडारावर एकवटून हल्ला चढविला. मराठ्यांनी हा हल्ला माघारीं रेटायाचा जीव पणाला लावून शर्थीचा प्रयत्न केला. परंतु मोंगलांचा जोरा इतका भयंकर होता की, मराठे कटोन मेले. असंख्य जखमी झाले. मोंगल किल्ल्यांत घुसले. मराठ्यांनी तरीहि मागे सरकत सरकत बालेकिल्ल्यांतून झुंज मांडली. पण आता कठीण वेळ आली. सैन्यबळ आटलें होतें. बाहेरून मात्र हजारोंच्या झुंडी खिंडारांतून आंत घुसत होत्या. अखेर शाइस्तेखानाने राव भावसिंहाच्या मार्फत बालेकिल्ल्यांतील मराठ्यांना किल्ल्यांतून निघून जाण्यासाठी वाट मोकळी करण्याची सवलत दिली. किल्ला जवळ जवळ पूर्णपणें शत्रूच्या

ताब्यांत गेला होता. उरलेले मराठे अखेर राव भावसिंहाच्या मार्फत किल्ल्यांतून बाहेर पडले. छप्पन्न दिवसांच्या कडव्या प्रयत्नानंतर शाइस्तेखानाच्या पदरीं यश पडलें. मराठ्यांना, किल्ला सोडून जातांना किती दुःख झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी. अखेर चाकणचा किल्ला पडला ( दि. १५ ऑगस्ट १६६० ).

औरंगझेबाकडे या विजयाची बातमी गेली. तो खूष झाला. अगदी खरें सांगावयाचें म्हणजे चाकणचा विजय हा कांही विशेष नव्हता. एक गढी ती काय! सर्व सामर्थ्यानिशी शाइस्तेखान झुंजत असूनहि छप्पन्न दिवसपर्यंत तीनचारशे मराठ्यांनी टक्कर दिली, यांत इतिहासकार मराठ्यांचेंच कौतुक करतील. पण शाइस्तेखानाने आपल्या या विजयाचा एक फार्सी शिलालेख कोरून ठेवला.[१२] औरंगझेबाने चाकणचें नांव बदलून इस्लामाबाद असें नवें नांव त्याला दिलें.[११]

चाकण इतक्या संकटांत सापडलें असतांना महाराजांनी कांहीच कशी मदत पाठविली नाही? महाराजांना चाकणची व आंतील मराठ्यांची कठीण स्थिति माहीत होती. परंतु सर्व बाजूंनी मोंगली अंमल आणि लष्करी ठाणीं बसलेलीं असल्यामुळे आणि खुद्द चाकणला कमींत कमी वीस हजार फौजेचा विळखा पडलेला असल्यामुळे महाराज कांहीहि करूं शकले नाहीत. ती गोष्ट अशक्यच होती.

नेताजी पालकर या वेळीं काय करीत होता? तो स्वराज्याच्या पूर्व आघाडीवरील मोंगली ठाण्यांवर छापे घालीत होता. परंतु तोहि चाकणपर्यंत, म्हणजे जवळ जवळ वीस कोस मोंगली मुलखांत पोहोचूं शकला नाही. चाकण एकांगीं लढलें.

शाइस्तेखानाने चाकणचा किल्ला स्वतः हिंडून पाहिला आणि पावसाळा संपेपर्यंत तेथेच मुक्काम करण्याचें त्याने ठरविलें.[११] खानाचा मुक्काम तेथे आश्विनापर्यंत होता[१३] ( इ. १६६० सप्टेंबर अखेर ).

तिकडे पन्हाळगड अजूनहि सिद्दी जौहरशीं झुंजतच होता. महाराज पन्हाळ्यावरून निसटून गेल्याला दोन महिने होऊन गेले होते. किल्ल्यावर त्र्यंबक भास्कर इतक्या हिरिरीने विजापुरी फौजेशीं भांडत होते[१४] की, लढून किल्ला मिळण्याची जौहरला अजूनहि आशा निर्माण झालेली नव्हती.

पन्हाळ्यांतून शिवाजी पळून गेला ही बातमी विजापूरला बादशाह आदिलशाहाला समजली. बादशाहाच्या अंतःकरणांत केवळ जळफळाट उडाला. एवढा आटापिटा करून शिवाजी पन्हाळ्यांत कोंडून धरलेला असतांना तो पळाला तरी कसा ? एवढी फौज, पैसा, तोफा, साहित्य पुरासारखें पन्हाळ्यावर सोडलें, तें सर्व व्यर्थच गेलें. आता पुन्हा शिवाजी गवसण्याची आशाच नको ! बादशाह अतिशय अतिशय संतप्त झाला.[१५] तो संतापला सलाबतखान सिद्दी जौहरवरच ! वास्तविक त्या जौहराची किंचितहि कसूर नव्हती. त्याने अत्यंत प्रामाणिकपणें व जास्तींत जास्त दक्षतेने पन्हाळ्याचा वेढा चालविला. बिचाऱ्याचें दुर्दैवच बलवत्तर ठरलें. महाराजांनी शरणागतीची हुलकावणी दऊन व वादळ–पावसाचा फायदा घेऊन पलायन केलें, तरीहि जौहरने मसूदच्या मार्फत महाराजांना गाठून पकडण्याची शिकस्त केली. पण कमनशीब त्याचें व त्याच्या बादशाहाचें ! महाराज गवसले नाहीत.

परंतु बादशाह जौहरवरच संतापला व म्हणाला की, याच हरामखोर जौहरने शिवाजीकडून लाच खाल्ली असली पाहिजे ! शिवाजी पळणार हें ठाऊक असूनहि या दगाबाज जौहरने त्याच्याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष केलें असलें पाहिजे ![१५] —आणि शिवाजीशीं संगनमत करणाऱ्या जौहरचा व शिवाजीचाहि काटा काढण्याचें बादशाहाने ठरविलें. त्याने स्वतःच स्वारीची तयारी केली व पन्हाळ्याकडे जाण्यासाठी ससैन्य कूच केलें[१६] ( दि. १७ ऑगस्ट १६६० ). पांच महिन्यांपूर्वी

हाच बादशाह सिद्दी जौहरची भरदरबारांत स्तुति करीत होता. यानेच जौहरला 'सलावतखान' असा किताब दिला होता. आता मात्र तोच त्याला शिव्याशाप देत 'बेसलाबतखान' म्हणत होता.[१६] आणि स्वतः त्याचा नायनाट करण्यास निघाला होता. आणि अजूनहि ( म्हणजे ऑगस्ट व सप्टेंबर १६६० मध्यें ) तो प्रामाणिक जौहर पन्हाळा जिंकण्यासाठी धडपड करीत होता.

बादशाह अली आदिलशाह फौज घेऊन मिरजेपर्यंत येऊन पोहोचला. या सर्व बातम्या महाराजांस समजत होत्याच.

याच वेळीं त्यांनी अतिशय धूर्तपणाने असें ठरविलें की, पन्हाळगड किल्ला आपण होऊन जौहरच्या स्वाधीन करावयाचा. त्यांनी खास हेजीब पन्हाळगडावर त्र्यंबकपंतांकडे रवाना केला. त्यांनी पंतांना कळविलें की,[१७]

'........शाइस्तेखान या प्रांतीं आहे. तिकडे अद्याप सिद्दी जौहर आहे. दोहो प्रांतीं गनिमांशीं आपण कसें लढूं शकूं ? म्हणून पन्हाळगड आदिलशाहाच्या ( सिद्दी जौहरच्या ) स्वाधीन करोन, तुम्ही निघोन येणें. इकडे दुसरें काम उपस्थित झालें आहे.'

पन्हाळा खाली करून देण्याचा हुकूम घेऊन आल्यामुळे महाराजांच्या हेजिबास गडावर पोहोचण्यास आडकाठी झाली नाही. त्याने त्र्यंबकपंतास महाराजांचा हुकूम सादर केला.

त्र्यंबकपंतांची वास्तविक अशी ईर्ष्या होती की, पन्हाळा कधींहि शत्रूला मिळूं द्यावयाचा नाही.[१४] पण महाराजांचा हुकूमच आल्यावर बोलणेंच संपलें. त्र्यंबकपंत स्वतः पन्हाळ्याखाली जौहरला भेटण्यासाठी निघाले. ते गडाखाली आले आणि जौहरच्या शामियान्यांत दाखल झाले. जौहरने पंतांचें अतिशय मानाने आगतस्वागत केलें.[१९] पंतांनीहि त्याला खैर खैरियत पुसली. महाराजांशीं आता मात्र स्नेह जोडण्याची

सिद्दी जौहरची इच्छा होती. तो दिलदार हृदयाचा सलाबतखान सिद्दी जौहर आता महाराजांचें वैर विसरून स्नेह इच्छीत होता.[१९]

त्र्यंबकपंतांनी पन्हाळगडाचा कबजा जौहरला बिनशर्त दिला[१८] (दि. २२ सप्टें. १६६०). गडावरचा भगवाझेंडा उतरला. त्र्यंबकपंत मराठी लष्करासह पन्हाळा सोडून राजगडाकडे निघाले आणि लौकरच महाराजांपुढे हजर झाले. त्यांनी मस्तक लववून आदराने महाराजांस मुजरा केला.[२०]

बादशाहाने मिरजेहून आपला एक सरदार शाह अबुल हसन यास सिद्दी जौहरकडे रवाना केलें. यांत हेतु हा की, जौहरचे डोळे उघडवून त्याला बादशाही चाकरींत रुजूं करावें![२१] बादशाह असें पक्कें समजून चालला होता की, जौहर हा आपल्या विरुद्ध फितूर झालेला आहे बंडखोर झालेला आहे! काय म्हणावें या मूर्खपणाला? बारकाईने चौकशी न करतांच त्याने एका निष्ठावंत शूर सरदाराला हरामखोर ठरविलें!

शाह अबुल हसन जौहरकडे आला. त्याने जौहरला बादशाहाचें म्हणणें सांगितलें व असा राजद्रोह न करतां शाही कृपेचा उमेदवार होण्याचा सल्ला दिला. परंतु याचा परिणाम वेगळाच झाला. आपल्या-सारख्या एकनिष्ठेच्या, प्रामाणिक व कष्टाळू सरदाराला बादशाहाने अखेर हरामखोरच ठरविलेलें पाहून त्या मानी शूर पुरुषाचें मस्तक भडकलें आणि त्याने खरोखरच बादशाहाच्या ‘ कृपेची उमेदवारी ’ धुडकावून लावून थेट कर्नाटकचा मार्ग धरला.[२२] सिद्दी जौहर इतका एकदम चिडावयास आणखी प्रत्यक्ष कारण म्हणजे खुद्द बादशाहाने त्याला एक विक्षिप्तासारखें अपमानकारक पत्र लिहिलें. त्या पत्राचा हिंदवी तर्जुमा असा :[२३]

‘.......हे दुष्ट बुद्धीच्या सिद्दी जौहरा, तूं शिवाजीपासून पुष्कळ द्रव्याची लाच खाल्लीस व शिवाजी पन्हाळा किल्ल्यांतून पळून जाणार

हें माहीत असूनहि तूं त्याच्याकडे मुद्दाम कानाडोळा केलास. तूं शिवाजीला कोंडलें असतां तो निघून जाणें तुझ्या अनुकूलतेशिवाय दुष्कर होतें. म्हणून तूं माझ्याकडे ये आणि शिवाजीने तुला दिलेलें सर्व द्रव्य माझ्या स्वाधीन कर. नाही तर तुझा माझ्या हातून नाश होईल !'

केवढा गहजब हा ! आता मात्र जौहर खवळला. त्याने उघड उघड बंडच पुकारलें. संतापाने बेहोश होऊन, आपल्या छावणींतले आदिलशाही झेंडे ओढून काढून त्याने त्यांच्या चिंधड्या उडविल्या. आपल्या कष्टाची व सच्चेपणाची बादशाहाला कदर नाही याचा त्याला अत्यंत विषाद वाटला. शिवाजी आपल्या हातून निसटला ही आपली चूक झाली हें खरें आहे. परंतु दुर्दैवाने न कळत घडलेली चूक आणि मुद्दाम जाणून-बुजून केलेलें पाप एकाच मापाने मोजलें जावें व निमकहराम म्हणून आपली बदनामी व्हावी हें त्याला सहन होईना.

आदिलशाहाची इच्छा होती, शिवाजीचा प्रथम नायनाट करावा ! परंतु शिवाजी डोंगराडोंगरांतून पळतो; अशा पळपुट्यांना लपायलाहि हजार जागा असतात. असल्या पळपुट्यांचा पाठलाग करणें म्हणजे डोंगर पोखरून उंदीर मारण्यासारखें आहे, असा दूरदर्शीपणाने विचार करून बादशाहाने महाराजांच्या पाठलागाचा विचार सोडून दिला ![२३] बादशाह तसा मोठा हुशार !

सिद्दी जौहर मुद्गल, रायचूर, कर्नूळ भागांत परतला. परंतु बादशाहानेहि त्याचा ससेमिरा सोडला नाही. जौहरला अखेर कोणाचेंहि भक्कम पाठबळ न मिळाल्यामुळे त्याचा मोड झाला. शेवटीं बादशाहाने कांही तरी युक्तीने जौहरला मद्यांतून विष पाजवून ठार मारलें.[२४] या थोर सेनापतीची अशी दुर्दैवी अखेर झाली.

आदिलशाहींत आजपर्यंत प्रामाणिक व एकनिष्ठ माणसेंच बादशाहांकडून ठार झालीं. खवासखान, मुरार जगदेव, खान मुहम्मद,

फत्तेखान आणि असे किती तरी पुरुष बळी पडले. सिद्दी जौहर हा ताजा बळी.

जौहरच्याबरोबर कमींत कमी पस्तीस हजार फौज पन्हाळगडाकडे बादशाहाने रवाना केली. अफाट खर्च केला. शेवटीं एवढ्या मोहिमेंतून मिळालें काय?—फक्त पन्हाळगड! बाकी कांहीहि नाही!

* * *

**आधारः**—(१) शिभा २६।६७; एकलमी ३९. (२) पसासंले. ८३१; शिभा २७।२३. (३) H. G.—G. S. S. (४) एकलमी ४०. (५) शिभा २६।१२, १५ व १६. (६) शिभा २६।७८. (७) शिभा २७।४४ ते ५२. (८) शिभा २६।४ व ५. (९) शिभा २७।४६ व ४७. (१०) सभासदब. पृ. ३१. (११) शिचवृसं. ३ पृ. २४, २५ व ६७. (१२) हा शिलालेख प्रा. ग. ह. खरे, क्यूरेटर भा. इ. सं. मंडळ पुणें यांनी व मींहि चाकण येथे पाहिला होता. श्री. खरे यांनी तो वाचलाहि होता. परंतु १९५५ मध्यें श्री. खरे, श्री. का. रा. कापरे व मी चाकणला गेलों असतां तो मूळ जागेवरून गहाळ झाल्याचें दिसून आलें. (१३) जेधेशका. (१४) शिभा २८।६. (१५) शिभा २८।१५; शिचवृसं. २ पृ. ३७ व ६१. (१६) शिचवृसं. २ पृ. ३७ व ६१. (१७) शिभा २८।२ ते ४. (१८) शिभा २८।५ व ६; शिचवृसं. २ पृ. ३७. व ६१. (१९) शिभा २८।७. (२०) शिभा २८।८. (२१) शिचवृसं. २ पृ. ३७. (२२) शिचवृसं. २ पृ. ३७ ते ४३; ६१ व ६२; पसासंले ८४५. (२३) शिचवृसं. २ पृ. ६१. (२४) शिभा २८।२१ व २२.

# कान्होजी जेधे
# * * आणि * * * * * २ * *
# बांदल देशमुख



प्रतापगडच्या युद्धापूर्वी आणि युद्धांतहि कान्होजी जेध्यांनी अतिशय मोठी कामगिरी गाजविली होती. त्याकरिता महाराजांनी कान्होजींचा आणि सर्वांचाच भरघोस मानसन्मान केला होता. मोठमोठीं बक्षिसें व मानाचीं वस्त्रें दिलीं होतीं. कान्होजींना तलवारबहादुरीचें मानाचें पहिलें पान भरदरबारांत दिलें होतें. अज्ञानदासाच्या पोवाड्याचाहि थाट केला होता.

त्यानंतर पन्हाळ्याचा बिकट प्रसंग पार पडला. त्यांतील लोकांचाहि महाराजांनी उत्तम मान करण्याचें ठरविलें. गजापूरच्या खिंडींत बाजीप्रभूंनी आणि हिरडस मावळांतल्या मावळ्यांनी फार मोठी शर्थीची तलवार केली होती. या मावळ्यांचे पुढारी होते बांदल देशमुख. महाराजांच्या मनांत आलें की, तलवारीच्या मानाचें पहिलें पान बांदल देशमुखांस द्यावें. यांत हिरडोशीच्या सर्व मावळ्यांचा थोर मान होईल. पण कान्होजींना एकदा पहिलें पान दिलें असतां, यंदा बांदलांना दिलें तर कान्होजी काय म्हणतील, त्यांना राग येणार नाहीं ना, अशी शंका महाराजांना आली. म्हणून घडी साधून महाराज सहजपणें एके दिवशीं कान्होजीनाईक जेध्यांशीं पन्हाळगडाच्या झुंजाविषयी बोलतां बोलतां म्हणाले,[१]

“ नाईक, बाजीप्रभु देशपांडे पडिले ! बांदलांच्या लोकांनी युद्धाची शर्ती केली ! ”

“ ते लोक तैसेच आहेत ! ” कान्होजी नाईक मोकळ्या मनाच्या कौतुकाने म्हणाले.[१]

यावर महाराज लगेच म्हणाले,[१] “ अफजलखान मारिला ते समई

तरवारेचे पान अगोधर तुम्हास दिल्हे. ते बांदलांस अगोधर पान द्यावे, त्यावरी तुम्ही घ्यावे, ऐसी गोष्टी मान्य करणें ! ”

कान्होजीनाइकाचें मन खरोखर मोठें. कौतुकाचें आणि मानाचें पान बांदलांच्या हातीं जाण्यांत तलवारीचा मान आहे आणि राजाची मर्जी रजावंद आहे, हें जाणून खुषीने ते म्हणाले :[१]

“ अगत्य ! स्वामीस अगत्य याकरिता आम्ही गोष्ट मान्य केली ! या प्रमाणे चालवावे ! ”

महाराजांची मर्जी रजावंद झाली. महाराजांनी लोकांची सर्फराजी केली, त्यांत बांदलांच्या लोकांचीहि सर्फराजी केली आणि मानाचें पहिलें पान बांदल देशमुखांना दिलें.[१]

यानंतर कान्होजीनाईक महाराजांची परवानगी घेऊन रोहिड-खोऱ्यांत आंबवड्यास आले आणि कान्होजींना बरें वाटेनासें झालें. शरीर थकलें होतें. त्यांतच त्यांची प्रकृति बिघडली. महाराजांना ही बातमी समजली. कान्होजीनाइकांनी सारें ओळखलें की, हें लक्षण कांही ठीक दिसत नाही. आपली हयात आटत चालली. तशांत त्यांना आपल्या मुलांची काळजी वाटत होती. मुलें चांगलीं करतीं मनसुबेदार होतीं. पण त्यांचें आपसांत बनत नव्हतें. सहाजण भावंडें सख्खीं नव्हतीं. सावत्र होतीं. कान्होजींनी आपल्या धनदौलतीच्या वांटण्या आपल्या देखतच मुलांना करून दिल्या.[२] मुलांमध्यें बाजी ऊर्फ सर्जेराव हा सर्वांत थोरला होता.

कान्होजींनी आपल्या कोलमडत्या प्रकृतीची खबर महाराजस लिहिली व विनंती केली की, माझीं सहा मुलें आणि रोहिडखोऱ्याच्या देशमुखीचें वतन आपल्या पायावर ठेवलें आहे. आपण सांभाळ करावा.[१] हें त्यांचें लिहिणें निरवानिरवीचें होतें. महाराजांनी त्यांना उत्तर पाठविलें ( दि. २ सप्टें. इ. १६६०) तें असें,[३]...

'कान्होजी जेधे देशमुख प्रती राजेश्री शिवाजीराजे.............. दिसाचे व रात्रींचेहि तैसेच १५।२० वेग होतात लिहिले. तरी औसध घेऊन शरिरासी आरोग्य होई ते करणें. ईश्वराचे कृपेकरून बरेच होईल. तुम्ही लिहिले की आपले मूल ६ जन व देशमुखी साहेबाच्या पायापासी आहे. साभाल केला पाहिजे. तरी आता नवे लिहिणे काय लागेल? पहिलेच पासून तुम्हा आम्हांत घरोबा आहे. वेथा बरी जालियावरी मूल व स्वार पाठविणें. वेथा बरी होयं तोवरी आपल्याजवळ असो देणे. वेथा बरी होये ते करणे.'

परंतु कान्होजींची व्यथा कांही बरी झाली नाही. घटका भरली आणि त्यांनी डोळे मिटले (इ. स. १६६० अखेर). महाराजांच्या दौलतीचें मोठें नुकसान झालें. वडीलकीचें एक थोर छत्र गेलें. हा मार्ग अयत्नीच आहे. तेथे कोणाचें कांहीहि चालत नाही.

आश्विन उगवला ( सप्टें. १६६० ) आणि शाइस्तेखान चाकणहून पुण्यास आला. राजगडावर नवरात्र पार पडलें. दसरा आला. नव्या सीमोल्लंघनाचीं नवीं राजकारणें गडावर शिजूं लागलीं. महाराजांनी एक खडा टाकायचें ठरविलें. शाइस्तेखानाशीं तहाच्या वाटाघाटी करण्याचें ठरविलें. वाटाघाटी तरी कोणत्या मुद्द्यावर? जो खान सबंध शिवाजीलाच गिळून टाकावयास आलेला होता त्याच्याशीं वाटाघाटी? होय! महाराजांनी शाइस्तेखानाकडे आपल्या पदरचा अत्यंत वृद्ध व अतिशय हुशार मुत्सद्दी सोनो विश्वनाथ डबीर यांस रवाना केलें. परंतु वाटाघाटी काय झाल्या याची कांहीहि माहिती इतिहासास अद्यापहि समजलेली नाही. वाटाघाटी फारच 'गुप्त' झाल्या असाव्यात! परंतु त्यांतून कांहीहि निष्पन्न झालें नाही एवढें नक्की. सोनोपंत खानाचा निरोप घेऊन राजगडावर परत आले[४] ( ऑक्टो. १६६० ).

पावसाळा संपल्यावर शाइस्तेखानाने हालचालीस प्रारंभ केला.

आदिलशाहाच्या ताब्यांतील एक विख्यात प्रचंड किल्ला परिंडा हा वळकावण्यासाठी खानाने फासे फेकावयास सुरुवात केली आणि शिकार मिळाली ! खानाच्या छावणींतील एक शूर सरदार कारतलबखान उझबेग याने परिंड्याला शह दिला. किल्ल्यांत घालीब नांवाचा शूर विजापुरी सरदार किल्लेदार होता. त्याने सरळ मोंगलांची नोकरी पत्करली आणि परिंडा किल्ला कारतलबखानाच्या स्वाधीन केला ![५] हा प्रकार पाहून विजापूरच्या बादशाहाच्या पोटांत धस्स गोळा उभा राहिला. कारण याच बादशाहाने शिवाजी भोसल्याचा नायनाट करण्यासाठी औरंगझेबास अर्ज पाठवून ही मोंगल फौज दक्षिणेंत आणविली होती.[६] आपण निमंत्रण पाठवून आणलेला पाहुणा, आपल्यालाच गिळूं लागलेला पाहून, स्वतःच्या मुत्सद्देगिरीची लायकी त्याच्या चटकन् लक्षांत आली असेल !

महाराजांच्या मनांत एका गोष्टीची फार रुखरुख लागली होती. कुलदेवता श्रीतुळजाभवानीचें दर्शन वारंवार घडावें ही त्यांची इच्छा असे. परंतु तुळजापूर फार दूर पडे आणि राजकारणांच्या घाईगर्दींत तुळजापुरास जाणें घडूं शकत नसे. यावर काय उपाय करावा हा विचार ते करीत होते. आणि त्यांच्या मनांत एक फार चांगली कल्पना प्रकटली. प्रतापगडच्या युद्धप्रसंगीं अत्यंत दुष्प्राप्य असें यश श्रीभवानी जगदंबेनेच मिळवून दिलें; तेव्हा जगदंबेची अति प्रसन्न, अति देखणी, यथाशास्त्र मूर्त तयार करवून श्रीची स्थापना प्रतापगडावरच प्राकार, देवालय, सभामंडप, सिंहासन करून, समारंभें करून, होमहवनादि सर्वोपचारपूर्वक करावी असा संकल्प मानसीं महाराज राजश्रीसाहेबांनी केला.[७] श्री सिद्ध करावयास गंडकीची शिला उत्तम. म्हणून हिमालयाच्या प्रदेशीं नेपाळचे सलतनतींत, मंबाजी नाईक बिन गोमाजी नाईक पानसरे यांस महाराजांनी आज्ञा केली की, त्रिशूळ गंडकींतून उत्तम

शिळा शोध करून आणणें. तेणेप्रमाणे सर्व साहित्य अनकूळता करून देऊन नाईक मशारनिल्हेस हिंदुस्थानांत रवाना केलें.

महाराजांचें पदरीं एक एक कलम आणि एक एक हत्यार अप्रतिम दर्जेदार अन् मनसुबेबाज होतें. सर्वांठायीं समचित्त प्रीत राखून महाराज दौलतीचें हित करीत होते. मोरोपंत पिंगळे असेच थोर कलमबहादूर आणि समशेरबहादूर होते. हातीं घेतलेला मनसुबा तडीसच लावावा असा लौकिक मोरोपंडितांनी प्राप्त करून घेतला होता. पंतमजकुरांवर महाराज निहायत खूष होते. त्यांच्या खिदमती महाराजांचे मर्जीस मंजूर होऊन महाराजांनी पंतांस मजमूचा धंदा सांगितला. म्हणजेच पंतांना स्वराज्याची मुजुमदारी दिली. मोरो त्र्यंबक पिंगळे मुजुमदार झाले[४] ( दि. २ जानेवारी १६६१ ).

चाकण सर झाल्याचें समजल्यानंतर औरंगझेबास मोठा आनंद झाला व असा विश्वास त्याला वाटूं लागला की, अमीर उल् उमरा शाइस्तेखान मामा नक्की दख्खन सर करणार. मामांच्या दिमतीची फौज ( सुमारें एक ते सव्वा लाख ) अपुरी आहे असेंहि भाचेसाहेबांना वाटलें असावें. कारण त्यांनी माळव्यांत जाफरखानास हुकूम पाठविला की, आपली फौज घेऊन ताबडतोब अमीर उल् उमरा शाइस्तेखान नवाबांच्या दिमतीस जा.[८]

पाठोपाठ नव्या विजयाची खबर औरंगझेबास मिळाली. परिंड्याचा किल्ला कारतलबखान उझबेग याने रक्ताचा थेंबहि न पडूं देतां जिंकला अशी बातमी शाइस्तेखानाने पाठविली होती.[८] ही बातमी ऐकून तर बादशाह बेहद्द खूष झाला.

अजूनपर्यंत शाइस्तेखानानें महाराजांचा एकहि डोंगरी किल्ला जिंकला नव्हता. चाकणच्या चार भुईकोट भिंताडांनी त्याला दीड महिन्याच्यावर छळलें होतें. डोंगरी किल्ल्यापाशीं त्याची गत काय

झाली असती कोण जाणे! औरंगझेबाची फार इच्छा होती की, दख्खनची उगवती मराठेशाही चटकन् चिरडावी. तो शाइस्तेखानाला हुकूम सोडी की, मराठ्यांचा चुराडा उडवा. शाइस्तेखान आपल्या सरदारांना हुकूम सोडी की, मराठ्यांचा चुराडा उडवा. आणि ते सरदार आपल्या सैन्याला हुकूम सोडीत की, मराठ्यांचा चुराडा उडवा!

चुराडा! रिकामटेकडे हुकूम सोडायला यांना काय कष्ट होते? पण येथे मराठ्यांपुढे कसा हुरडा भाजून निघतो तें मोंगल शिपायांनाच ठाऊक होतें. सहज लोडाला टेकल्यां टेकल्या हलक्या हाताने बोटावर चुना घेऊन डाव्या तळहातावरच्या तंबाखूचा चुराडा करणें आणि मराठ्यांचा चुराडा करणें सारखेंच नव्हतें.

पावसाळा संपून गेलेला होता. महाराज नव्या राजकारणांचे नकाशे आखीत होते. आतापर्यंत ते वाट पाहात होते पावसाळा संपण्याचीच.

* * *

---

**आधारः**—(१) जेधे करिणा. (२) पसासंले. ८३०. (३) शिचसाखं. ५।७६९. (४) जेधेशका. (५) जेधेशका; शिभा २८।५४; औरंगनामा १। पृ. ५०. (६) शिभा २५।३२ व ३३; शिभा २७।५. (७) म. म. पोतदार गौरव पृ. ३०। ले. १; सभासदब. पृ. २३. (८) शिचत्रसं. ३। पृ. ६८.

# का र त ल ब खा न

## * * आ णि * * * * * * * ३ * *

# रा य बा ग न



शके १५८२ चा पावसाळा शाइस्तेखानाने चाकणलाच घालविला. कारण, मावळांत सैन्याच्या हालचाली करणें म्हणजे महा कठीण काम. मावळांतील पाऊस अति द्वाड. सरींवर सरी सरसरून बरसतात. डोंगरदऱ्यांतून सगळ्या मावळच्या वाटाघाटा पावसाळ्यांत जास्तच अवघड बनतात. तोफा, धान्यवैरणीच्या गाड्या आणि फौजेचें सर्व सामानसुमान कसें न्यायचें अन् आणायचें अशा अडचणींतून ? आणि त्यांत पुन्हा मावळमुलखांत जंगल दाट. पळस, साग, पिंपरी, हिरडा, बेहडा, बाभूळ, जांभूळ अन् वेळूची करकरणारीं बेटें फार दाट. गवत गळ्याला भिडतें. माणूस झाकून जातो. दिसत नाही, पलीकडे वाघरूं दडलेंय की रानडुक्कर पडलेंय तें. एकदा पाऊस सुरू झाला की, धो धो धो ! उडत्या पांखराच्या पिसांवर शेवाळें उगवावें. डोंगरावरून खळखळ पाणी सतत वाहातें. भातखाचरें आंबेमोहराने घमघमतात. सगळीकडे हिरवी हिरवीगार मखमल दिसते.

आमच्या मावळांतल्या नद्या अन् ओढे अति रगेल. तांबूस पाण्याने एकदा दुथडी भरून अंगाभवती भोवरे घेत घेत वाहूं लागले की, बिशाद काय कुणीं आंत पाय घालील ! कुणीं हटवादीपणाने टाकलाच पाय, तर खेचला गेलाच तो. पाण्याला अति अति ओढ. हत्ती नाही ठरायचा मग माणसाचें काय ! कातणीने करंजी कातरावी, तसे पाण्याच्या धारेने खडक कातरले जातात. सह्याद्रीवरून खळाळणारें पाणी वळसे घेत, गिरक्या मारीत, उड्या टाकीत ओढ्यांना सामील

होतें. हे मस्तवाल ओढे नद्यांना सामील होतात. नद्या त्यांची वाटच पाहात असतात. मावळच्या नद्या रुंदीला लहान. इथून तितक्या. पण भारी अवखळ. भोंडला खेळणाऱ्या परकऱ्या पोरीच जशा. आई रागवायची नाही. वडील बोलायचे नाहीत. उलट म्हणतील, जाऊं दे, बागडूं दे ! सह्याद्रि आणि जमीन या नद्यांना अन् ओढ्यांना उतारावर स्वैर सोडतात अन मग त्यांच्या स्वच्छंद अल्लडपणाला उधाण येतें.

हे ओढे म्हणजे सह्याद्रीवरच्या तांबूस मातींत अंग घुसळीत इतस्ततः हुदडणारीं मावळी इब्लीस पोरटींच जणू ! कधी सरळ डोंगर उतरणार नाहीत. ठोकरा देत देत डोंगरावरचे मोठमोठे ओबडधोबड धोंडे आपल्या-बरोबर खाली आणतील अन् मग त्यांना फराफरा खेचीत नद्यांकडे घेऊन जातील. त्या मोठ्या प्रवाहांत कोसावारी त्या धोंड्यांची फरफट चालते. या धिंगामस्तींत त्या धोंड्यांचे सारे काने-कोपरे घासून निघून त्यांचें अंग कसें अगदी तुकतुकीत बनतें. गोल बनतें. गोटे !

आणि मग आश्विन उलटला की, नद्यांचा अल्लडपणा कमी होतो. ओढ्यांच्या दांडगाईला वचक बसतो. साऱ्या नद्या संथ, मुग्ध अन् संयमी बनतात. लग्न झाल्यावर सासरीं निघालेल्या माहेरवाशिणीच जणू.

पावसाळा संपतो. गुडघा गुडघा साचणारा चिखल वाळतो. भातखाचरांत पावलांचे खचकन् लचके तोडून, तिरपे तिरपे नाचत नांग्या उभारणारे खेकडे बिळांत पळतात. भातें हळदीसारखीं पिकून काढायला येतात. वाटा रहदारीला त्यांतल्या त्यांत सोयीच्या बनतात. जनावरांना अन् माणसांना खायला-प्यायला मोप असतें.

हें सारें जसें मावळांत तसेंच खाली कोकणांत. कोकणपट्टी व मावळपट्टी जिंकायला खान उत्सुक झाला होता. फक्त पावसाळा संपायचा अवकाश. निसर्गाच्या या धिंगाण्यांत अन् भरपावसाळ्यांत शिरण्याची काय छाती होती खानाची ! मावळ-कोकणच्या नदी-

नाल्यांनी, डोंगरदऱ्यांनी, रानावनांनी अन् चिखल-शेवाळ्यांनी खानाला रडवलें असतें.

आणि महाराजहि पावसाळा संपायचीच राजगडावर वाट पाहात होते. पुण्यांत येऊन बसलेल्या या शाइस्तेखानाचें काय करावें या विचारांत महाराज होते. अनेक दावेदार महाराजांच्या मनांत सलत होते. जे जे उठले होते त्या सर्वांचा कांटा काढण्याचा बेत महाराजांच्या मनांत सतत घोळत होता. फक्त पाऊस थांबायची वाट होती. तो थांबला. दसरा झाला. नवरात्रपूजेंत ठेवलेली भवानी तलवार नव्या वर्षाचे बळी घेण्याच्या तयारीने म्यानांत वाट पाहूं लागली. दिवाळी संपली. चिखल पुरता वाळला. डोंगरमाळ तापूं लागले.

शाइस्तेखान चाकणहून पुण्यांत आला होता. आता तोहि नव्या मोहिमेचे मनसुबे मनाशीं ठरवीत होता.

खानाच्या फौजेवर नवी तुकतुकी चढली. पुण्यांत खानाच्या लष्करांत हशम ढालाइतांची नव्या मोहिमेसाठी तयारी सुरू झाली. लाल महालांत खल सुरू झाला. राजगड, तोरणा, सिंहगड, लोहगड हे डोंगरावरचे किल्ले घेण्यापूर्वी कोकणपट्टी प्रथम जिंकून घ्यावी असें खानाला वाटलें.[१] त्याला वाटलें हेंच फार सोयीचें! कोकण घेतलें की, शिवाजीचें आरमार आपोआप खलास होईल–बस् बस् कोकणच !

अगदी एकांतांत लाल महालांत खान जाऊन बसला आणि त्याने आपला प्रख्यात उझबेग सरदार कारतबलखान यास तश्रीफ फर्माविली.[२]

कारतलबखानास हुजूरहाजीर होण्याचा हुकूम होतांच ताबडतोब तो लाल महालांत खानाच्या एकांतींच्या खोलींत नमूद झाला. आपल्याला काय हुकूम होणार आहे हें जाणण्यास कारतलब फार उत्सुक झाला होता.

शाइस्तेखानापुढे कारतलब कुर्निसात करून उभा राहातांच खानाने

त्यास म्हटलें,[३]

" कारतलबखाँ, हम तुम्हारे कर्तब अच्छी तरह जानते है ! तुम्हारी शमशीर बे मिस्ल है ! और इसी लिये कोकनपर कब्जा करनेकी जिम्मादारी हम तुम्हारे हाथ सोप रहे हैं। चौल, कल्यान, भिवंडी, पनवेल और नागोठना यह सारे शिवाजीके मशहूर मुकामातपर तुम कावीज हो जाओ ! हमें पूरा भरोसा है के तुम फतह पाकर बादशाहकी खुषनूदी हासील करोगे ! तुम्हारे कर्तबकी कद्र की जायगी ! तुम्हारी इमदादके लिये बडे बडे सूरमा दीये जाएंगे ! " शाइस्तेखान खूष होऊन म्हणाला.[३]

कारतलबखानाने नम्रतादर्शक स्मित करीत मान लवविली. त्याला फारच उत्साह चढला. एक फार महत्त्वाची कामगिरी आपल्याला मिळाली याचा आनंद आणि अभिमानहि त्याला वाटल्याशिवाय राहिला नाही.

कारतलबखानास प्रोत्साहन देत देत शाइस्तेखान पुढे म्हणाला,[३]

" मित्रसेन, कछप, सर्जाराय गाढे, जादोराय, अमरसिंह, चौहान, जसवंतराव वगैरह सरदार तो तुम्हारी मदद करेंगेही। लेकिन शेरनी से भी बढकर कलेजा रखनेवाली रायबागन भी तुम्हारे साथ आयगी ! "

ठरली ! कारतलबखानाची कोकणावर नामजादी पक्की ठरली. ताबडतोब या मोहिमेची तयारी सुरू झाली.

कारतलबखानाच्या शौर्याबद्दल शंकाच नव्हती. त्याने आजपर्यंत अनेक मोहिमांत भाग घेतला होता. सारी हयात शिपाईगिरींत घालविली होती. त्याचा बापहि असाच शूर होता. खुद्द औरंगझेब स्वतः जेव्हा औरंगाबादेस सुभेदार होता, तेव्हापासून कारतलब दख्खनच्या मुलखांत वावरत होता. अजूनपर्यंत त्याने डोंगराळ मावळ अन् कोकण मुलखाचें मात्र तोंडसुद्धा पाहिलें नव्हतें ! पण नसलें पाहिलें म्हणून काय झालें ?

डोंगर डोंगर तरी असा काय अवघड असतो? चढत राहिलें की, आपोआप वर पोहोचतोच माणूस! कारतलब आता या मोहिमेच्या निमित्ताने प्रथमच डोंगराळ मुलखांत शिरणार होता.

कारतलबचें घराणें उझबेग रक्ताचें होतें. त्याने नुकताच परिंड्याचा प्रचंड किल्ला मोंगली अंमलाखाली आणला होता. कारतलबची आणि महाराजसाहेब शहाजीराजे यांची चांगली ओळख होती.[४] अमीर उल् उमराचीहि त्याच्यावर मेहेरबानीची मर्जी होती.

कारतलबखान मोहिमेच्या तयारीस लागला. शाइस्तेखानाने अमरसिंह, चौहान वगैरे सरदारांसह रायबागिणीचीहि योजना कारतलबच्या फौजेंत केली. ही नवी मोहीम ऐकून रायबागन कांहीच बोलली नाही! मुकाट्याने कारतलबबरोबर जाण्यास तयार झाली. सर्वत्र फौजफाटा, हत्ती, तोफा इत्यादींची तयारी झाली. खानाचा निरोप घेऊन कारतलब निघाला. फौज चिक्कार घेतली होती. नेमकी संख्या सांगतां येत नाही. पण तीस हजारांपर्यंत असावी.

कारतलबखान फौजफाट्यासह पुण्याहून निघाला. खानाने चिंचवड-तळेगाव–वडगाव मार्गाने कूच केलें. खान कोकणांत निघाला होता, पण कोणत्या मार्गाने कोकणांत उतरणार, वाटा कशा आहेत, आमदरफ्ती-खालच्या वाटा आहेत, की अगदीच अडाणी आडवाटा आहेत याची माहिती कारतलबखानाशिवाय व त्याचे कोण जे वाटाड्ये असतील त्यांच्याशिवाय कोणालाहि नव्हती.

—महाराज आपल्या सरदार–मुत्सद्द्यांसह राजगडावर बसले होते. राजकारणी मुद्द्यावर बोलणें चाललें होतें. गंभीरपणें महाराज म्हणाले,[५]

“ चाकणचा संग्रामदुर्ग तर हातचा गेलाच! चाकण परत घेणें कठीण आहे. पण असें वाटतें आहे की, किल्ल्यासह चाकण आता

जाऊन काबीज करावें! पण निकड असलेलें दुसरें काम आपण सर्वांनी हातीं घेऊन प्रयत्नांची तड लावली पाहिजे."

आणि मग उत्कृष्ट फौज जवळ बाळगणें किती जरूरीचें असतें,[६] अशी फौज ठेवावयास पैशाची केवढी जरूर असते,[७] पैसा हातीं असेल तर काय काय साधतां येतें,[७] वगैरे गोष्टी सांगतां सांगतां महाराज म्हणाले,[८]

"ज्याच्यावर जगाचे सारे व्यवहार अवलंबून असतात तो पैसा मी खंडण्या वसूल करून मिळवीन! आणि त्यानंतरच औरंगझेब बादशाहाच्या मामाचा चांगला सूड उगवीन!"

यावर बैठकींतल्या एका मुत्सद्दी कारभाऱ्याने महाराजांस सुचविलें की, मुलुखगिरीवर चलावें. शाइस्तेखान आता नक्की घाट ओलांडून खाली कोकणांत फौज पाठवील. म्हणून, तो कोकणांत फौजा उतरवूं शकणारच नाही असा आपण बंदोबस्त केला पाहिजे.[९]

महाराजांस त्याचें बोलणें मनोमन पटलें.[१०]

—कारतलबखान तळेगाव-वडगावावरून मळवलीकडे सरकला.

महाराजांचे बातमीदार हेर सर्वत्र बातम्या काढीत फिरतच होते. वास्तविक कारतलबने आपली ही मोहीम अगदी बिनबोभाट व जवळ जवळ गुप्त डाव मनांत वागवून वाटेवर ठेवली होती. पण अखेर ही बातमी महाराजांस समजली! खान आपले घाटमार्ग किती दिवस गुप्त अन् चोरून ठेवूं शकला असता? महाराजांचे हेर तिखट कानांचे होते.

कारतलबखानाने लोहगड किल्ल्याच्या दक्षिणोत्तर मार्गाने जाण्यास प्रारंभ केला.[११] तो अगदी निर्भय मनाने चालला होता. ती वाट अगदी उंच डोंगरांतून जाणारी व अत्यंत अरुंद—म्हणजे पाऊलवाटच होती. आपण जणू कांही बंदुकीच्या नळींतूनच चाललों आहोंत, असें खानाच्या

सैन्याला वाटलें.[१२] एवढ्या बिकट वाटेने जातांना सैन्य पावला-पावलाला कुंठित होत होतें. पुढे केवळ अफाट अरण्य व सर्व बाजूंनी सह्याद्रीची उंच उंच शिखरें दिसत होतीं. लोहगडच्या पलीकडून दक्षिणोत्तर जाणाऱ्या मार्गाने तुंगारण्यांत उतरावयाचें व तेथून सबंध सह्यादि चढून उंबरखिंडींतून खाली कोकणांत उतरावयाचें असा कारतलबचा बेत होता! हा मार्ग अत्यंत अडचणीचा, अतिशय दाट अरण्याचा, अतिशय अवघड डोंगरकड्यांचा, अगदी आडवळणी, अरुंद, निर्जन आणि महा भयाण होता! ह्या वाटेने कोकणांत एवढी मोठी फौज, हत्ती, सामान-सुमान, तोफा अन् उंट घेऊन उतरण्याचा कारतलबला कोणत्या (वेड्या) पिराने दृष्टांत दिला खुदा जाणे! ही वाट म्हणजे मरायची वाट!

या उंबरखिंडीखाली तुफान अरण्य होतें. आणि खुद्द या उंबरखिंडींतून जाणारी वाट इतकी अवघड व अरुंद होती की, एका वेळीं एकेकच माणूस पुढे जाऊं शकावा. कारतलबला ज्या अरण्यपंडिताने ही वाट सुचविली त्याची तारीफ काय अन् किती करावी? परमेश्वरा! किती रे कंजूष तूं? ह्या मोंगलांना थोडीशी अक्कल दिली असतीस तर तुझें काय गेलें असतें? की तूं देत होतास, पण 'जरूर नाही आम्हांला!' असें म्हणून हेच निघून गेले? तूंच जाणे खरें काय तें!

कारतलबखान रात्रीचे मात्र मुक्काम करी. दिवसां पुढे कूच करी. त्याने लोहगडापासून थोड्या दूर अंतरावर असलेल्या डोंगरांतल्या वाटेने तुंगारण्यांत उतरण्याकरिता फौज वळविली.

रायबागनला हें दिसत होतें. अरण्याला सुरुवात झाली. अतिशय दुष्कर वाट सुरू झाली. तेथून रीघ निघतां निघतां हाल होऊं लागले. पहिली चुणूक कारतलबला दिसूं लागली. कधी जन्मांत डोंगर न पाहिलेले हजारो हशम डोंगरांत शिरत होते.

मोठ्या यातायातीने खान ऐन मध्यावर आला. अजून उंबरखिंडी-करितां सबंध पर्वत चढावयाचाच होता. रायबागनला हें कांही धड लक्षण दिसेना! फौजेंतले लोक हैराण झाले. आपण तोल जाऊन पडणार असें प्रत्येकाला वाटत होतें.

—राजगडावर महाराजांनी नेताजीस खुणावलें. बाकीचे सौंगडीहि महाराजांची मान हलतांच उठले. निघण्याची तयारी सुरू झाली. महाराज स्वतःहि निघण्याच्या तयारीस लागले.

एक हजार मावळा राजसदरेपुढे तरवारी बांधून जय्यत तयार झाला. नव्या स्वारीची तयारी म्हणजे दसरा-दिवाळीसारखा आनंद. नेताजी, तान्हाजी, पिलाजी आणि खास महाराजहि निघाले. त्यांनीं राजगड सोडला.

कारतलबखान तुंगारण्यांत शिरण्यापूर्वींच महाराजांचीं भुतें तेथे जागोजागीं लपून बसलीं. वास्तविक लोहगड व विसापूर हे किल्ले स्वराज्यांतच होते. परंतु मोंगली फौज आपल्या शेजारून तुंगारण्यांत उतरत आहे हें उघड दिसत असूनसुद्धा त्या गडांवरच्या मराठ्यांनी किंवा आधीच तुंगारण्यांत येऊन बसलेल्या महाराजांच्या सैनिकांनी कारतलबला मुळींच आडकाठी केली नाही. त्याला सुखरूप येऊं दिलें. हें असें कां केलें? उत्तर अगदी स्पष्ट आहे. तुंगारण्याच्या भयंकर कोंडींत गाठूनच झोडपून काढणें उत्तम जमणार होतें म्हणून![१३] महाराजांनी नेताजीला कोंडी करण्याचाच हुकूम दिला होता.[१४]

खानाची फौज तहानेने हैराण झाली. पाणी मिळेना.[१५] उंबर-खिंडीच्या वाटेवर कसाबसा खान आला.

कारतलबने तशाहि स्थितींत पुढे कूच करण्याचा हुकूम दिला. दुसरें काय करणार? रायबागन एक अक्षरहि न बोलतां निमूटपणें सारें पाहात होती अन पुढे चालत होती.

फौज कशीबशी चालत अरण्याच्या ऐन गाभ्यांत आली अन् एकदम कर्कश्श शिंगें किंचाळलीं! नौबती वाजूं लागल्या. खानाची फौज अतिशय भयभीत होऊन इकडे तिकडे पाहतेय न पाहतेय तोंच झाडींत दडलेले, झाडावर दडलेले अन् सांदीसपाटीला दडलेले शेकडो मावळे तरवारी उपसून खानाच्या फौजेवर धावले! एका अंगाने तर खुद्द नेताजी पालकर उड्या टाकीत येत होता.

कारतलबखानाची जीभ आता मात्र कोरडी पडली. तो, रायबागन व आणखी कांही माणसें एका बाजूस होतीं. त्या अरण्यांत अफजल-वधाच्या वेळीं झालेल्या जावळीखोऱ्यांतल्या कत्तलीची दुसरी आवृत्ति होऊं लागली. लढाई पेटली. पण मोंगलांत जीवच उरला नव्हता लढायला. मावळे केंव्हापासून आधीच तेथे येऊन वाट पाहात बसले होते. ते ताजेतवाने होते.

कारतलबचा अमरसिंह नांवाचा सरदार मराठ्यांशीं लढण्याची शिकस्त करीत होता. त्याने फार धडपड चालविली. पण मराठी फौज फार जोरावर. त्यांनी मोंगली फौजेची इतकी भयंकर कत्तल मांडली की, आरडाओरड्याने त्या अरण्यांत दुसरें कांही ऐकूंच येईना. कारतलब अगदी घाबरून गेला. रायबागन अजूनहि निमूटच होती.

महाराज उंबरखिंडीच्या वाटेवर येऊन उभे राहिले. ते घोड्यावरच आरूढ होते. त्यांच्या भोवती कांही हत्यारबंद मावळे उभे होते. एका हातांत घोड्याचा लगाम अन् दुसऱ्या हाताची मूठ कमरेवर ठेवून महाराज भेदक नजरेने तो अरण्यांत चाललेला संग्राम पाहात होते.

कारतलबच्या फौजत जसवंतराव कोकाटे, गाढे वगैरे मराठी सरदारहि होते. ह्या सरदारांबरोबर मराठी सैन्यहि होतेंच. हे मराठे शिपाई मोठे डोकेबाज होते. महाराजांच्या लोकांनी तुफान तांडव मांडलेलें पाहिल्यावर अन् आपली धडगत नाही असें दिसल्यावर, हे

स्थळप्रत
क्रमांक 28848 दि. ...



मराठे शिपाई ओरडून मावळ्यांना सांगू लागले की, आम्ही तुमच्यांच-पैकी आहोंत! आम्ही महाराजांचेच शिपाई आहोंत![१६]

पळून जायला वाटहि नव्हती, वेळहि नव्हता अन् त्राणहि नव्हतें. ही लढाई एक कोसाच्या परिसरांत चालली होती.

कारतलबखानाकडे सारखे आघाडीकडून हशम धावत दौडत येत होते आणि पुढे काय भयंकर प्रकार चालले आहेत ते केविलवाण्या अन् घाबरलेल्या मुद्रेने सारखें येऊन सांगत होते. खानाची अवस्था विचित्र झाली होती. पुढेहि जातां येईना, मागेहि फिरतां येईना. तेवढ्यांत नवी खबर आली की, खुद्द शिवाजी आपल्या पिछाडीस खिंडीच्या वाटेवर येऊन उभा राहिला आहे!

खानाच्या शेजारींच रायबागन घोड्यावर स्वार होऊन उभी होती. आतापर्यंत ती एक अक्षरानेहि बोलली नव्हती. मोंगली फौजेची भयंकर दाणादाण ती पाहात होती. तिची खात्रीच झाली की, येथून निभणें कठीण आहे. पण खानाने मात्र लढण्याचा अजूनहि हट्ट धरला होता.

"बहादुरो! लढते रहो, लढते रहो!" खान ओरडत होता.[१७]

परंतु खानाचा सल्ला सैनिकांना पटत नव्हता! ते पळत होते. हताश दिङ्मूढ होऊन कित्येकजण उभेच राहिले होते. यश मिळण्याची आशा तर दूरच राहो, पण प्राण आणि अब्रूहि शिल्लक राहाण्याची आशा उरलेली नव्हती. मोंगल फौजेंत केवळ हाहाःकार उडाला होता. धीर पार सुटला होता.[१८]

आता मात्र रायबागनला गप्प बसवेना. ती कारतलबखानाला अगदी कडक व स्पष्ट शब्दांत म्हणाली,[१९]

"खानसाहेब, तुम्ही फार मोठी चूक केलीत की, शिवाजीसारख्या सिंहाच्या या अरण्यांत शिरलांत! एवढी मोठी बादशाही फौज तुम्हीं घमेंडखोरीने सिंहाच्या जबड्यांत आणून सोडली. केवढी दुःखाची गोष्ट!

आजपर्यंत बादशाह हजरत आलमगीर यांनी मिळविलेल्या यशावर तुम्हीं बोळा फिरविलात ! त्यांचें यश तुम्हीं अरण्यांत बुडविलेंत ! पाहा ! मागे, पुढे, चौफेर शत्रु किती जोरांत आहे ! हे तुमचे पटाईत तिरंदाज हशम तर दिङ्मूढ होऊन चित्रासारखे स्तब्ध झाले आहेत. मोठी खेदाची गोष्ट की, त्या मूर्ख शाइस्तेखानाने शत्रूच्या आगींत तुम्हाला सैन्यासह ढकललें. थोडी तरी फलप्राप्ति होणार असेल तरच पुरुषाच्या जातीने उद्योग हातीं घ्यावा. नाहीतर तेंच साहस उपहासास कारण होतें ! म्हणून मी सांगतें, खानसाहेब, तुम्ही अगदी तावडतोब शिवाजीस शरण जा ! आणि मृत्यूच्या तावडींतून सर्वांची सुटका करा ! ”


खानापुढे दुसरा कांहीहि उपायच उरला नव्हता. शरण किंवा मरण ! काय परवडतें यांतील ? ‘ कैद होऊन शिवाजीपुढे जाऊन पडण्यापेक्षा बिनशर्त शरण जाऊन शिवाजीकडे धर्मवाट मागा; शिवाजी थोर दिलदार आहे. तो मोठ्या उदार मनाने आपल्याला धर्मवाट देईल; आपण फौजेचे प्राण वांचवून येथून निघून जाऊं शकूं.’ असा स्पष्ट सल्ला त्या धीट रायबागनने त्याला दिला.

मोंगली फौजेची वाढती दाणादाण आणि मराठी फौजेचा वाढता धुमाकूळ खानाला दिसत होता. त्याला रायबागनचें म्हणणें निरुपायाने पटत होतें. पण शरणागतीचा अपमान मनाला झोंबत होता. अखेर साऱ्या इच्छा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, लाजलज्जा, मुकाट्याने झाकून ठेवून शरणागतीकरिता आपल्या व रायबागनच्या वतीने एक शहाणा माणूस वकील म्हणून पाठविण्याचें खानाने मोठ्या दुःखाने ठरविलें आणि मोठ्या विनवणीच्या शब्दांत आपलें म्हणणें त्याला सांगून त्याने व रायबागनने त्याची रवानगी महाराजांकडे केली. त्याच्याबरोबर आपले कांही हशमप्यादेहि दिले.

खानाचा वकील महाराजांकडे येण्यास झाडाझुडुपांतून वाट काढीत निघाला. लांबूनच त्याला घोड्यावर बसलेली महाराजांची अतिभव्य, अतिसुंदर अन् अतितेजस्वी मर्दानी मूर्ति दिसली.

महाराजांनीं अंगांत पोलादी चिलखत घातलें होतें व मस्तकावर पोलादी शिरस्त्राण घातलें होतें. मानेवर जाळीदार झालर रुळत होती. मनगटावर, छातीवर, पाठीवर व कमरेवर पोलादाच्या अत्यंत सुबक नक्षीच्या पोलादी पट्टया चिलखतांतच गुंफिलेल्या होत्या. पायांतल्या पांढऱ्या सुरवारीवर ते किंचित् अंजिरी झाक असलेलें चिलखत अन् शिरस्त्राण महाराजांस फारच शोभून दिसत होतें. त्यांनी कमरेवर पट्टेदार

*महाराजांचें एक आगळेंच दर्शन....*



तरवार लटकाविली होती. पाठीवर विशाल ढाल बांधली होती. कानांत मोत्यांचे चौकडे हलत होते. भव्य कपाळ, गरुडासारखें धवधवीत नाक, चढणीदार भिवया, अत्यंत पाणीदार डोळे, काळीभोर अन् अतिशय खुलून दिसणारी दाढी आणि मुखावर किंचित् स्मित— ![२१]

वकील त्या कांट्याकुट्यांतून डोंगराच्या अगदी सन्निध गेला आणि त्याने महाराजांच्या एका भालदारास सांगितलें की, मी खानेआझम कारतलबखान व रायबागनसाहेबा यांच्याकडून वकील म्हणून आलों आहें; तरी महाराजांनी माझ्याकडे मेहेरनजर वळवावी.[२२]

भालदारांनी महाराजांस वकील आल्याची वर्दी दिली.

महाराजांची नजर वकिलाकड गेली आणि त्यांनी वकिलास जवळ येण्यास खुणाविलें. वकील मुजरा करीत करीत नजीक आला. आपण, खानसाहेब कारतलबखान उझबेग यांजकडून आपणाकडे विनंती करावयासाठी आलों आहोंत, असें वकिलाने अतिशय अदबीने महाराजांस सांगितलें. तेव्हा भिवया किंचित् वर चढवून महाराजांनी त्याला आज्ञा केली की, खानाचें काय म्हणणें आहे तें सांगा.[२३] महाराज घोड्यावरूनच बोलत होते. हात पसरून वकील म्हणाला,[२४]

" आम्ही बदतमीजीने भलतीच हाव धरून महाराजांच्या मुलखांत हात घातला, याचें आम्हांला बहुत बहुत दुःख होतें आहे! खानसाहेब सख्त दिलगीर आहेत. बिनतक्रार शरण आहेत! महाराजांनी नजरइनायत फर्मावून आम्हांस जिवंत जाऊं द्यावें अशी खानसाहेबांची महाराजांच्या कदमीं बाआदब अर्जदास्त आहे! "

—हं! म्हणजे इतक्या उशिरा कारतलबखानाच्या डोक्यांत स्वतःची चूक शिरली!

वकील पुढे म्हणाला,[२५]

" सह्याद्रीच्या, या जणू कांही खोल पाताळासारख्या तळांत आम्ही

मनांत दीर्घकाळ स्तिमित झालों आहोंत व पराक्रमसुद्धा विसरलों आहोंत ! नागाच्या मस्तकावरचा मणी आणि महाराजांच्या हुकुमतीखालील दुर्ग सारखेच दुर्लभ आहेत, अजिंक्य आहेत. ते दुसऱ्याच्या कबजांत कधीहि जाणार नाहीत. महाराजांच्या अत्यंत बिकट मुलखाचा अंदाज आमच्या खानसाहेबांस न आल्यामुळेच हा गुन्हा त्यांच्या हातून घडला ! ”

—म्हणजे हा मुलुख बिकट नसता तर खानसाहेबांनी हा गुन्हा मोठ्या खुषीने आणि बिनबोभाट पार पाडला असता !

वकील पुढे आणखी म्हणाला,[२६]

“ महाराजांच्या तीर्थरूपसाहेबांचा—भाग्यशाली महाराजसाहेब शहाजीराजांचा आणि कारतलबखानसाहेबांचा कदीम जानी जिव्हाळा होता. ते खानसाहेबांवर अतिशय मोहोबत करीत असत. ”

—प्राणावर बेतलें तेव्हा हें जुनें नातें आठवलें !

वकील पुढे आर्जवाने म्हणाला,[२७]

“ नाही महाराज ! चूक झाली ! शाइस्तेखान नवाबसाहेबांच्या हुकमामुळे हें कमनशीब आमच्या वांट्यास आलें ! महाराज कृपा करा ! आम्हांला धर्मवाट द्या ! आमच्याकडून पुन्हा अशी नौदिगार सुरत दिसणार नाही. आमच्या जबानीचा इतबार जरूर धरावा ! आम्ही तावडतोब या अरण्यांतून निघून जातों. आम्हांला धर्मवाट द्या ! उपकार होतील ! आमच्या नजरा पुन्हा महाराजांच्या मुलखाकडे पापवासनेने वळणार नाहीत ! ”

—वकिलांनी इतकें खोटें बोलायचें असतें ? दुसऱ्याला खरें वाटेल इतपतच खोटें बोलावें माणसाने !

वकील अगदी दीनपणाने विनवीत म्हणाला,[२८]

“ काय सांगावें ! दोन तीन दिवस आम्हांला येथे पाणीसुद्धा

घ्यावयास मिळालें नाही हो! आम्हांला अभयदान देऊन जीवदान द्या!"

वकील आर्जव करीत होता. तुंगारण्यांत हलकल्लोळ उडाला होता. महाराजांनी मनाशीं विचार केला. खानाचा वकील आशाळभूत नजरेने पाहात होता. मनाशीं निर्णय करून व आपल्या शूर सैनिकांकडे पाहात पाहात महाराज म्हणाले,[२९]

"आम्हांला भिऊन दयेची याचना करणाऱ्या तुमच्या खानसाहेबांस जाऊन सांगा की, आम्हीं त्यांना अभयदान दिलें आहे! या प्रदेशांतून आपली फौज घेऊन त्यांनी निघून जावें!"

—अर्थात् खंडणी देऊनच![३२]

या अभयदानाची 'सुवार्ता' सांगण्यासाठी तो वकील लगेच लगबगीने कारतलबकडे निघाला.

पण आतापर्यंत खानाच्या फौजेची अक्षरशः दाणादाण उडाली होती. मराठ्यांनी लूटहि खूप जमा केली होती.[३०]

महाराजांनी लगेच आपल्या भोवती पसरलेल्या ढालाइतांस जंगलाच्या चहूं अंगांस धावत जाऊन ओरडून लढाई बंद करण्याचा हुकूम आपल्या सैन्यास कळविण्यास सांगितलें. ताबडतोब ते पांच–पन्नास ढालाईत मुजरे करून ताड् ताड् उड्या मारीत जंगलांत उतरले.[३१]

ढालाइतांनी जंगलांत विखुरलेल्या आपल्या सरदारांस व सैन्यास गनिमांशीं लढाई बंद करण्याचा महाराजांचा हुकूम झाल्याचें ओरडून ओरडून सांगितलें.[३१]

लढाई थांबली! खानाने सुस्कारा सोडला.

मराठ्यांनी लढाई थांबविल्याबरोबर मोंगल हशम भ्यालेल्या माणसांप्रमाणे भराभरा निघून गेले.

खानाचा वकील खानाकडे आला. खानाने त्याच्याबरोबर मोठी

थोरली खंडणी महाराजांकडे ताबडतोब रवाना केली.[३२] उंबरखिंडींत खानाचा अगदी दणकून पराभव झाला ( दि. २ फेब्रु. १६६१ ).

कारतलबखानाने बरोबर आणलेलें मौल्यवान् सामानसुमान व युद्ध-साहित्य तुंगारण्यांत जागच्या जागीं टाकून दिलें. खजिन्याने भरलेले पेटारे, हत्ती, घोडे, सोन्याचीं भांडीं, तसेच पेले, हंडे वगैरे सामान मराठ्यांच्या हातांत पडलें. खान आणि त्याचे सैनिक त्या भयप्रद अरण्यांतून निघून जाण्यास इतके उतावीळ झाले होते की, ओझें सांभाळावयास नको म्हणूनच त्यांनी या साहित्यावर पाणी सोडलें ![३३]

कारतलबने आपल्या सरदारांसह त्वरेने तुंगारण्य सोडलें. आणि पुन्हा पुण्याचा रस्ता पकडला. सपशेल पराभव ! सपाटून पराभव ![३४] कारतलबच्या सर्व महत्त्वाकांक्षा संपल्या. तो, रायबागन, मित्रसेन, अमरसिंह, जसवंतराव कोकाटे वगैरे सर्वजण स्मशानांतून परत फिरल्या-सारखे दुःखी चेहऱ्यांनीं चालले होते. वास्तविक स्मशानांतून शिरसलामत सुटल्याबद्दल त्यांनी आनंदच मानावयास हवा होता !

उंबरखिंडींत महाराजांच्या सैनिकांनी विजयाच्या आरोळ्या ठोकून दिशा कोंदून टाकल्या. शिंगेंकर्णे वाजूं लागले. अनेक भालदार नाचत पुढे आले. सैन्याने लुटींचे ढीग रचून ठेवले होते. महाराजांस या विजयामुळे फार समाधान झालें होतें. नेताजीने या युद्धांत फार पराक्रम गाजविला. नेताजीशी सल्लामसलत करून आता महाराज पुढच्या चढाईचा बेत ठरवीत होते.[३५]

बिचारा कारतलबखान खाली मान घालून पुण्याकडे निघाला होता.

उंबरखिंडीचें हें युद्ध महाराजांनी जिंकलें. पण त्यांना सर्वांत मोठी मदत सह्याद्रीने केली. महाराजांची फौज अगदीच कमी. त्यांच्यापुढे शत्रु अनेकपटीने मोठा असें असूनहि जय मात्र शिवाजीमहाराजांचा झाला. नेहमी असेंच होत होतें. याचें कारण महाराजांच्या मदतीला


सह्याद्रि सदैव महारुद्रासारखा उभा होता. पावनखिंडीनंतर गाजलेली ही दुसरी खिंड,—उंबरखिंड. लोहगड किल्ल्याच्या थेट पश्चिमेला सह्याद्रीच्या गच्च आवळलेल्या मुठींत आहे. सर्व बाजूंनी उंचच उंचच पहाड. दाटच दाट अरण्य. महाराजांनी आणि सह्याद्रीने खानाला खिंडींत गाठून, मुठींत पकडून झोडपलें. पण खानाला मात्र हा पराभव यशस्वी रीतीने पार पडल्याचेंच सुख लाभत होतें ! कारण समूळ कत्तल टळली होती !

* * *

---

**आधारः**—(१) शिभा २८।५७ ते ५९. (२) शिभा २८।५२. (३) शिभा २८।५३ ते ६३. (४) शिभा २९।३४. (५) शिभा २८।३० ते ४१. (६) शिभा २८।३४. (७) शिभा २८।३५ ते ३९. (८) शिभा २८।४० व ४१. (९) शिभा २८।४३ ते ५०. (१०) शिभा २८।५०. (११) शिभा २८।६५. (१२) शिभा २८।६६ ते ७०. (१३) शिभा २८।७२ ते ७६. (१४) शिभा २८।८९. (१५) शिभा २९।३१. (१६) शिभा २९।४८. (१७) शिभा २८।८७. (१८) शिभा २९।१ ते ३. (१९) शिभा २९।४ ते १२. (२०) शिभा २९।१४. (२१) शिभा २९।१५ ते २५. (२२) शिभा २९।२५. (२३) शिभा २९।२७. (२४) शिभा २९।३५ व ३६. (२५) शिभा २९।३२ व ३०. (२६) शिभा २९।३४. (२७) शिभा २९।२९, ३३ व ३५ ते ३७. (२८) शिभा २९।३१. (२९) शिभा २९।३८ ते ४०. (३०) शिभा २९।४४. (३१) शिभा २९।५० व ५१. (३२) शिभा २९।४२ व ४३. (३३) शिभा २९।५३ ते ६०. (३४) जेधेशका. (३५) शिभा २९।६४.

# दा ल्भ्ये श्व र
# * * आणि * * * * * * * ४ * *
# रा जा पू र



उंबरखिंडींत कारतलबखानाचा पराभव केल्यानंतर महाराजांनी तळकोकणावर झडप घालण्याचा बेत निश्चित केला. सरनौबत नेताजी पालकरास तुंगारण्यांतच ठेवण्याचा विचार त्यांनी केला. या भागांत तुंग, तिकोना, विसापूर, लोहगड हे किल्ले असल्यामुळे कदाचित् मोंगली फौज इकडे चालून येण्याचा संभव होता. म्हणून महाराजांनी नेताजीस आज्ञा केली की,[1]

" सरनौबत, आम्ही आदिलशाही मुलुख ताबीन करावयास जातों. परंतु तुम्ही मात्र येथेच थांबा. कारण मोंगल सिकस्त खाऊन माघारी गेले, ते आता परत इकडे फिरणारच नाहीत असें समजूं नका. मोंगल फार अभिमानी आहेत. मोंगलांच्या उपराळ्यासाठी तुम्ही ही सरहद्द सांभाळा ! "

पहाटेच्या वेळीं ( दि. २ फेब्रु. १६६० नंतर लगेच ) कूच करण्याची तयारी महाराजांनी केली आणि इषाऱ्याची नौबत सुरू करण्याचा हुकूम दिला.[2] आपल्या जातिवंत घोड्यावर स्वार होऊन महाराज निघाले. त्यांनी कोकणांत उतरण्याचा बेत केला होता. त्यांचा घोडा सह्याद्रीवरून कोकणांत उतरला. महाराजांच्या बरोबर तान्हाजी मालुसरे, पिलाजी नीलकंठराव सरनाईक, त्र्यंबक भास्कर वगैरे सरदार होते.

महाराज थेट दाभोळास आले. दाभोळास दाल्भ्येश्वर महादेवाचें फार प्राचीन मंदिर होतें. तळकोकणावर चालून जाण्यापूर्वी दाल्भ्येश्वराच्या दर्शनाकरिता महाराज दाभोळास आले होते. ते लगेच दर्शनासाठी गेले

व मोठ्या भक्तिभावाने त्यांनी दाल्म्येश्वराचें दर्शन घेतलें.[३] मंदिरांतील घंटा घणघणल्या.

या भागांत आदिलशाही अंमल होता. शिवाजी आला आहे हें समजल्यावर अनेक ठिकाणचे शाही ठाणेदार ठाणीं सोडून पळूनच गेले ![४] कित्येक ठाणीं जिंकून घ्यावीं लागलीं तीं महाराजांनी अगदीच सहजपणें जिंकून हा सबंध मुलुख स्वराज्यांत दाखल केला.[५]

महाराज दाभोळला आले आहेत हें समजल्यावर एका प्राण्याची फारच तारांबळ उडाली. त्याचें नांव जसवंतराव दळवी. त्याचें गाव पल्लीवन ( पालवणी किंवा पाली ). या गृहस्थाने पन्हाळ्याचा वेढा चालू होता, तेव्हा सिद्दी जौहरास फार मदत केली होती. विशाळगडाला याने व सूर्यराव सुर्व्यानें मोर्चे दिले होते व महाराजांना गडाखाली अडवून त्यांच्याशीं झुंज दिली होती. तो बादशाहाचा जहागीरदारच होता. शिवाजी आला हें समजतांच या शूर पुरुषाची भीतीने इतकी तारांबळ उडाली की, मरणच दिसूं लागलें त्याला. तो आपली जहागीर सोडून देऊन पळत सुटला. पण आता आसरा तरी कोणाचा घ्यायचा ? जसवंतरावाने शृंगारपूरच्या सूर्यराव सुर्व्याचा आसरा घेतला. अन् त्याने दिलाहि. जणू सूर्यराव हा महाराजांना पुरून उरणारा होता ![६] सूर्यराव महाराजांशीं लढण्याची तयारी करूं लागला. त्याचें हें वर्तन महाराजांना खरोखरच खेदाचें वाटलें. आपलें सर्वांचें स्वराज्य स्थापून तें प्रबळ करण्याऐवजी हे लोक त्याला विरोध करीत होते. तोहि स्वतंत्र विरोध नाही. बादशाहाचे नोकर म्हणवून घेऊन. महाराजांना म्हणून तर जास्तच चीड येत होती.[७]

महाराजांनी दाभोळच्या ठाण्यांत दोन हजार फौज व तिच्यावर एक शूर अधिकारी नेमून ठेविला आणि त्यांनी आपली ढाल चिपळूण-कडे वळविली. या भागांत महाराजांना प्रखर असा विरोध कुठेच होत

नव्हता आणि जो होणार होता तो फक्त सूर्यराव राजे सुर्वे यांचाच.

महाराजांनी चिपळूणहि झटकन् आपलें केलें. श्रीपरशुरामाची ही भूमि. वासिष्ठी नदीच्या आणि डोंगरांच्या सान्निध्यांत वसलेलें हें क्षेत्र व गाव फार रम्य. महाराज उत्सुक झाले होते श्रीपरशुरामाच्या दर्शनासाठी.[c]

महाराजांनी आपल्याबरोबर सर्व परिवार घेतला व ते श्रीच्या दर्शनास निघाले. श्रीपरशुरामाचें मंदिर नजीकच एका डोंगरावर होतें. तेथे निर्झर संतत वाहात होते. वृक्षलतांची दाट राजी होती.

महाराजांनी क्षेत्रस्थ सर्व ब्रह्मवृंदांस निमंत्रण पाठविलें. ती ब्राह्मण मंडळी मंदिरांत गोळा झाली. पूर्वी म्हणजे आतापर्यंत जंजिऱ्याचा सिद्दी त्यांना लुटायला, मारायला, बाटवायला येत असे. ते सदैव चिंताक्रांत असत. आज महाराजांनी आशीर्वाद देण्यासाठी त्यांना निमंत्रिलें.

वाद्यांच्या व वेदांच्या घोषांत महाराजांनी श्रीपरशुरामाची मोठ्या मनोभावाने षोडशोपचारपूर्वक पूजा केली.[c] श्रीपरशुराम व त्याच्या डाव्या उजव्या बाजूस काल आणि काम यांच्या मूर्ति समयांच्या प्रकाशांत फारच मोहक दिसत होत्या. पूर्वी दंडकारण्यांत आलेला असतांना, अयोध्येच्या राजा रामचंद्राने परशुरामाची पूजा केली होती. आज त्याच रामचंद्राच्या वंशांतल्या शिवरायाने त्याची तितक्याच भक्तिप्रेमाने पूजा केली. पूजेचा संकल्प व मंत्र वेदमूर्ति गोविंदभट बिन अनंतभट जोशी परशरामकर यांनी सांगितला. महाराजांनी त्यांची यथायोग्य संभावना केली. त्यांस पाऊणशे होनांचें वर्षासन दिलें आणि आपले तीर्थोपाध्यायपणाहि त्यांसच दिलें.[c]

पूजेनंतर महाराजांनी जमलेल्या सर्व वेदोनारायणांस ओंजळी ओंजळीने दक्षिणा दिली.[c] पूजेचा सोहाळा संपवून महाराज परतले.

सारी सृष्टि डोलत होती. कोकणचा हा रम्य प्रदेश स्वराज्यांत दाखल झाला. पूर्वेला उंच उंच डोंगर. पश्चिमेला आकाशाच्या कुशींत घुसलेला समुद्र. सारी भूमि झाडामाडांनी डवरलेली. उंडी, बकुळी, नागवेली, नारळी, पोफळी, आंबा, फणस, काजू यांची दाटी. मंदिरें, देवदेवता, तीर्थक्षेत्रें अन् वनोपवनें खूप. ह्या भागांत प्रामाणिक, कष्टाळू अन् निष्ठावंत मराठी मनें आणि मनगटें उमाप विखुरलेलीं. पण आजपर्यंत सत्ताधीशांच्या मुकाट लाथा खात, शेतीभाती लुटली तुडविली गेली की कपाळाला हात लावीत, अन् काटक्याकुटक्या व शेण्या वेचीत जगत होते विचारे! आता स्वराज्य आलें. सोनें, मोती, हिरे, माणकें मिळाल्यावर महाराजांस फारसा आनंद होत नसे. पण अशीं माणसें मिळालीं की, मग राजाचें मन कमळासारखें उमलायचें. अन् चांदी–सोनें आणि हिरे–मोती कशाला मिळवायचे? अशा निष्ठेच्या कर्तबगार स्वराज्य–सेवकांच्या अंगाखांद्यावर कंठे, गोफ अन् कडीतोडे घालण्या-करिताच ना?

या कोकणांत ब्राह्मणांची वस्तीहि खूपच होती. वर्णाने गोरे गोरे, बुद्धीने चलाख अन् स्वभावाने लाख. पण अतिशय व्यवहारी. बोलण्यांत फार गोड. बोलायला लागले की, अनुस्वार न् अनुस्वार मोजून घ्यावा! — चित्तपावन कोकणस्थ ब्राह्मण!

—नंतर महाराज संगमेश्वरावर चालून गेले. तेंहि स्थळ त्यांनी कबजांत आणलें. हें स्थळ फारच महत्त्वाचें होतें. करवीर प्रांताकडे जावयाच्या घाटवाटा संगमेश्वरास नजीक होत्या. शिवाय सूर्याजीराव शृंगारपूरकराच्या गस्तीवर राहाणें जरूर म्हणून हें ठाणें महत्त्वाचें होतें. महाराजांनी तान्हाजी मालुसऱ्यास संगमेश्वर येथे फौजेसह राहाण्यास सांगितलें. आणि ते स्वतः देवरुखास गेले.[१]

तान्हाजीच्या जोडीला लौकरच पिलाजी नीळकंठराव सरनाईक हाहि

संगमेश्वरांत येऊन दाखल झाला.[१०] हा पिलाजी म्हणजे पुरंदर किल्ल्याचे सरनाईक नीळकंठराव यांचा नातू. नीळकंठराव हा किताब होता सरनाइकांना. पुरंधर स्वराज्यांत दाखल झाल्यापासून पिलाजी महाराजांच्या निसबतींत होता. मोठा चांगला माणूस. जातीने ब्राह्मण. देशस्थ ऋग्वेदी. तेव्हा रंगरूपाचें वर्णन कांही करायला नकोच!–आणि त्याच्या जोडीला तान्हाजी मालुसरे. तान्हाजी म्हणजे तान्हाजी! दुसरें कसलें वर्णन सांगायचें त्याचें! अगदी लाल महालापासून महाराजांचा खेळगडी. दोघांनाहि मिशा उगवायच्या होत्या त्याच्या आधीपासूनचे मैतर. आणि आता तर तान्हाजीच्या मिशा त्याच्या ओठांवर मावत नव्हत्या! महाराजांच्या काळजांत तान्हाजी मावत नव्हता अन् तान्हाजीच्या काळजांत महाराज मावत नव्हते.

महाराज देवरूखला गेले. त्यांच्या मनांत फार येत होतें की, शृंगारपूरकर सूर्यराव सुर्व्याला स्वराज्याच्या कार्यांत गुंफावें. सुर्वेराजा फारच शूर होता. शिवाय मराठा माणूस. म्हणजे आपलाच. त्याने आपल्याला विरोध केला. लढला. पण तें झालें, गेलें, संपलें. तें विसरून आता त्याला आपलासा करावा, असा हेत मनीं धरून महाराजांनी त्याच्याकडे आपला एक वकील सांगावा देऊन पाठविला.[११]

वकील सुर्व्यांकडे आला. त्यानेहि वकिलाचा आदर केला. आता वैर टाकून द्या आणि माझें ऐका; माझ्या सांगण्याप्रमाणे वागण्यांतच कल्याण आहे, असें वकिलामार्फत महाराजांनी सुर्व्यास समजाविलें. वकिलाने महाराजांचा निरोपहि सुर्व्यास सांगितला. निरोप असा होता की, 'या देशाच्या रक्षणाकरिता संगमेश्वर येथे आम्हीं कांही फौज ठेवलेली आहे. आम्ही स्वतः दक्षिण कोकणांत जात आहोंत. आम्हीं येईपर्यंत तुम्हीं येथे चांगली देखरेख ठेवावी.'

आणि गम्मत अशी की, सूर्यरावाने महाराजांच्या शब्दाला मान

दिला! त्याने ओळखलें की, आपली दौलत जर टिकवायची असेल तर शिवाजीराजाचाच आश्रय घेतला पाहिजे.[१२] नाही तर बुडूं. त्याने वकिलाबरोबर महाराजांस विनंती पाठविली की, मी तुमचा क्रीतपुत्रच आहें![१२] माझा सांभाळ करावा. क्रीतपुत्र म्हणजे विकत घेतलेला गुलाम. दास. सर्वथैव सेवक.

सूर्यराव स्वराज्यांत सामील झाला. महाराजांस फार फार बरें वाटलें. सूर्यरावानेहि महाराजांच्या हुकमाप्रमाणे कामकाजें करण्यास प्रारंभ केला.[१३]

—आणि महाराजांची संतापलेली उग्र नजर राजापुरावर वळली. त्यांच्या डोक्यांत सारखे तोफांचे आवाज घुमत होते! इंग्रजांच्या तोफांचे आवाज हे! पन्हाळ्याला जौहरचा वेढा पडला होता, तेव्हा राजापूरच्या इंग्रज टोपीकरांनी, महाराजांस पूर्वी दिलेलें वचन मोडून, आपले गोलंदाज, एक तोफ व दारूगोळा पन्हाळ्याकडे जौहर-फाजलखानच्या मदतीस रवाना केला! इतकेंच नव्हे तर इंग्रजी झेंडा (युनियन जॅक) फडकावीत किल्ल्यावर तोफा धडकावल्या.[१४] महाराजांनी तें प्रत्यक्ष स्वतः गडावरून पाहिलें होतें. त्यांच्या तळ-पायाची आग मस्तकाला भिडली होती.

—त्या तोफांचे आवाज महाराजांच्या डोक्यांत घुमत होते! त्याचा सूड घेतल्याशिवाय महाराजांचें मन शांत होणें शक्य नव्हतें. महाराज चिडल्यानंतर त्यांना शांत करण्याचें सामर्थ्य कोणांतहि नव्हतें! क्रुद्ध शिव शैलेश्वर! संतापाचा वह्नि भडकला की, हिमालयहि घळघळा विरघळावा!

महाराज राजापुराकडे दौडत निघाले.[१५] त्यांच्या मागोमाग चार हजार मराठी भाले-तलवारी दौडत होत्या.[१६] राजापूर बंदर विजापूरकर बादशाहाच्या ताब्यांत होतें. महाराज अगदी अचानक राजापुरावर चार हजार मराठ्यांनिशी कड्यासारखे कोसळले. राजापूरच्या

शाही ठाणेदाराला, मोठमोठ्या सावकारांना किंवा प्रत्यक्ष इंग्रजांनाहि अजिबात कल्पना नव्हती. परंतु महाराज एकदम शहरांत घुसले नाही. शहराबाहेर थांबून त्यांनी, शहरांतील श्रीमंत व्यापारी मंडळीस बोलावून आणण्याकरिता आपले सैनिक पाठविले. सर्व बड्या बड्या धेंडांना ते सैनिक घेऊन आले. कोणासहि कैद मात्र केलें नाही (करावें लागलें नाही!) इंग्रजांस त्यांनी बोलावलें नव्हतें. कारण इंग्रज फार थोर माणसें! त्यांना कशाला गावाबाहेर येण्याची तसदी द्यायची! महाराज स्वतःच त्यांना भेटावयास जाणार होते नंतर! तलवार हातीं घेऊन! परंतु तरीहि हेन्री रीव्हिंग्टन, गीफर्ड वगैरे तीन

*बिचारे 'आलिप्त' व्यापारी......'विना'कारणच सापडले!*



चार इंग्रज महाराजांस भेटावयास स्वतः होऊन गेले.[१६] पन्हाळ्याचें पाप करूनच्या करून वर पुन्हा हा कोडगेपणा !

महाराजांचें व भेटावयास आलेल्या श्रीमंत मंडळींचें नेमकें काय काय बोलणें झालें तें इतिहासास अज्ञात आहे. पण नेहमीच्या रिवाजाप्रमाणे महाराजांनी खंडणीदाखल पैशाची मागणी केली ! हे व्यापारी खूप श्रीमंत होते. हिंदुस्थानच्या बाहेरचेहि व्यापारी त्यांत होते. इराण, मस्कत आणि अन्यान्य द्वीपनिवासी त्यांत होते.[१७] त्यांत पाठोपाठ हेन्री रीव्हिंग्टन वगैरे इंग्रज सत्पुरुषहि येऊन दाखल झाले. त्यांना पाहातांच महाराजांच्या मस्तकांत आग उसळली. महाराजांनी एकदम हुकूम सोडला की, या दगलबाजांना कैद करा ![१६] पन्हाळ्यावर डागलेल्या प्रचंड तोफेचा हादरा इंग्रजांना आत्ता बसला ! महाराजांनी आता मात्र तात्बडतोब आपल्या लष्करी तुकडीस हुकूम दिला की, झाडून साऱ्या टोपीकर इंग्रेजांना जेरबंद करून हुजूरदाखल करा ! त्यांची वखार लुटून फस्त करा ! कुदळी लावून सारी वखार खणून काढा ![१६]

महाराजांचे मराठे वखारीच्या रोखाने सुटले.

महाराजांसमोर उभी असलेली श्रीमंत व्यापारी मंडळी शिवाजी म्हणजे काय तें समजून चुकली ! महाराजांनी त्या सर्वांपाशी खंडणीची मागणी केली. व्यापाऱ्यांनी भराभरा खंडणीच्या रकमा कबूल केल्या व लगेच आणून हजर केल्या.[१७] इंग्रजांना मात्र साऱ्या पापांचा हिशेब द्यावा लागत होता.

नंतर महाराज राजापुरांत गेले. त्या अति श्रीमंत शहरांत अमूप धन श्रीमंतांच्या तळघरांतून कढयांत स्वस्थ पडून राहिलें होतें. स्वराज्याच्या अवाढव्य खर्चासाठी हा पैसा त्यांना हवा होता. तो कांही महाराजांना स्वतःच्या चैनीसाठी नको होता. ठरलेली खंडणीच फक्त ते मागून घेत. पण तीहि देण्यांत कुचराई करणारे लोभी लबाड श्रीमंत असतच.

सावकार, दलाल, जमीनदार लोकांची पिळवणूक करून पैसा काढीत असत. मात्र स्वराज्यनिर्मितीसारख्या महान् कार्यासाठी गोरगरीब मावळे महाराजांच्या शब्दासरशी स्वतःचे प्राणहि रणकुंडांत झुगारून देत. मग या धनवंतांनी धन नको का द्यायला? महाराज कांही त्यांचें सर्वच्या सर्व धन मागत नसत. 'साहुकार (म्हणजे श्रीमंत माणसें) हे तो राज्याचें भूषण' ही गोष्ट महाराज उत्तम जाणत होते. परंतु श्रीमंती हाच ज्यांना रोग जडला असेल आणि ज्या रोगामुळे गरिबांचे संसार वा स्वराज्याचीं कामें नाश पावत असतील तर या रोगावर हेंच औषध! हाच उपाय! महाराजांनी तोच अवलंबिला. लूट! जप्ती! महाराजांनी अशा लबाड अन् चुकार श्रीमंतांच्या घरांवर मग मात्र कुदळ घालून जप्ती करण्याचा हुकूम सोडला.[१७] हा अमक्या जातीचा म्हणून त्याला सवलत किंवा सुटका आणि तो तमक्या धर्माचा म्हणून त्याच्यावर दात किंवा सूड, असें पक्षपाती धोरण महाराजांचें कधीच नसे. राजापुरांत मूर, अरब, इराणी, मस्कती वगैरे परधर्मीय श्रीमंतांप्रमाणे स्वधर्मीय श्रीमंतांवरहि महाराजांची झडप पडली. अशा लोभी श्रीमंतांच्या घरांतून कढयाच्या कढया भरून आळसांत पडलेलें धन महाराजांच्या सैनिकांनी काढलें.[१७] अशा एकूण श्रीमंतांत परधर्मीय लोकांचा भरणा अधिक होता[१८] हें मात्र खरें. आणि इंग्रज–? इंग्रजांना तर मराठ्यांनी लुटून, धुवून, पुसून स्वच्छ केलें.[१६] त्यांच्या वखारींत कांहीहि शिल्लक ठेविलें नाही.[१७] कुदळींनी सगळी वखार खणून काढली. इंग्रजांचीं सगळीं माणसेंसुद्धा मराठ्यांनी आणलीं! हेन्री रीव्हिंग्टन तर आधीच कैद झाला होता. रॅण्डॉल्फ टेलर, रिचर्ड टेलर, गीफर्ड, फेरॉण्ड, रिचर्ड नेपियर आणि सॅम्युएल बर्नार्ड वगैरे इंग्रजांना मराठ्यांनी कैद केलें आणि महाराजांपुढे आणून हजर केलें. त्यांना आता बोलायला तोंड उरलें नव्हतें. आणि तोंड दाखवायला हिम्मत उरली नव्हती. सारा इंग्रजी मिजास उतरला

होती. इंग्रजांची चोवीस हजार होनांची म्हणजे सुमारें नव्वद हजार रुपयांची सम्पत्ति मराठ्यांनी लुटून आणली होती.[१९] शिवाय ही बेमुदत कैद नशिबीं आली होती. अगदी योग्य बक्षिशी मिळत होती ही त्यांना. दुसऱ्याच्या देशांत येऊन नसते चाळे करायची त्यांना जन्मखोडच होती.

राजापुरांत महाराजांनी लूट केली ती गबरांची, गरिबांची नव्हे. राजापूर स्वराज्यांत दाखल झालें. महाराज राजापुरांत आले तेव्हा गबर लोकांना वाटलें की, लोखंडाचा उकळलेला रसच लोटला. पण त्रस्त व उपेक्षित गरीब लोकांस वाटलें की, राजापूरची गंगाच अचानक प्रकट झाली ( दि. १५ मार्चच्या सुमारास, इ. १६६१ ).

महाराजांनी हुकूम दिला की, इंग्रज कैद्यांपैकीं निम्मे कैदी महाड जवळच्या सोनगडावर व निम्मे वासोटागडावर रवाना करा.

राजापूरच्या लुटींत सोन्यानाण्याशिवाय आणखी काय काय लूट केली, त्याची यादी पाहाण्यासारखी आहे. हे पाहा त्यांतील जिन्नसः— रुपें, पितळ, शिसें, तांबें, लोखंड, कथील, काच, सुवर्णमाक्षिक, मोती, हिरे इत्यादि रत्नें; गेंड्यांचीं शिंगें, हस्तिदंत, कस्तुरी, केशर वगैरे अनेक सुगंधी द्रव्यें; वेलदोडा, लवंगा वगैरे मसाल्याचे पदार्थ; अक्रोड, मनुका वगैरे सुकामेव्याचे पदार्थ; सुपारी, हळद, हिरडा, मेठा, मोरचूद, निळा व काळा सूरमा, हिंग, गुग्गुळ, शेंदूर, पारा, गंधक, निरनिराळ्या प्रकारचीं विषें व तीं उतरविण्याचीं औषधें; कितीतरी प्रकारचीं किंमतवान् वस्त्रें—अन् कितीतरी पदार्थ ! फार मोठी यादी आहे ही ! यांत गांजा आणि अफूसुद्धा आहे ![२०] या सर्व वस्तु व्यापाऱ्यांशिवाय दुसऱ्या कोठून मिळणार? एकूण लबाड व्यापाऱ्यांचा सर्व माल एकदमच खपला म्हणायचा ! महाराजांनी हा माल घोड्यांवर, बैलांवर व कावडींत भरून निरनिराळ्या किल्ल्यांवर रवाना केला.[२०] बरखळ

सम्पत्ति स्वराज्याच्या भांडारांत जमा झाली. राजापुरांत महाराजांना एक अत्यंत मौल्यवान्—नव्हे बिनमोलाचा हिरा सापडला. त्या हिऱ्याचें नांव बाळाजी आवजी चित्रे. या तरुणाची कहाणी अति हृदयद्रावक होती. याच्या वडिलांना जंजिऱ्याच्या सिद्दीनें पोत्यांत घालून समुद्रांत बुडविलें. घरदार लुटलें. बायको व तीन पोरें जप्त केलीं आणि दूर दूर परदेशांत नेऊन, गुलाम म्हणून विकून टाकण्याचा हुकूम सोडला. केवळ ईश्वरी कृपेमुळे ती बाई व तिचीं तीं तीन मुलें राजापुरांतच विकलीं गेलीं. आणि त्यांना विकत घेतलें प्रत्यक्ष त्या बाईच्या भावानेच! त्या भावाचें नांव होतें विसाजी शंकर तुंगारे. बाईचें नांव होतें रखमाबाई ऊर्फ गुलबाई आणि मुलांचीं नांवें होतीं बाळाजी, शामजी आणि चिमणाजी. आता मुलें मोठीं झालीं होतीं. बाळाजी आवजीचें हस्ताक्षर फार सुंदर होतें. महाराजांनी बाळाजीला अचूक पारखलें आणि उचललें.[२१]

महाराजांनी राजापूरच्या आसपासचा अनेक गावें व ठाणीं असलेला मुलुख जिंकला. शेठवली, सौंदळ, हरचेरी, नेवरें, नाधवडें, कोतवडें, केळवली, करशेळी, पावस, धामणसें, बेलवडें, खारेपाटण हीं त्यांपैकीं प्रमुख स्थळें होतीं.[२२]

महाराजांनी कोकणांतील आदिलशाही सत्ता निपटून काढण्याचा धडाका लावला. विजापुरांत रोज कांहींना कांही तरी बातमी येऊन धडकत होती. गलोलींतून जोरांत सुटलेला खडा डोक्यावर लागावा तशा या एकेक बातम्या बादशाहाला 'लागत' होत्या. बहमनी-कालापासून सतत साडेतीनशे वर्षे डांबून धरलेला महाराष्ट्र त्याच्या हातांतून निसटत होता. राज्य कमी कमी होत चाललें होतें. त्याला समजेना की, ही वजाबाकी थांबायची तरी केव्हा? बडी साहेबीण तर वैतागूनच गेली. अफजलखानाच्या स्वारीपासून तिने महाराजांचा


नाश करण्याचा आटोकाट प्रयत्न करूंन पाहिला. परंतु हा डोंगरांतला उंदीर सापडेच ना! पिंजरे लावले. पण उंदीर मोठा बिलंदर. पिंजऱ्यांत ठेवलेला मिठाईचा गोळा, पिंजऱ्यांत शिरून, फस्त करून, सहीसलामत पसार होत होता तो! बडी बेगम आणि बादशाह एक हात पिंजऱ्यावर ठेवून आणि एक हात कपाळाला लावून बसले होते! बिचारी हताश झाली आणि निघाली मक्केला जायला![२३] बिल्ली चली हाज! बिल्ली चली हाज! उंदीर सापडत नाही म्हणून.

* * *

---

**आधारः**—(१) शिभा २९।६० ते ६३. (२) शिभा २९।६४ ते ६६. (३) शिभा २९।६७. (४) शिभा २९।६६. (५) शिभा २९।६८. (६) शिभा २९।६९ व ७०. (७) शिभा २९।७२. (८) शिभा २९।७५ ते ७८. (९) शिभा २९।७९ व ८०. (१०) शिभा २९।८२. (११) शिभा २९।८३ ते ८५. (१२) शिभा ३१।२९ ते ३३. (१३) शिभा ३१।३४. (१४) पसासंले ८१२ (पृ. १८८), ८१३, ८१५, ८७४; शिचत्रृसं. २। पृ. ६१. (१५) शिभा २९।८९. (१६) पसासंले ८५२ व ८७५. (१७) पसासंले. ८५२; शिभा ३०।१ ते ४. (१८) शिभा ३०।५ ते १०. (१९) पसासंले. ९१८. (२०) शिभा ३०।११ ते २३. (२१) चिटणिसांचा बाका; कायस्थ प्रइसा. (२२) शिभा ३०।२४ व २५. (२३) शिचत्रृसं. २।पृ. ३८ व ८७; पसासंले. ८४५ व ८५२.

# संगमेश्वर
# आणि ५
# श्रृंगारपूर



बड्या साहेबिणीने प्रथम वेंगुर्ला बंदरांतील वलंदेज कुंपनीच्या वखारीस कळविलें की, आम्हाला विजापूर सोडून मक्केला जायचें आहे, तरी आमच्यासाठी एक गलबत तयार ठेवावें. परंतु वलंदेजांच्या जनरल रोठेस नांवाच्या हपिसराने तिला चक्क नकार कळविला.[१] नंतर ती अन्य व्यवस्थेने मक्केच्या यात्रेस निघाली. बादशाह अलि आदिलशाह स्वतः तिला निरोप द्यावयास विजापुरापासून तिकोट्यापर्यंत गेला. बाईच्या बरोबर इब्राहीमखानास देण्यांत आलें होतें. बाई विजापुराहून निघाल्या त्या दिवशीं तारीख होती, चंद्र २ जमादिलावल सुहूर १०६१. ( दि. २५ डिसें. १६६० ).

महाराजांनी कोकणांत मांडलेली शरारत विजापुरांत बादशाहास समजली. नेहमीप्रमाणे तो खूप खवळला. त्याने लगेच श्रृंगारपूरकर सूर्यरावराजे सुर्वे यास एक खरमरीत पत्र लिहिलें. पत्रांतील मजकुराचा हिंदवी तर्जुमा असा.[२]

" ....तो आमचा उघड शत्रु ( शिवाजी भोसला ) राजापुरावर चालून जात असतां, त्यास त्या अत्यंत दुर्गम अरण्यमार्गांत तूं अडविलें नाहीस? बरें झालें तें झालें! आता तो उन्मत्त शत्रु ( राजापुराहून ) परतून जवळ आला आहे; तरी तूं त्यास कोंड..... "

आदिलशाहाने वरीलप्रमाणे हुकूम सूर्यरावास पाठविला. शिवाजी भोसल्याला अडविणें अन् पराभूत करणें हें अति अवघड काम आहे हें बादशाहाला पटलेलें होतें. या कामासाठी तूर्त तरी दुसरा कोणीहि सरदार त्याला गवसत नव्हता.[३]

हा शाही हुकूम सूर्यरावास मिळाला. आणि बादशाही शब्दांची मात्रा लागूं पडली. एकच महिन्यापूर्वी ज्या सूर्यरावाने महाराजांची बाजू घेतली होती आणि त्यांच्या हुकमाप्रमाणे वागावयास आरंभहि केला होता, त्या सूर्यरावाचें मन एकदम फिरलें ! त्याने महाराजांशीं झुंजण्याची तयारी सुरू केली ![४] जन्मजात गुलामगिरीची ही जादू. स्वराज्याची निरोगी हवा त्यालाहि मानवली नाही.

. राजापुरास जाण्यापूर्वी महाराजांनी संगमेश्वर येथे तान्हाजी मालुसरे आणि पिलाजी नीळकंठराव सरनाईक यांस ठेविलें होतें. आणि त्यांना एक मोलाची कामगिरीहि महाराजांनी सांगितली होती. कोकणी मुलखांतील वाटा-रस्ते कधी धड नसत. भयंकर पावसाने आणखीच खराब होत ते. संगमेश्वराच्या आसमंत भागांतील रस्तेहि वाहतुकीस व प्रवाशांस यातना देणारे होते. महाराजांनी ठरविलें की, हे रस्ते दुरुस्त झाले पाहिजेत. म्हणून त्यांनी तान्हाजीला व त्याच्या बरोबरच्या सैन्याला, हे रस्ते दुरुस्त करण्याचें काम सांगितलें.[५] एवढा मोठा शूर तान्हाजी आणि त्याचें सैन्य, पण, त्यांना महाराजांनी काम काय सांगितलें, तर म्हणे खोरीं फावडीं घेऊन रस्ते दुरुस्त करा ! पण खरेंच सांगा, रस्ते दुरुस्त करणें हें काय कमी महत्त्वाचें किंवा कमीपणाचें काम आहे काय ? स्वराज्यासाठी जेव्हा भांडाभांडी करायची असेल तेव्हा तलवारीच हातीं घेतल्या पाहिजेत. पण स्वराज्यासाठी जेव्हा मांडामांडी करण्याची नितांत आवश्यकता असेल तेव्हा हातांत खोरीं, फावडीं, नांगर, यंत्रें, ग्रंथ, लेखणी, हातोडा इत्यादि साधनेंच घेतलीं पाहिजेत. स्वराज्य हें सर्व विद्या, सर्व कला, सर्व विज्ञान, सर्व शस्त्रें व सर्व अस्त्रें यांनी संपन्न असलेंच पाहिजे. केलेंच पाहिजे. ज्या स्वराज्यांतील तरुण हीं विधायक कर्तव्यें विसरतात किंवा लक्षांत येऊनहि तिकडे दुर्लक्ष करितात, तीं स्वराज्यें सदैव मृत्यूच्या सरहद्दीवर उभीं आहेत म्हणून समजावें !

स्थळप्रत
24848 दि. ५५
क्रमांक नों: दि: २-२-



महाराजांचीं वर्षे, महिने, आठवडे, दिवस आणि तास शत्रूशीं युद्ध करण्यांतच खर्च होत होते. पण त्या धावदौडींतच जे क्षण आणि जीं निमिषें महाराजांना लाभत होतीं त्यांतच ते शेती, रस्ते, उद्योगधंदे, धरणें, पाटबंधारे, विद्या, व्यापार इत्यादींकडे लक्ष देत होते. त्यांना फारच थोडा वेळ व संधी मिळत होती. पण तीहि त्यांनी वाया दवडली नाही, यांतच त्यांचें धोरण आणि अंतःकरण व्यक्त होतें.

तान्हाजी, पिलाजी आणि त्यांचें सैन्य संगमेश्वरास असा तळ देऊन होतें. एवढ्यांत एका काळ्या मध्यरात्रीं अकस्मात् मराठी फौजेवर सूर्याजी-रावाने फौजेसह येऊन झडप घातली ![5] मराठी लष्करांत गडबड उडाली. पण सारे सावध होते. एकदम सारे हत्यारें घेऊन उठले. तान्हाजीने ढाल–तलवार घेऊन आपली तुकडी सूर्याजीरावाच्या ऐन तोंडावर आणली. पिलाजीहि फौज बाहेर काढून शत्रूशीं झुंजूं लागला. जबरदस्त लढाई पेटली. रात्रीची वेळ. सूर्याजीराव भलताच लढाऊ होता. तान्हाजीच पुढे होता म्हणून त्याच्यापुढे सूर्याजीरावाचें कांही चालेना. तान्हाजीने सूर्याजीरावाचा हल्ला मागे मागे हटवीत नेला.

दुसऱ्या बाजूस पिलाजी लढत होता. त्यानेहि खूप जोराचा प्रतिकार चालविला होता. पण त्याच्यावर शत्रूचा जोर वाढत होता. सैन्यहि खूप होतें. अंधारांतून बाण अन् गोळ्या येत होत्या. त्यामुळे पिलाजी बुजला. शत्रु पुढे पुढे अंगावर येऊं लागला.

तान्हाजीने आपली आघाडी मात्र पक्की रोखली होती. त्याने अनेकांना लोळविलें. पिलाजीची तारांबळ उडूं लागली. शत्रु ओरडा करून पुढे येऊं लागला. आपल्याला हा मारा सहन होत नाही असें पिलाजीला दिसूं लागलें. त्याची स्थिति फारच विचित्र झाली. आता आपल्याला मारून शत्रु गावांत घुसणार असें त्याला वाटलें. तो फारच घाबरला. तान्हाजीला याचा अजूनपर्यंत सुगावा नव्हता. एवढ्यांत

त्याला शत्रूचा गलका ऐकूं आला.

तान्हाजीने आपल्या हाताखालच्या शिलेदारांस आघाडीवर लढत ठेविलें व तो स्वतः पिलाजीच्या बाजूस धावला.

तान्हाजी पिलाजीच्या बाजूस येऊन पाहातो तों काय! पिलाजी ढाल-तलवार टाकून देऊन पळत सुटला होता![६] त्याचा हा असा पळपुटेपणा तान्हाजीने पाहिला. त्याचें मस्तकच खवळलें. तो लगोलग तसाच धावत पिलाजीच्या मागे लागला.[६] पिलाजी फारच भ्याला होता. त्याला अंधारांत कल्पनाहि नव्हती की, आपल्यामागे तान्हाजी धावत येतोय! तान्हाजी फारच रागावला होता. नामर्दपणाचा तान्हाजीला भारी राग यायचा.

तान्हाजीने पिलाजीला गाठलें, आणि एकदम त्याची मागून मानगूट पकडली. पिलाजी घाबरून ओरडला. त्याला घाम सुटला होता. त्याचें सगळें अंग कापत होतें. धाप लागली होती.[६] तान्हाजीने त्याला माघारी खेचून चांगलीच शोभा मांडली त्याची. तान्हाजीचे ते कडक शब्द! त्याने त्याचा खूपच पाणउतारा केला. नामर्दासारखा पळतो काय? अरे कुणाची औलाद तुझी? नीळकंठराव सरनाइकाची ना? मग तुझा तो बा स्वर्गांतून काय म्हणेल? अवघड वख्ताला बायकाहि धीर सोडीत नाहीत, अशा आशयाच्या शब्दांत पिलाजीचा धिक्कार करीत तान्हाजीने त्याला ओढीत ओढीत लढाईच्या ऐन तोंडावर आणलें. गनिमाशीं मोठ्या कडाक्याने मराठे झुंजत होते. तान्हाजी पिलाजीला झोंबऱ्या शब्दांत म्हणाला,[७]

"अरे गड्या, ह्या लढाईत म्या तुझा पाठराखा असतां तूं आपल्या माणसांना टाकून पळत सुटलास! तुला काय म्हणावं तरी काय? आन् आधी मारे बढाया मारीत होतास! कुठे रे गेल्या तुझ्या त्या गमजा? आपल्या शिवबाराजाने तुला एवढ्या मोठेपणास चढवून पदरीं सांभाळलें,

तें असं आपलं लष्कर टाकून पळून जाण्यासाठी? अरे कांही थोडी खंत?"

अशा परखड शब्दांत तान्हाजीने पिलाजी सरनाइकाचा उद्धार केला आणि—? आणि जवळच एक मोठा कासऱ्याचा दोर पडला होता तो त्याने उचलला! त्याने एका हाताने पिलाजीला धरून ठेवलेंच होतें. आता हा काय करतोय हें पिलाजीला समजेना. समोर लढाई चाललीच होती. तान्हाजीने एका मोठ्या दगडाशीं पिलाजीला धरलें आणि—सुभेदार, सुभेदार काय करताय हें? तान्हाजी सुभेदाराने त्याला दोरखंडाने दगडाशीं आवळून बांधून टाकण्यास सुरुवात केली. अन् खरोखर तान्हाजी मालुसऱ्याने त्याला पक्कें बांधून टाकलें![८] पिलाजीची करुण गत झाली. तान्हाजीने त्याला असें कां बांधलें? पिलाजीला जणू शिकविण्याकरिता की, बघ बघ समोर ही मराठी मर्दांची औलाद कशी लढतीय! लढाईंत गनिमासमोर हें असें पक्कें उभें राह्याचें असतें. बांधून टाकल्यागत! एक पाऊलहि नाही माघारीं घ्यायचें. पळ तूं आता कुठे पळतोयस तो! धोंडा पाठुंगळीं घे अन् पळ!

आणि लगेच तान्हाजी समशेर उपसून अन् ढाल घेऊन सूर्याजी-रावाच्या लढत्या लष्करावर उड्या टाकीत धावून गेला. मराठे शत्रूशीं लढतच होते. सूर्याजीरावाला वाटलें होतें की, डाव जिंकला! पण मराठ्यांनी अडसर घातला.[१]

तान्हाजी ओरडत, हर हर महादेव करीत आणि इतर आपल्या लोकांना चेतवीत शत्रूवर तुटून पडला. भयंकर लढाई त्या रात्रीच्या घनतिमिरांत उसळली. तान्हाजीने शृंगारपुरी सैन्याची पार त्रेधा उडविली. पार दाणादाण उडविली. सूर्याजीरावाची फौज फार मारली गेली. तान्हाजी अन् तान्हाजीचे लोक फार भयंकर आवाजांत जयघोषाच्या आरोळ्या ठोकीत होते.[१]

तान्हाजीने उडविलेल्या हलकल्लोळांत सारखा ओरडा होत होता. मधून मधून शब्द ऐकूं येत होते. कुणी ओरडत होते "अरे हुश्शार हो!" कुणी ओरडत होते, "अरे हाण!" कुणी म्हणत होते "दे!" "थांब!" "फेक!" "पोहोचव!" "वांचव!" "टाक!" "सोड!" "पळ!" "ने!", "परतव!", "पाहा!" "फोड!" "तोड!" "घे!" "पाड!" "मार!"[९]

सगळीकडे मुंडकीं, तुटके हात, पाय, पागोटीं, ढाली, तलवारी इतस्ततः विखुरल्या होत्या.

सूर्याजीरावाची दाणादाण उडविली तान्हाजीने. सूर्याजीरावाचा धीर सुटला आणि जी पळापळ सुरू झाली, ती वाऱ्यावर उडणाऱ्या पाचोळ्या-सारखी. पार पळत सुटले! सूर्याजीराव आघाडीला! एक माणूस उरला नाही! तान्हाजीचे लोक गर्जत होते. तान्हाजीहि त्यांना साथ देत हसत होता. नगारा वाजूं लागला होता.[९]

आणि मग हसत हसत तान्हाजीने पिलाजीचा दोर सोडून त्याला मोकळें केलें. लई थट्टा केली. पण तेवढीच, पुन्हा नाही.

महाराजांस हा लढाईचा प्रकार समजला. ते संगमेश्वरास येण्यास निघाले. महाराज संगमेश्वरानजीक आल्याचें समजतांच तान्हाजी व पिलाजी मोठ्या उत्साहाने महाराजांस सामोरे निघाले. त्यांनी आपल्या-बरोबर आपली पराक्रमी फौजहि घेतली.[१०]

पिलाजी सरनाईक जरा चार पावलें आधी पुढे गेला. महाराजांना मुजरा करून त्याने सांगितलें की, तान्हाजी सुभेदार मागोमाग येतच आहेत.

तान्हाजी सुभेदार आले. तान्हाजीला सर्वजण सुभेदार म्हणत.[११] तान्हाजीने मोठ्या आनंदांत महाराजांना मुजरे घातले. लढाई फत्ते केल्याचा आनंद होता तो. महाराजांनाहि अतिशय आनंद झाला. त्यांनी

तान्हाजीचा व त्याच्या सर्वच सैन्याचा मोठा मान केला.[१०]

महाराजांना युद्धाची सर्व हकीकत समजली. सूर्यरावाने एकदा आपणास वचन देऊन, आता असें फसविलेलें पाहून महाराज फारच चिडले.[१२] तरीहि महाराजांनी राग गिळला. अजूनहि समजावून सांगून सूर्यरावास पुन्हा एकदा आपल्या स्वराज्यकार्यांत सामील करून घेऊं शकूं असें त्यांना वाटलें. आणि अगदी लगेच आपला एक हेजीब त्यांनी शृंगारपुरास सूर्यरावाकडे पाठविला.[१२]

हेजीब सुर्व्यांच्या घरीं आला. एवढीं पापें करूनहि तो उदार महाराजा आपल्या दारीं समझोत्यास वकील धाडतो आहे हें पाहून त्या सूर्यराव सुर्व्यास–कांहीहि वाटलें नाही ! हेजिबाने महाराजांच्या वतीने स्पष्टपणें त्याला म्हटलें,[१३]

" राजेसाहेब, आपण महाराजांचा कौल घेऊनहि बादशाहास सामील झालांत. आपण आजवर महाराजांचे खरोखर फार अपराध केले आणि संगमेश्वरास आमच्या फौजेवर रात्रीं बेधडक छापाहि घातलांत. हा अपराध तर फारच मोठा झाला. आपणच सांगा, या आपल्या आगळिका महाराजांनी कशा सहन कराव्यात ?"

सूर्यरावराजे आपल्या कानांचीं खिडारें उघडीं ठेवून, परंतु मनाची घागर पालथी ठेवून हेजिबाचें बोलणें ऐकत होते ! हेजिबाने लगेच महाराजांचा खास निरोप होता तो सुर्व्याला सांगितला. तो निरोप असा होता[१४] :

" राजे, आपण महाबाहु आहांत. पालीचे राजे जसवंतराव हे आम्हाला भिऊन आपल्या आसऱ्यास येऊन बसले आहेत. आमच्याशीं गनिमाई करणाऱ्या जसवंतरावाचा मुलुख काबीज करावयास आम्ही सज्ज झालों आहोंत. तेव्हा आपण स्वतः जातीने पालीच्या मुक्कामीं आम्हास, न चुकतां येऊन भेटावें. आपण आमचें भय धरूं नये.

आपणास कौल मिळेल. पण जर घमेंडीने फुंद होऊन आपण तेथे आलाच नाहीत, तर आपलाहि नतिजा जसवंतरावाप्रमाणे होईल. आमच्या इतराजींतून आपणास वांचवील असा कोणीहि मौजूद नाही."

महाराजांचें म्हणणें सूर्यरावाने अगदी थंडपणें ऐकून घेतलें आणि हेजिबास निरोप देऊन म्हटलें की,[१५]

"आपण ( पुढे ) जा! मी ( मागाहून ) येतों!"

हेजीब महाराजांकडे संगमेश्वरास परत आला. त्याने सूर्यरावाचा करिणा एकांतांत राजश्रीसाहेबांना सांगितला.[१५] सुर्वा पालीच्या मुक्कामावर येतो की नाही, तें लौकरच दिसणार होतें.

महाराज फौज घेऊन जसवंतरावाच्या पालीवर चालून गेले. ती सबंध जहागीरच तडकाफडकी कबजा झाली. ज्यांनी आडवें येऊन विरोध केला ते सजा पावले. परंतु अनेक योग्य योग्य पुरुषांस महाराजांनी कौल दिला.[१५] पिलाजीराजे शिर्के हेहि याच भागांतले दाभोळचे वतनदार होते. दाभोळ कबजा केलें तेव्हाच शिर्केराजांचें दाभोळच्या देशमुखीचें वतन महाराजांनी अमानत करून त्यांना कौल देऊन पदरीं घेतलें.[१६]

पालीच्या जवळच एक चिरदुर्ग नांवाचा किल्ला होता. फार उत्तम-फार प्रख्यात. चिरदुर्गाला महाराजांनी उंच व उत्तम तटबंदी करण्याचा हुकूम दिला. हा किल्ला म्हणजे या प्रांताचे जणू भूषणच ( मंडन ) आहे असें सूचित करण्यासाठी त्यांनी त्याला नवें नांव दिलें, 'मंडनगड.' गडावर किल्लेदार व सैन्य ठेवलें.[१७]

महाराजांचें राज्य झालें. प्रजा सुखावली. मांग, चांभार, गारुडी, भिल्ल, कोळी, कातकरी, सावकार, शिकलगार, फासेपारधी, बजवय्ये, पखवाजी, कोमटी, हलवाई, कुणबी ( शेतकरी ), गुरव, गवळी, धनगर, परीट, तेली, तांबोळी, रंगारी शिंपी, कोष्टी, कुंभार, माळी,

तमासगीर, न्हावी, गवंडी, सुतार, तांवट, लोहार, सोनार, कासार, वाणी, मराठे, ब्राह्मण वगैरे सर्व जातीजमातींचे लोक अतिशय आनंद पावले.[१८] पण हा अनुभव नेहमीचाच होता. स्वराज्य आणि त्यांतून शिवराज्य आल्यावर कोणाला आनंद होणार नाही?

होय! होते ना असेहि महाभाग. घोरपडे, मोरे, दळवी, ढोणे, घाटगे,—आणि किती तरी!

पाली पाडाव झाली. महाराजांनी सुर्व्याची फार वाट पाहिली. पण सुर्वा बेगुमान झाला. कौल देऊनहि मुलाजमेतीस न आला. येणेंकरून महाराज संतप्त झाले.

'पाड सिंहासनें दुष्ट हीं पालथीं ...



तिकडे सूर्यराव सुर्वे शृंगारपुरांत आनंद करीत होता. महाराजांनी संगमेश्वराहून पालीवर स्वारी केली, पण आपल्याकडे मात्र आर्जवाचे वकीलच पाठवितात, त्याअर्थी ते आपल्यावर स्वारी करण्यास भीतच असावेत, असा समज सुर्व्याने करून घेतला होता. त्याने प्रथम फौजहि जमा केली होती. परंतु आता शिवाजी आपल्यावर चालून येणें शक्य नाही, असें समजून त्याने आपली फौजहि रजा देऊन कमी केली![१९]

——आणि चिडलेले महाराज पंधरा हजार फौज पायदळ घेऊन शृंगारपुरावर चालून निघाले. डोंगरांच्या व झाडीच्या दाटीघाटींतून हें पायदळ निघालें. महाराज स्वतः पालखींत बसले होते.[२०]

सूर्यरावास त्याच्या हशमांनी ही बातमी घाबऱ्या घाबऱ्या सांगितली की, शिवाजीराजा पंधरा हजार हशम घेऊन चालून येतोय. सूर्यरावाने ही बातमी ऐकली आणि त्याची घमेंड उडाली. तो घाबरून गेला. कारण लढायचें म्हटलें तरी त्याची फौजहि जागेवर नव्हती.[२१] त्याला वाईट वाटलें. तो आपल्या साथीदारांना म्हणाला,[२१]

" शिवाजीराजा शिनगारपुरावर येतोय. तो तर पुरा बळवंत. कपटाची लढाई करणारा. फौजहि थोर. त्या बळापुढे आपला टिकाव कसा लागावा ? हा समिंदर कसा पार करायचा ? "

त्याने सोबत्यांशीं सल्लागल्ला केला आणि फार महत्त्वाचा व निर्धाराचा निर्णय ठरविला!—पळून जायचा![२२] आणि खरोखरच भराभरा सगळीं माणसें घेऊन, घरदार, धनदौलत आणि इतर पसारा टाकून सूर्यराव पळाला![२२] गावांतहि पळापळ उडाली.

महाराजांची पालखी आणि फौज वैऱ्याचा वेध घेत सर सर धावत होती. दाट झाडीखालून, ऊन्ह-सावलीची मौज अनुभवीत मराठे वेगाने चालले होते. उन्हाळ्याचे दिवस होते. नागांनी टाकलेल्या काती जागोजाग चकचकत पडलेल्या होत्या. मोर इकडे तिकडे धावत होते.

अनेक वन्य पशुपक्ष्यांची गर्दी वाटेवरच्या जंगलांत होती.[२३]

दुरून शृंगारपूर दिसूं लागलें. गाव जवळ आला. महाराज विचार करीत होते, हल्ले कसे चढवायचे, सूर्यरावाशीं कसें कसें लढायचें? [२३] एवढ्यांत बातमी आली की, शृंगारपुरांत सूर्यराव नाहीच! तो घाबरून पळून गेला! ही बातमी ऐकून महाराजांस वाईट वाटलें. कारण त्याला कडक शिक्षा करण्याची त्यांची इच्छा राहून गेली.[२३]

फौज गावांत शिरली. पालखींत बसूनच महाराजहि गावांत प्रवेशले. गाव जवळजवळ ओस पडला होता. महाराज सूर्यरावाचें वाड्यांत शिरले. वाडाहि ओस होता. पण न जाणो कुणी लपून दगा करील हें भय. हत्यारें घेऊन मराठी हशमांसह महाराज वाड्यांत गेले. तेथे एके ठिकाणीं उंची मसनद लोड वगैरे आसन होतें. हें आसन म्हणजे सूर्यरावाचें सिंहासन![२४] महाराजांनी तें पाहिलें. त्यांच्या मस्तकांत चीड धुमसत होती. ते रागारागाने त्या आसनापाशी गेले आणि थाडकन् लाथ मारून ती गादी त्यांनी उडवून दिली![२४] (दि. २९ एप्रिल १६६१.)


* * *

---

**आधारः**—(१) पसासंले. ८४५. (२) शिभा ३०।३१ व ३२. (३) शिभा ३०।३३ ते ३६. (४) शिभा ३०।३७; पसासंले. ८८७. (५) शिभा ३०।३८. (६) शिभा ३०।३९ ते ४२. (७) शिभा ३०।४३ व ४४. (८) शिभा ३०। ४५. (९) शिभा ३०।४६ ते ५१. (१०) शिभा ३१।१ ते ३. (११) पोवाडा; शिचप्र. पृ. २४. (१२) शिभा ३१।४ व ५. (१३) शिभा ३१।६ ते ९. (१४) शिभा ३१।१० ते १३. (१५) शिभा ३१।१५ व १६. (१६) शिचसा ३।४३८. (१७) शिभा ३१।२४ ते २८. (१८) शिभा ३१।१६ ते २३. (१९) शिभा ३१।५२ ते ५४. (२०) शिभा ३१।३८ व ३९. (२१) शिभा २१।४१ ते ४४. (२२) शिभा ३१।४५ व ५६ ते ६०. (२३) शिभा ३१।६१ ते ६८. (२४) शिभा ३१।७१.

शिवाय पाहाः—पसासंले. ४४८, ८८७, ८४३; जेधे शका; शिचप्र पृ. २२ व ५१.

# ना म दा र खा न
# ★ ★ आ णि ★ ★ ★ ★ ६ ★ ★
# शा इ स्ते खा न



महाराजांनी सूर्यरावाचें प्रभावळी हें मोठें गावहि जिंकलें. त्याचें राहणें शृंगारपूर व प्रभावळी या दोन्ही स्थळीं आलटून पालटून असे. शृंगारपुरास महाराजांचा मुक्काम होता. आपलीं वतनें चालू ठेवा म्हणून विनंती करण्यासाठी अनेक वतनदार त्यांच्याकडे येत होते. गोळवली येथील पाध्ये ऊर्फ गोळवलकर घराण्यांतील नारो अनंत, केसो विठ्ठल व केसो राघो हे तीन पुरुष आपलें धार्मिक वतन चालू ठेवा म्हणून विनंती करण्यास आले होते. गोळवलकर मंडळींनी महाराजांना सांगितलें की, आमच्या घराण्यास सत्येश्वर राजाचा ( राजा सत्याश्रय पुलकेशीन, बदामीचा चालुक्य सम्राट इ. स. सातवें शतक ) ताम्रपट आहे. महाराजांनी त्यांचें वतन कायम ठेवण्याचें आश्वासन दिलें. परंतु अशीं फारच थोडीं वतनें त्यांनी चालू ठेविलीं. बाकीचीं असंख्य लहानमोठीं वतनें त्यांनी बंद ( अमानत ) करून टाकलीं.[२] कारण ‘ राजश्रीचे राज्यांत वतनें द्यावयाचा दंडक नाही ! ’

प्रभावळी सुभ्यावर महाराजांनी त्र्यंबक भास्कर यांची सुभेदार म्हणून नेमणूक केली.[४] याच सुभ्यावरपुढे पिलाजी नीळकंठराव सरनाईक सुभेदार होता.[५] व त्याच्यानंतर रघुनाथ बल्लाळ अत्रे हे सुभेदार होते.[६]

वतन आणि जहागीर असलेले लोक हे स्वार्थीच असावयाचे अशा साक्षी इतिहासाने हजारो दिल्या आहेत. महाराजांच्या विरुद्ध लढलेल्या स्वजनांना आपल्या जहागिरी व वतनें टिकविण्याची व अधिक मिळवावयाची ओढ होती असेंच दिसून येतें. स्वार्थासाठी धरसोड करणें हा वतनदारांचा कुळधर्म बनून गेलेला असे. खोपडे, मोरे, सुर्वे, होनप

वगैरे उदाहरणें अनेक आहेत. त्यांतील हे पाहा आणखी एक. सावंतवाडीकर खेम आणि लखम सावंत–भोसले.

अफजलप्रसंगापूर्वी या भोसले–सावंतांनी महाराजांकडे पितांबर शेणवईस पाठवून करार करून दिला ( दि. ५ मार्च १६५९ ) होता की, तुमच्याशीं निष्ठेने वर्तूं. स्वराज्यसाधनाच्या ठायीं महाराजांच्या वकिलापाशी मध्यें राहून तुरूक लोकांचें साधान करूं. पण अफजलवधानंतर दोरोजी आणि इतर मराठे दक्षिण म्हणजेच तळकोकणांत स्वराज्याचा विस्तार करूं लागले.[७] तेव्हा विजापूरच्या प्रख्यात खवासखान नांवाच्या सरदाराने वेंगुर्ला प्रांताच्या बंदोबस्तासाठी काजी अब्दुल्ला नांवाच्या सरदाराची रवानगी केली. या वेळीं सावंतांचें कर्तव्य होतें की, त्यांनी स्वराज्याच्या सरदारांस मदत करावी. परंतु सावंतांनी मदत केली काजी अब्दुल्लालाच ![७] आणि कुडाळ प्रांतांत मराठ्यांना त्यांनी घुसूं दिलें नाही. परंतु सावंत माघारी वाडीला गेले, ही संधी साधून मराठयांनी कुडाळ जिंकलें. परंतु सावंतांनी तें पुन्हा हिसकावून घेतलें.

म्हणजे या सरंजामदार–वतनदारांची निष्ठा तरी कोणती होती ? स्वार्थ हीच त्यांची निष्ठा. वाटेल तें करून वतनें मिळवायचीं आणि वाटेल तें करून तीं टिकवायचीं. हेंच त्यांचें अवतारकार्य. वतनदारींतील हें भयंकर विष महाराजांनी पक्कें ओळखलें होतें. म्हणूनच ते शक्य तेवढीं वतनें जप्त ( अमानत ) करीत होते आणि शक्य तोंवर नवीन वतनें कोणाला देत नव्हते. सर्व वतनदारी एकदम नामशेष करणें त्यांना इच्छा असूनहि अशक्य होतें. कारण हे सर्व असंतुष्ट आत्मे स्वार्थासाठी केव्हा फितुरी आणि बंडें करतील याचा नेम काय ? त्यासाठी लोकांच्या मनाचीच प्रगति होणें जरूर होतें. महाराजांचा तोच प्रयत्न होता. वतननिष्ठेवरून आणि राजनिष्ठेवरून स्वराज्यनिष्ठेवर लोकांचीं मनें कशीं जडतील याचा ते प्रयत्न करीत होते. ‘ मराठियांचें गोमटें ’ करणारें

हें महाराष्ट्रराज्य आहे, असें ते म्हणत तें याचकरिता. हें काम परम दुष्कर होतें. कारण लोकांत सामाजिक व राजकीय विवेकाचा पूर्ण अभाव होता. शिक्षणाचाहि. शिक्षणाच्या व्याख्याच मुळीं वेगळ्या होत्या. अगदी नेमकें बोलावयाचें म्हणजे समाज व राष्ट्र म्हणून कांही एक जीवन जगायचें असतें याची कल्पनाच कोणाला नव्हती. हजारो आणि लाखो लोक बादशाही सैन्यांत दाखल होऊन महाराजांवर चालून येत. प्रत्यक्ष नात्यांतले लोक, व्याही, जावई, मेव्हणेसुद्धा, शत्रूला सामील असत याचा अर्थ काय? महाराजांच्या ' स्वराज्य-साधनेच्या ' कार्यांत आज सामील झालेले सुर्वे, खोपडे, होनप, सावंत, बाबाजी भोसले, मोरे उद्या लगेच बादशाहाच्या सैन्यांत जाऊन उभे राहात, याचा अर्थ काय? ' राष्ट्रभावना ' हा शब्द फार अवघड झाला; पण ' स्वराज्यस्थापना ' ' धर्मसंस्थापना, ' ' गोब्राह्मणप्रतिपालन ' 'तीर्थ-क्षेत्रांची मुक्तता व उद्धार '' देवाधर्माचें संरक्षण ' हे शब्द आणि त्यांचे अर्थ निदान तोंडावळ्यावरून तरी समजण्यासारखे होते की नाही? पण महाराजांशीं वैर करणाऱ्या व स्वराज्यांत सामील न होणाऱ्या आमच्याच लोकांना त्यांचें किंचितहि महत्त्व पटलेलें नव्हतें.

तळकोकणावरील या दुसऱ्या स्वारींतच (इ. १६६१) थेट रेडी बांदा, आरोदा, तेरेखोलपर्यंत जाऊन सावंतांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न महाराजांनी केला असता. परंतु पुण्यांत नवाब शाइस्तेखानाने तळ दिलेला होता व त्याच्या फौजा कल्याण प्रांतांत धामधूम करीत होत्या, म्हणून तिकडेहि लक्ष देणें जरूर होतें.

तळकोकणांत स्वराज्य झालें. लोकांच्या जीवनांतच त्याचा साक्षात्कार स्पष्ट होऊं लागला. देवरूख येथे एक जुनें राममंदिर होतें. सुलतानी अमलांत रामाच्या मंदिरांतील मूर्ति तळ्यांत फेकून देण्यांत आल्या होत्या. स्वराज्य आल्याबरोबर प्रजेपैकीच साने नांवाच्या माणसाने तें मंदिर

पुन्हा बांधलें आणि तळ्यांतून मूर्ति बाहेर काढून पुन्हा त्यांची स्थापना केली.[९]

शिवाजीमहाराजांची स्वराज्यासाठी कोकणांत ही धामधूम चालू असतांनाच महाराजसाहेब शहाजीराजे यांनी दक्षिणेंत तेगनापट्टणला वेढा घातला ( दि. २५ डिसें. १६६० ), आणि चाळीस दिवसांत तें स्थळ त्यांनी जिंकलें ( दि. ४ फेब्रु. १६६१ ). तसेंच त्यांनी पोर्टोनोव्हो बंदर जिंकलें ( जुलै १६६१ ). पोर्टोनोव्होला राजांनी केलेल्या लुटींत इंग्रजांनाहि तडाखा बसला व त्यांचे तीस हजार पॅगोडांचें ( सुमारें एक लाख पांच हजार रुपये ) नुकसान झालें.[१०] शहाजीराजे चंदावर ( तंजावर ) प्रांतीं आदिलशाहाचे सरदार या नात्याने नायकांचा प्रदेश जिंकीत होते. परंतु बव्हंशीं तो प्रदेश त्यांच्या स्वतःच्याच हातांत राहणार होता.

शिवाजीमहाराज कोकणची मोहीम फत्ते करून देशावर येण्यास निघाले. येतांना त्यांचा मुक्काम दोन दिवस महाड येथे होता[११] (इ. १६६१ मे अखेर). तेथून ते राजगडास जावयास निघाले. रायगड–लिंगाणा–तोरणा ते राजगड या अवघड मार्गाने ते गेले असतील असें वाटतें. ही वाट अवघड असली तरी कमी अंतराची आहे.

महाराज राजगडावर येऊन दाखल झाले. उन्हाळा संपला होता ( जुलै प्रारंभ, १६६१ ) आणि एके दिवशीं कुळस्वामिनीची खासा स्वारी राजगडावर पालखींत बसून आली. उदोकार झाला. अष्टभुजा भगवती जगदंबा आदिशक्ति श्रीतुळजाभवानी खड्ग, धनुष्य, बाण, ढाल, शंख, त्रिशूळ हातीं धारण करून, मस्त महिषासुराचे वक्षीं उजवे हातें त्रिशूळप्रहार करून, डावे हातें त्याची शेंडी धरून, सव्य पाय सिंहाचे पाठीवरी, सिंहें दैत्याचे मनगट पकडिलें आहे, सव्य व वाम कर्णावरी चंद्रसूर्य झळकतात, मस्तकीं मुकुटावर शिवलिंग विराजमान झालें आहे; अंबा बहुत बहुत प्रसन्न मुद्रा करोन सुहास्यवदन दर्शन

देते आहे अशी बहुत बहुत देखणी श्रीची मूर्त राजेश्री मंबाजीनाईक बिन गोमाजीनाईक पानसरे याणी त्रिशूल गंडकीची शिळा पैदा करून हुन्नरवंत शिल्पी त्याच प्रांतीचे मेळवून श्रमेंकरोन सिद्ध केली. महाराज राजेश्रीसाहेब राजगडीं होते. राजेश्रीसाहेबांचे दर्शनार्थ गडावरी आणिली.[१२] राजश्रीसाहेब रजावंद झाले.

श्रीची स्थापना प्रतापगडावरी करावयाचा सिद्धांत करून राजश्री मोरोपंडित पिंगळे यांचेसमागमें श्री प्रतापगडावरी पाठविली. उत्तम साहित्य केलें. शुभमुहूर्तावरी श्रीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. श्रीभवानीस रत्नखचित अलंकार भूषणें नानाप्रकारचीं केलीं. नित्य पूजा, महोत्सव, चौघडा, छबिना, होमहवन, बलिदान, नैवेद्य, नंदादीप, पुराणप्रवचन, गोंधळ इत्यादि गोष्टींची मोईन करून दिली. वेदमूर्ति विश्वनाथभट हडप यांसी श्रीची पूजा सांगितली. स्वतः महाराज देवीचे भोपे बनले. परंतु राज्यकर्म करणें. येणे कारणें गडावर महाराजांचें नित्य राहाणें घडत नाही. म्हणून मंबाजीनाईक पानसरे यांस महाराजांनी आपले प्रतिनिधि म्हणून श्रीसान्निध ठेविलें. श्रीस खासा चाकरवर्ग नेमून दिला. पेशवा, पुजारी, पुराणिक, फडणीस, हवालदार, खाटीक वगैरे नेमले. दर पौर्णिमेस छबिना व बकऱ्याचा बळी आणि दर खांडेनवमीस व दसऱ्यास अजबळीची मोईन केली[१२] ( स्थापना सुमारें जुलै १६६१ ).

—महाराजांनी आपल्या मंत्रिमंडळांत थोडा बदल केला. सामराजपंतांचे जागीं नरहरि आनंदराव यांस पेशवाई दिली आणि अनाजी दत्तो यांस वाकानिशी दिली. मंत्र्यांना पालख्यांची नेमणूक करून दिली[१३] ( दि. २१ ऑगस्ट १६६१ ).

—भाद्रपद वद्य ९ शके १५८३ रोजीं ( दि. ७ सप्टें. १६६१ ) महाराजांच्या दरुणीमहालांत पाळणा हलला. महाराजांस कन्या झाली.

तिचें नांव सकवारबाई ठेवलें.[१४] पण कोणत्या राणीसाहेबांस ही राजकन्या झाली हें इतिहासाला माहीत नाही! त्यांस एकूण दहा राण्या होत्या.[१६]

—शाइस्तेखानाचे सरदार पावसाळ्यानंतर पुन्हा धामधूम करूं लागले. बुलाखी नांवाच्या सरदाराने देहरीगडास वेढा घातला. परंतु कावजी कोंढाळकराने बुलाखीवर चालून जाऊन त्याचीं चारशे माणसें मारून काढलीं व त्याचा वेढा उठवून लाविला.[१५]

—तापीचे दिवस (ऑक्टोबरचा उन्हाळा) आले. महाराज वर्धनगडावर गेले आणि तेथेच संपूर्ण उष्णकाळ राहिले[१५] (ऑक्टोबर १६६१).

—शाइस्तेखान पुणें प्रांतांत आल्यावर मराठी टोळ्यांनी त्याला गनिमी काव्याने सतावून सोडलेंच होतें. त्यांतच नेताजी पालकराने छापे घालावयास आरंभ केल्यावर जास्तच मजा आली. नेताजीने प्रारंभीं परिंड्याचे बाजूस[१७] धावाधाव केली. नंतर कारतलबखानाचा उंबरखिंडींत पराभव केल्यानंतर तेथेच तळ देऊन बसण्याची त्याला महाराजांनी आज्ञा केली होती.[१८] नंतर नेताजीला त्यांनी मोंगलावर छापे घालण्यास सोडला. नेताजीने पुन्हा सुपें ते परिंडा भागांत धामधूम घातली.[१९] याची बातमी शाइस्तेखानाला समजली (दि. १० नोव्हें. १६६१ रोजीं).

याच वेळीं महाराजांचे दोन हजार हशम जुन्नर परगण्यांत वाडें व त्या जवळच्या गावांतून खंडणी वसूल करीत (दि. १९ नोव्हें. १६६१ सुमार) आहेत, अशी खानाला खबर आली.[१९] म्हणून खानाने जाधवराव, शेख हमीद, इस्माईलखान, सैफखान वगैरे सरदारांस जुन्नर व आंबेगाव परगण्यांत रवाना केलें. परंतु या सरदारांनी जाऊन काय केलें कोण जाणे! त्यांची व मराठ्यांची गाठ पडल्याची नोंद (Waqai of the Deccan मध्यें) नाही.

याच वेळीं खानाचा एक प्रख्यात सरदार नामदारखान हा कल्याण–भिवंडी भागांत स्वराज्य तुडवीत सुटला होता. हा खान मोठा शूर होता.[२०] त्याचा मोड केलाच पाहिजे असे महाराजांनी ठरविलें. ते स्वतः जाण्यास निघाले ( इ. १६६१ नोव्हें. प्रारंभीं ). परंतु तेवढ्यांत त्यांना खबर आली की, सिंहगडावर ऊर्फ कोंढाण्यावर कांहीतरी फितूर फितवा झाला आहे. म्हणून त्यांनी नामदारखानावर छापा घालण्याचा बेत पुढे ढकलला व मोरोपंत पिंगळे, निळोपंत, गोंदजी पांढरे, रुमाजी अहिरे, कोंडाजी नाईक वगैरे मंडळींना सिंहगडावर रवाना केलें व गडाचा बंदोबस्त उत्तम ठेवण्यास सांगितलें. सिंहगड स्वराज्यांत होता. गडावर फितवा व्हावा ही गोष्ट चिंतेची होती. बरें नेमके फितूर कोण कोण आहेत हें तरी कसें समजावें? म्हणून वरील मंडळींस सबंध गडावर पांगून मिसळून जागें राहाण्याची सूचना महाराजांनी दिली.[२१]

गडावर कांहीहि विपरीत प्रकार अजिबात घडला नाही. मग महाराज निर्धास्त मनाने पेण–कल्याणवर निघाले. त्यांच्याबरोबर जावळीचे सुभेदार कृष्णाजी बाबाजी व वाघोजी तुपे हे होते. नामदारखानाचा तळ पेण–कल्याणजवळ मिऱ्या डोंगरावर होता. महाराजांनी अकस्मात् डोंगरावर चढून जाऊन खानाच्या तळावर झडप घातली आणि खानाच्या फौजेची दाणादाण उडवून दिली. त्याचा पराभव केला. पळापळ, पडापड अन् मरामर उडाली. फत्ते केली. पण घात झाला! कृष्णाजी बाबाजी सुभेदार ठार झाले. वाघोजी तुपेहि जखमी झाले.[२२] युद्धधर्म कठीण. हें नुकसान सोसण्याशिवाय गत्यंतर नाही अन् यशाहि त्याविना नाही. ( पेण–कल्याणची मिऱ्या डोंगरावरील लढाई इ. १६६२ च्या प्रारंभीं झाली. )

ही मोहीम फत्ते करून महाराज राजगडावर परतले.

नेताजी पालकर छापे घालीत होताच. शाइस्तेखानाला आतापर्यंतच्या एकूण मोहिमेंत लक्षांत घेण्यासारखा फक्त एकच विजय मिळाला होता, तो म्हणजे चाकणचा. सत्त्याहत्तर हजार घोडदळ, अफाट पायदळ व अफाट तोफखाना असूनहि त्या मानाने आतापर्यंत त्याने कांहीच विशेष केलें नव्हतें. उलट कारतलब व नामदार या दोन खानांचें सणसणीत अपयशच डोळ्यांत भरण्यासारखें होतें.

महाराजांनी आपल्या मंत्रिमंडळांत आणखी महत्त्वाचा बदल केला. मोरोपंत पिंगळे हे आतापर्यंत मुजुमदारी करीत होते. त्यांची मुजुमदारी निळो सोनदेवांस दिली व त्यांना पेशवेपद दिलें[१५] (दि. ३ एप्रिल १६६२). अनाजी दत्तो प्रभुणीकर हे वाकनिशी करीत होते. त्यांना सुरनिशीचा हुद्दा सांगितला (दि. १६ ऑगस्ट १६६२).

मध्यंतरी शाइस्तेखानाचे दोघे सरदार सराफराझखान व नामदारखान (मिऱ्या डोंगरावर पराभूत झालेला) या दोघांची व नेताजी पालकराची सुप्याजवळ ससैन्य चकमक झडली. त्यांत या दोघांनी नेताजीचा पराभव करून लूट मिळविली. नेताजीचा पराभव झाला म्हणजे नेमकें काय झालें हें समजत नाही. परंतु मोंगल शूरांनी या प्रसंगीं मिळविलेल्या लुटीचा पूर्ण तपशील उपलब्ध आहे. त्यांत एकंदर ६५ (पासष्ट) जिन्नस नोंदलेले आहेत. त्यांत बैल एकशे त्रेपन्न, घोड्या व शिंगरें मिळून आठ जनावरें, चौतीस तोळे व साडेतीन मासे रुपें आणि सोनें फक्त सातच मासे! वास्तविक हे एवढेच फक्त त्यांत मोलाचे जिन्नस होते. लूट अगदीच क्षुद्र म्हणावी लागेल. पण हे मोंगल सरदार म्हणजे महा घमेंडखोर. तिळाएवढें केलें की, गगनाएवढें भासवावें ही यांची रीत. त्यांनी ही लूट मोठ्या दिमाखाने औरंगझेबाकडे थेट रवाना केली[२३] (दि. २५ मे १६६२).

नेताजीच्या बंदोबस्तासाठी सराफराझखान वगैरे एकूण अठरा

सरदार व रायबागीण फार खटपट करीत होते. यावरून नेताजीच्या हुतुतूची कल्पना येईल.[२३]

या वर्षीचा पावसाळा उतरणीस लागल्यावर एके दिवशीं वेंगुर्ल्याच्या बंदरांत एक फार बडी व्यक्ति गलबतांतून उतरली—बडी बेगमसाहेबा! मक्केची यात्रा करून बाई परत आल्या[२४] (दि. ३० ऑगस्ट १६६२). येतांना प्रवासांत बाईंना गोऱ्या चाचे लोकांचा उपद्रव फार झाला. पण एकंदरींत थोडक्यावरच निभावलें.

—कोकणांत राजापूर वगैरे जो मुलुख महाराजांनी कबजा केलेला होता, त्याला विजापूरच्या आदिलशाहाने मान्यता दिली.[२५]

पुण्यांत शाइस्तेखानाची छावणी इतकी अफाट होती की, तिच्या खाण्यापिण्यापायीं पुणें प्रांत ओस पडला. तो फार हाल सहन करीत होता.[२६] सर्वत्र गनिमांची धावणी सुरू होती. या वारेमाप फौजेच्या धाडी थांबवावयाच्या तरी कशा? मोंगली फौजा रोहिडखोऱ्यापर्यंत धावणी करूं लागलेल्या पाहून महाराजांनी बाजी ऊर्फ सर्जाराव जेधे यांस पत्र लिहून रयतेस जपण्याची सख्त आज्ञा दिली. महाराज आपल्या प्रजेला किती मायाममतेने जपत असत! पाहा हें पत्र[२७]:

—मा॰ अनाम सर्जाराऊ जेधे देशमुख ता॥ रोहिडखोरे राजश्री सिवाजिराजे सु॥ सलास सितैन अलफ मोगल प्रस्तुत तुमच्या तपियात धावणीस येताती म्हणौन जासुदांनी समाचार आणिला आहे तरी तुम्हास रोखा अहडताच तुम्ही तमाम आपले तपियात गावाचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाळे समत तमाम रयेति लोकास घाटाखाले बांका जागा असेल तेथे पाठवणे जेथे गनिमाचा आजार पहुचेना ऐशा जागीयासि पाठवणे ये कामास हैगै न करणे रोखा अहडताच सदरहू लिहिलेप्रमाणे अमल करणे ऐसियासि तुम्हापासून अंतर पडिलियावरि मोगल जे बांद धरून नेतील त्याचे पाप तुमचा माथा बैसेल ऐसे

समजोन गावाचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकाची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे या कामास एक घडिचा दिरंग न करणे तुम्ही आपले जागा हुशार असणे गावगनाहि सडेकडिल सेतपोत जतन करावया जे असतील त्यासहि तुम्ही सांगणे की डोगरवर आसिरा कुबल जागा आसरे ऐस त्यासि सागणे व गनीम दुरुन नजरेस पडताच त्याचे धावणीची वाट चुकउनु पलोन जाणे तुम्ही आपले जागा हुशार असणे मोर्तब सूद मर्यादेयं विराजते। तेरीख २० माहे रबिलोवल

रुजु सुरनिवीस सुरु सूद

हें पत्र दि. २३ ऑक्टोबर १६६२ ला लिहिलेलें आहे.

राजधर्म हाच महाराजांचा धर्म होता. राजा म्हणजे पृथ्वीचा पति आणि प्रजेचा पिता. प्रवर्ततां प्रकृतिहिताय पार्थिवः।

* * *

---

**आधारः**—(१) पसासंले. ८७१. (२) राजखंड २१।२, ६ व ८४; पसासंले. ८८७. (३) शिचसा ३।४३८. (४) शिभा ३२।२. (५) पसासंले. ८५७,८७१ व ८८७. (६) राजखंड २१।६. (७) पसासंले. ८१२,८२३. (८) पसासंले. ७६५. (९) मंडळ अह. १८३५।पृ. २१०. (१०) पसासंले. ८३९,८४६ व ८६१. (११) पसासंले. ८४८ पृ. २०१. (१२) सभासदब. पृ. २३; म. म. पोतदार गौरव पृ. ३० ते ३७; मंडळांतील सभासदब. अपूर्ण व अप्रसिद्ध प्रत. (१३) जेधे शका. (१४) शिचप्र पृ. ५१. (१५) जेधे शका; शिचप्र पृ. २२. (१६) शिनि १।पृ. २०९ ते २५. (१७) शिचवृसं. ३।पृ. २९. (१८) शिभा २९।६१. (१९) शिचसंवृत्त राजशके २८२।पृ. १६ ( i. e. Selected Waqai of the Deccan ). (२०) शिभा २५।३६ (२१) राजखंड ८।१२. (२२) पसासंले. २६६७; जेधेशका. (२३) शिचसंवृत्त राश २८२।पृ. १७. (२४) पसासंले. ९४०. (२५) पसासंले. ९१७. (२६) ऐसंसा १।१३७; राजखंड १५।२७६; शिभा २५।६० ते ६२; २६।१ व २. (२७) राजखंड १५।२७६.

# इंग्रज कैदी
# * * आणि * * * * * * * * ७ * *
# महाराज

राजापूरच्या स्वारींत महाराजांनी पकडलेले इंग्रज टोपीकर अद्यापहि ( दि. १५ मार्च १६६१ ते १७ जाने. १६६३ ) कैदेंतच खितपत पडले होते. त्यांपैकी कांहीजण वासोटा किल्ल्यावर व कांहीजण प्रथम सोनगडावर व नंतर रायगडावर आदबखान्यांत दिवस मोजीत होते. महाराजांच्या विरुद्ध नाही नाही ते चवचाल चाळे करण्याबद्दलचीं फळें ते भोगीत होते. त्यांच्यापैकी रिचर्ड नेपियर व सॅम्युएल बर्नार्ड हे दोघेजण राजापुरास असतांना कैदेंतच मरण पावले.

जौहरच्या छावणींतून पन्हाळ्यावर तोफा सोडल्या हें पाप इंग्रजांच्या हातून घडलेलें असल्यामुळे त्यांना बोलायला तोंडच नव्हतें. आता त्यांना चिंता पडली होती की, आपण आणखी किती दिवस असें कैदेंत राहाणार ? कधी सुटणार की नाही ? इंग्रजांना पत्रलेखनाची व आलेलीं पत्रें मिळण्याची—वाचण्याची पूर्ण सवलत होती. आमच्या सुटकेसाठी प्रयत्न करा, म्हणून या कैद्यांनी किती तरी पत्रें मुंबईच्या व सुरतेच्या इंग्रजांना लिहिलीं. आपणांस कैद झाली हा आपल्यावर मोठा अन्याय झाला आहे असें त्यांना वाटत होतें ! म्हणजे चोर ते चोर आणि— अशी ही जात आहे.

इंग्रजांनी पन्हाळ्याच्या गुन्ह्याबद्दल दंड द्यावा व पूर्वी दोरोजीमार्फत महाराजांस कबूल केल्याप्रमाणे जंजिऱ्याच्या सिद्दीशीं लढावयास मदत करावी अशी महाराजांची मागणी होती.* इंग्रजांच्या बाबतींत सर्व बोलणीं-

चालणीं करण्याचें काम रावजी सोमनाथ यांच्याचवर सोपविलेलें होतें. हे रावजी मोठे चतुर राजकारणी होते. इंग्रजहि कांही कमी नव्हते. ते कांही तुरुंगांत फक्त जांभया देत बसलेले नव्हते. पत्रव्यवहारांतून मुंबई-सुरतेशीं व रावजी सोमनाथांशीं त्यांचीं राजकारणी लिहिणीं—बोलणीं चालूच होतीं.

हेन्री रीव्हिंग्टनने सुरतेस आपल्या इंग्रजी वखारवाल्या गव्हर्नरला दि १० जून १६६१ ला एक लांबलचक पत्र लिहून शिवाजीकडे आमच्या सुटकेसाठी प्रयत्न करा म्हणून राजकारणें सुचवून आग्रहाची विनंती केली. इंग्रज माणसाचा स्वभाव समजण्यासाठी हा पत्रव्यवहार अगदी पुरेसा आहे.

कैदेंत असतांनाच हेन्री रीव्हिंग्टन फार आजारी पडला. तेव्हा 'बरें वाटतांच परत येईन,' अशा कबुलीवर त्याला महाराजांनी मुदतीची सुटका ( पॅरोल ) दिली. यांत दुसराहि हेतु होताच की, इंग्रजांनी आपल्या वरिष्ठांशीं जंजिऱ्याच्या राजकारणासंबंधी बोलावें. हेन्री दि. १७ ऑक्टो. १६६१ रोजीं सुरतेस गेला. एक वर्षभर तो आजारीच होता. शेवटीं तेथेच तो मरण पावला.

'कैदेंतील इतर इंग्रजांना सोडून द्या,' अशीं अनेक पत्रें सुरतेचा इंग्रज प्रेसिडेंट ॲण्ड्रूज याने महाराजांना पाठविलीं. परंतु महाराजांनी एकाहि पत्राला उत्तरच पाठविलें नाही! कारण या पत्रांत दंडाबद्दल किंवा जंजिऱ्याबद्दल कांहीच गोष्ट नसे. रिकाम्या राजकारणांचा विचार करायला महाराजांना वेळ नव्हता! इंग्रज कैदी मात्र 'आमच्या सुटका करवा, आम्हाला सोडवा' म्हणून आर्जवाने ॲण्ड्रूजला लिहीत होते. प्रे. ॲण्ड्रूजने आपल्या या कैदी बांधवांना शेवटीं एकच खरमरीत पत्र लिहिलें. त्याचा हिंदवी तर्जुमा असा;[२]

'...तुमचीं पत्रें पोहोचलीं. शिवाजीला पत्रें पाठविण्यास आता

आम्हास वेळ नाही. आपल्याला कैद कां प्राप्त झाली हें तुम्ही चांगलें जाणतां. कंपनीच्या मालाचें रक्षण केलें म्हणून ही कैद तुम्हाला प्राप्त झाली नसून पन्हाळ्याच्या वेढ्यांत जाऊन इंग्रजांचें निशाण फडकावून तुम्हीं गोळे उडविल्याबद्दचें हें प्रायश्चित्त आहे. शिवाजी नसता आणि दुसरा कोणीहि असता तरी, ज्याला म्हणून असल्या अत्याचाराबद्दल सूड उगविण्याचें सामर्थ्य आहे तो तसाच वागला असता. व्यापाऱ्यांनी दारूगोळ्यासारखा माल विकावयाचा नसतो किंवा शत्रुसैन्यावर उडवा-वयाचा नसतो. परदेशांत असे उपद्व्याप केल्यास मग त्याचें फळ भोगावेंच लागतें. रीव्हिंग्टनला स्वतःला, शिवाजीची दारूगोळा न विकण्याबद्दलची आज्ञा माहीत होतीच............इ.' ( दि. १० मार्च १६६२. )

प्रे. ॲण्ड्रयूज हा फार कायदेशीर वागणारा, दुसऱ्यांच्या राजकारणांत हात न घालणारा होता असें मात्र नव्हे हो! इंग्रज माणूस प्रथम राजकारणी आणि नंतर उद्योगी असतो. त्यांच्या महत्त्वाकांक्षा अगदी स्पष्ट व मोठ्याच असावयाच्या. इंग्रजांचें साम्राज्य वाढवावें हा अखेर सर्वांचाच हेतु. त्यासाठी मग हव्या त्या धूर्त गप्पा ते मारतील. याच महिन्यांत इंग्लंडच्या राजाने सर ॲब्राहाम शिपमन यास लिहिलेल्या पत्रांत अगदी स्पष्ट शब्दांत हिंदुस्थानांतील भूमीवर आपलें खरें उद्दिष्ट काय हें लिहिलें आहे. इंग्रज राजा लिहितो,[३]

'...आमच्या राज्याला मुंबई बेट ( पोर्चुगिझांकडून मिळवून ) जोडून इतक्या खर्चांत पडण्याचें मुख्य कारण असें आहे की, त्या योगाने आमच्या प्रजेला हिंदुस्थानांत अधिक स्वतंत्रपणें आणि किफायतीने व्यापार करतां यावा आणि त्या भागांतील आमचे ताब्यांतील मुलुख वाढावा आणि......वैभव वाढावें......'

हाच हेतु इंग्रजी मनांत सतत वसत होता.


अशा या इंग्रजांस सतत पथ्यावर ठेवावें व जेवढा त्यांच्या 'अलिप्त' उद्योगांचा स्वराज्याच्या वाढीसाठी फायदा घेतां येईल तेवढा घ्यावा असा महाराजांचा हेतु होता. इंग्रजांनी केलेल्या अपराधाची शिक्षा त्यांना पुरेपूर मिळाली होती. त्यांची राजापूरची वखार पूर्ण उध्वस्त झाली होती. त्यांचा सुमारें नव्वद हजार रुपयांचा माल जप्त केलेला होता. त्यांचीं तीन माणसें मरण पावलीं होतीं आणि इतरांना पूर्ण दोन वर्षें तुरुंगाची हवा खावी लागली होती. या दोन वर्षांत राजापुरांतील त्यांचा व्यापार पूर्णपणें बसून हजारो रुपयांचें नुकसान झालें होतें. शिवाय जंजिऱ्याचें राजकारण साधून घ्यावयाचें होतेंच. म्हणून एवढया कडक शिक्षेनंतर दि.१७ जाने. १६६३ रोजीं महाराजांच्या हुकमावरून रावजी सोमनाथांनी इंग्रजांना किल्ल्यावरून काढून राजापुरांत आणविलें ( दि. २९ जाने. १६६३ ). या वेळीं रावजी सोमनाथ खारेपाटणास होते. ते राजापुरास आले ( दि. २ फेब्रु. १६६३ ) आणि त्यांनी हुकूम देऊन इंग्रजांच्या बेड्या तोडल्या.[४]

मराठी ग्रं. सं. ठा. स्थापना
अनुक्रम २४४८४ वि: चरित्र
क्रमांक ८६८ नों: दि: 12-2-58

आधारः—(१) पसासंले. ८४८. (२) पसासंले. ८७४. (३) पसासंले. ८७४. (४) पसासंले. ९१७.

# राजगड आणि लालमहाल

★ ★ ★ ★ ★ ८ ★ ★ ★



पन्हाळगडाच्या वेढ्याचे वेळीं वैर साधून घेणाऱ्या सुर्वे, जसवंतराव दळवी आणि टोपीकर इंग्रज यांचा पुरता कांटा महाराजांनी काढला. शिवाय शाइस्तेखानाच्या कारतलब व नामदार या दोघां खानांचाहि मोड केला. दाभोळपासून राजापुरापर्यंत प्रदेश घेतला. शिवाय विजापूरकरांनी उघडलेली युद्धाची आघाडीच पन्हाळ्याच्या वेढ्याबरोबर बंद करणें त्यांस भाग पाडलें. हीं एवढीं मोठीं कामें महाराजांनी अवघ्या दीडच वर्षांत उरकलीं ( दि. १३ जुलै १६६० ते जानेवारी १६६२ ).

आता महाराज राजगडावर विचार करीत होते की, या शाइस्तेखानाला स्वराज्याच्या बाहेर कसा हुसकवावा ? जर या वेळीं हुसकला नाही तर हा असाच स्वराज्याला छळीत अन् मराठ्यांना पिळीत राहील. एखाद्या कारतबखानाचा एखाद्या नामदारखानाचा किंवा अशाच एकएकट्या सरदारांचा मोड करीत बसलों तर मोंगल कधीच संपायचे नाहीत. कांही तरी अजब हुन्नर करून खास मुळावर घाव घातला पाहिजे ! खुद्द शाइस्तेखानावर झडप घातली पाहिजे ! महाराज आपल्या धाडसी स्वभावानुसार नवी शक्कल शोधीत होते. गडावर मोरोपंत पेशवे, सर्जाराव जेधे, चांदजी जेधे, चिमणाजी बापूजी व बाबाजी बापूजी वगैरे मंडळी होती. महाराज डाव ठरवीत होते. शके १५८४ ची पौषाची थंडी शेकोटीची ऊब अन् हुरड्याची चव घेत घेत गेली. माघाची शिवरात्र लघुरुद्रांत आणि आंबेमोहोराच्या घमघमाटांत पार पडली. फाल्गुन आला. फाल्गुनांत मावळमराठ्यांचा उत्साह सर्वांत

दांडगा ! होळ्या पेटल्या. आगीननारायेण हसऱ्या मुखाने ओंजळ करून उभा राहिला. गावोगावच्या पाटलांच्या मानाच्या पहिल्या पुरणपोळ्या त्यांच्या ओंजळींत पडल्या. पाटलांच्या मागोमाग गावकऱ्यांचे निवद आले. घरोघरची साजूक तुपाच्या धारेखालची लुसलुशीत पुरणपोळी आणि पिवळ्याधमक वरणाने नटलेली भाताची मूद आगीनदेवाच्या ओंजळींत पडूं लागली. देव संतुष्ट झाला. इडापिडा, विंचूकांटा, खरूजनायटा आगीननारायणाने जाळून टाकला. मराठी मुलखांतल्या पोरासोरांनी टिमक्या पिटून पिटून, हसून गाऊन, फाल्गुनी मंत्रजागरांत होळी जागविली.

असा शिमग्याचा सण पार पडला. फाल्गुनी रंगपंचमी रंगांत रंगली. मराठेशाहीच्या शिरस्त्याप्रमाणे सण साजरे झाले. पण महाराजांचें सर्व लक्ष पुण्यांतल्या लाल महालावर खिळलें होतें. या शाइस्तेखानाला हाणल्याखेरीज त्यांच्या मनाला स्वस्थता वाटेना. राजगडावर राजकारण खलतां खलतां फाल्गुनाची आवस झाली.

आणि अखेर महाराजांनी डाव ठरविला. डाव फारच अवघड. महाराजांचे डाव नेहमीच अवघड. पण आजवर कधीहि हुकला नाही, चुकला नाही. कारण संगतीचे खेळगडी पट्टीचे अन् एका गट्टीचे होते. पाठीशीं मायभवानी आशीर्वादाचा हात पांघरून उभी होती. हृदयांत तळमळ होती. मग अपेश का म्हणून येईल ? महाराजांचा डाव मोजक्यांनाच ठाऊक असायचा. इतरांनी बिनबोभाट पार पाडायचा.

एकदम रात्रीच्या मध्याला लाल महालांत शिरायचें अन् खानालाच उडवायचें, असा हा डाव होता ! केवढें धाडस हें ! खानाच्या दाढेंतच जाणें होतें ! लाल महालाच्या परिसरांत लाख पाऊण लाख फौज पसरलेली होती. जसवंतासिंह आणि सुमारें इतर साठ सरदार त्यांत होते. पुण्याच्या हद्दीवर खानाने इतका कडक पहारा ठेवला होता की, एकहि

मराठा माणूस विचारपूस केल्याविना तो सोडत नव्हता.[१] आता इतक्या भयंकर कडेकोटांतून खानाच्या स्वप्नांत जाणें सुद्धा कठीण होतें. अन् धाडस करून घुसलेंच आंत तर जिवंत परत यायची आशाच नव्हती. खानाच्या हातीं सापडल्यावर खान जिवंत जाळील, तेलांत तळील की मुंडकीं छाटून दिल्लीला धाडील हें सांगणेंच कठीण !

केवढा भयंकर बेत हा ! खान ज्या वाड्यांत राहिला होता तो लाल महाल केवढा दणकट वाडा. आंत शिरायला मोठ्या दरवाजाशिवाय दुसरी वाट नाही. एक वेळ पुण्यांत शिरतां येईल. तेंहि मुष्कीलच. पण लाल वाड्यांत शिरणें अगदी अशक्य ! अगदी अशक्य ! वेड का काय ! नकळत अगदी खूप चोरून छपून शिरायचें म्हटलें तरी कधी कुणाच्या नाकांत शिरतां येईल का ? वळवळेल ना तिथे ! लाल महालांत नाकांतल्या केसांसारखा सख्त पहारा होता सर्वत्र. फटाफट शिंका याव्या तशा फटाफट बंदुकांचा फैरी झडतील की ! छे ! निव्वळ वेडेपणा हा ! पण महाराजांची हौसच न्यारी !

पण महाराजांच्या शब्दांतून बेत निघाला. बस्स् मग काय वाटेल तें होवो, तो पार पाडलाच पाहिजे, हा प्रत्येकाचा निर्धार. प्रत्येकजण तयार झाला.

— आणि महाराजांनी ठरवलें की, स्वतः जातीने जायचें ! स्वतः लाल महालांत घुसायचें ! स्वतः खानावर झडप घालायची ! महाराज येणार म्हटल्यावर बाकीच्यांना जास्तच सुरसुरी आली.

पण केवढा जिवावरचा खेळ हा ! तोफांच्या गराड्यांत एक लाख फौज, एक लाख फौजेंत गुरफटलेला वाडा, वाड्यांत दालनें पन्नास, अन् त्यांतल्या कुठल्या तरी दालनांत शाइस्तेखान असणार. आता हे आधी पुण्यांत जाणार कसे ? गेलेच तर लाल महालांत शिरणार कसे ? शिरले तर खानापर्यंत पोहोचणार कसे ? पोहोचलेच तर—? मग कांही

कठीण नव्हतें ! एक घाव दोन तुकडे ! पण एवढें जमावें कसें ? मोंगलांनी ओळखलें, गराडलें, पकडलें म्हणजे मग ?

पण एकदा ठरलें म्हणजे ठरलें. सगळा बेत अगदी गुप्त होता. डाव्या कानाने ऐकलेलें उजव्या कानापर्यंत पोहोचत नव्हतें. राजगडावर बेत बनत होता. काय काय करायचें, कसें कसें करायचें, कुणाचें काम काय, याचा अगदी लग्नांतल्या मानापानासारखा बेत चालला होता. महाराजांभोवती बसून खानसाहेबांच्या पाठवणीची तयारी चालली होती.

त्यांत एका माणसाची उणीव होती, म्हणूनच की काय नेताजी पालकर मोंगलाई हद्दींतून लूट घेऊन राजगडावर दाखल झाला ! नेताजीने बरीच लूट गोळा करून आणली होती.[२] परंतु मोठ्या संकटांतून शिताफीने बचावून सहीसलामत तो आला होता. मोंगलांशीं झुंजतांना तो स्वतः जखमी झाला होता. मोंगलांच्या हातींच सापडायचा फक्त वांचला तो. त्याचे तीनशे घोडे ठार झाले. पाठलाग चुकविण्यासाठी जखमी स्थितींतहि रोजीं बावीस ते पंचवीस कोसांची दौड मारीत तो निसटला[२] व राजगडावर आला.

चैत्राचा पाडवा उजाडला. गडागडांवर नवे भगवे झेंडे चढले. गुढ्या चढल्या. नवें संवत्सर–शुभकृत संवत्सर शके १५८५–उदय पावलें. दशरथाच्या कौसल्येला डोहाळे लागले होते ! नव्हे, नऊ मास पूर्ण झाले होते. आता फक्त नऊच दिवस अवकाश होता. चैत्र शुद्ध नवमीला रामचंद्र जन्माला येणार होता. पृथ्वीला दैत्यांच्या जाचांतून मुक्त करण्याकरिता.

—आणि महाराजांनी खानाच्या जाचांतून स्वराज्य सोडविण्यासाठी छापा घालायला मुहूर्त ठरविला चैत्र शुद्ध अष्टमीचा. रामजन्माच्या आधी फक्त चोवीस तास. नव्हे नव्हे, बाराच तास ! मध्यरात्रीच्या सुमारास ( दि. ६ एप्रिल १६६३, चैत्र शु. ८ मध्यरात्रीं बारानंतर ).

महाराजांनी दिवस ठरविला. अगदी गुप्तपणें सारी तयारी सुरू झाली. सर्वांची तहानभूक अन् झोप उडाली. पुण्यांत लाल महालावर छापा आणि शाइस्तेखानावर झडप घालायची कशी याची अगदी तपशील-वार कुंडली तयार झाली. कोणत्या ग्रहाने कोणत्या जागेंत दडायचें, कोणत्या नक्षत्राने कुठें कसें एकदम उगवायचें, कोणी किती गतीने पुढे सरकायचें वगैरे सगळें ठरविलें महाराजांनी.

दिवस मावळला. मोरोपंतांना आणि नेताजीला महाराजांनी आज्ञा केली. लगेच निघायची तयारी सुरू झाली. सारें कांही आधीं ठरलें होतें. त्याप्रमाणे अगदी निवडक दोन हजार[३] चखोट मराठी चपळ मंडळी गडाच्या पद्मावती माचीवर जमली. आईसाहेबांचा आशीर्वाद आणि जगदंबेचें दर्शन घेऊन महाराज निघाले. नेताजी, मोरोपंत, बाबाजी देशपांडे, चिमणाजी देशपांडे, सर्जाराव व चांदजी जेधे असे खासे खासे सरदार सांगाती घेतले. सड्या स्वारीनिशी गडाखाली आले. चारशे हशम मावळे खास आपल्या दिमतीस महाराजांनी घेतले. उरलेल्या फौजेच्या दोन तर्फा केल्या. एक तरफ मोरोपंतांच्या व दुसरी नेताजीच्या हाताखाली दिली. महाराज राजियांनी ढाल व तलवार घेतलेली होती. बिनीवर बाबाजी व चिमणाजी हे भाऊ भाऊ चालले. मागोमाग खासा राजश्री. त्यांचे मागोमाग मोरोपंत पेशवे व नेताजी सरनौबत असे चालले.[३]

महाराज प्रत्येक संकटाच्या प्रसंगीं भयंकर अवघड मनसुब्यांत उडी घेत. आईसाहेबांना फार काळजी वाटत राही. त्या स्वतः आता थकत चालल्या होत्या. म्हातारपण आलें. म्हातारपणीं मुलगा,–तोहि एकुलता एक असल्यावर, आपल्या डोळ्यासमोर सतत असावा असें आईला काय अन् वडिलांना काय वाटणें स्वाभाविकच असतें. आईसाहेबांनाहि तसें कांही वाटत नसेल काय? जिवावरच्या प्रसंगांत उडी घ्यावयास शिवबा

निघालेला पाहून त्यांचें मातृहृदय हिन्काळत नसेल? नाही कसें? असणारच. परंतु शिवबाचें जन्मव्रतच परित्राणाय साधूनाम्—! आता यमुनेच्या डोहांत कालिया शिरून बसला. तीन वर्षें झालीं. सगळ्या गोकुळाला संकट पडलें. डोहांत कालिया शिरला. त्याला नको मारायला? तसाच राहूं देऊन कसें चालेल? गोकुळचीं गाईवांसरें मरताहेत. गोऱ्यागोजिऱ्या गोपींना तें हिरवें विष बाधतेंय. यमुना हालांत जगतीय. आता नको का कोणी उडी घ्यायला? यशोदेच्या बाळानेच घालायची उडी.

महाराज पुण्यापासून अर्ध्या कोसावर[२] काळ्या वावरांत येऊन पोहोचले. आभाळांतील अष्टमीचा शुद्ध चंद्र झाडांच्या खांद्याफांद्यांतून चांदण्याचे लाह्या-बत्तासे टाकीत होता. मध्यरात्रीचा सुमार. रातकिडेच फक्त आवाज करीत होते. महाराज तेथेच पायउतार झाले. खानाच्या छावणींतील कुल मुस्तकीम खबर आधीच गुप्त हेरांकडून आणविली होती.[३] त्याप्रमाणेच सर्व योजना दक्षतेने व दूरंदेशीपणें आखलेली होती.

हा महिना रमजानचा होता. आज सहावा चंद्र होता. मोंगली फौज धर्मनियमाप्रमाणे उपवास करीत होती. शाइस्तेखानाच्या परिवारांतील मंडळीहि उपवास करीत होती. हा उपवास सबंध महिना-भर करावयाचा असतो. पण हें कसें शक्य आहे? म्हणून त्यांतून एक सापा मार्ग ठेवलेला असे. सबंध दिवसांत कांहीहि खायचें नाही; फक्त रात्रीं व अगदी पहाटे पोटभर खावयास हरकत नाही, अशी रीत होती. या गोष्टीचा नेमका परिणाम काय होई? सबंध दिवसभर कांहीहि न खाल्ल्यामुळे रात्रीं खूपच सडकून भूक लागत असे. आणि मग सपाटून जड पदार्थ खाऊन घेण्याकडे माणसाचा कल जाई. असा कल जाई अन् त्यांतून रात्रीची वेळ असे. त्यामुळे मंडळींना कलंडायला वेळ लागत नसे. आणि मग गाढेगाढ झोप लागे. हा

अगदी नैसर्गिक परिणाम घडावयाचाच ![४]

—हेंच नेमकें लक्षांत घेऊन महाराजांनी छाप्यासाठी रोज्यांच्या महिन्यांतील दिवस निवडला. शिवाय शहरांत चौक्या-पहारे कसे व कुठे कुठे आहेत, लाल महालाच्या आवतीभवती काय स्थिति आहे, एकूण राबता कसा कसा चालत आहे, इत्यादि माहिती महाराजांनी आधी मिळवून ठेवलेली होतीच.

काळ्या वावरांत महाराजांनी नेताजी व मोरोपंत या दोघांना त्यांच्या त्यांच्या तुकड्यांनिशी ठेवलें. शिवाय ठिकठिकाणीं कर्यात मावळच्या मार्गावर आपले लोक गुप्तपणें महाराजांनी ठेवले होतेच.[५] त्यांच्यापाशी खुणेचे इशारे करण्यासाठी नगारे, शिंगें व कर्णे वगैरे सामान दिलें होतें. मारामार करून कार्यभाग उरकल्यावर महाराजांनी व छापेवाल्या मावळ्यांनी सिंहगडाकडे पळावें; सर्जाराव जेध्याने महाराजांचा घोडा सज्ज करून ठरवून दिलेल्या जागीं उभें राहावें; महाराजांनी पळून जाण्याच्या वेळीं तेथे येऊन घोड्यावर बसून दौडावें असें ठरलें होतें.[५]

या सर्व योजनेंत प्रत्येकावर निश्चित, नेमून दिलेली व जोखमेची कामगिरी होती. एकजण जरी चुकला किंवा घाबरला तरी सर्वच नाश! मरणच! खानाला घरबसल्या आयती शिकार! त्यांतल्या त्यांत बाबाजा व चिमणाजी या दोघां भावंडांचीं कामें फार अवघड होतीं. हे दोघेजण देशपांडे महाराजांच्या फारच प्रेमांतले होते.[३] यांचे वडील बापूजी मुद्गल देशपांडे हे महाराजांच्या अगदी बालपणीं लाल महालांत चाकरी करीत होते. ते होते पुणें प्रांताचे हवालदार.[६] तेव्हापासून महाराजांची बाबाजी-चिमणाजींशीं दोस्ती. अति प्रीत. बाळमित्र.

एकूण कामगिरी सर्वच अवघड होती. जिवावरची होती. लाख फौजेच्या गराड्यांत शिरून, चिरेबंदी वाड्यांत शिरून, खानाला मारून,

स्वतः जिवंत परत यायचें होतें ! नाही सांगतां येत, हें किती दुष्कर कर्म होतें तें ! आपणच कल्पना करा ! आपणच विचार करा की, स्वतः त्यांत आहोंत !

महाराजांना व बाबाजी आणि चिमणाजी यांना पुणें शहराची व विशेषतः लाल महालाची खडान् खडा माहिती होती. कारण तेथे त्यांचें बालपण गेलें होतें.

चिमणाजी व महाराज यांनी आपल्याबरोबर दोनशे मावळ्यांची तुकडी घेतली. त्यांत कोयाजी बांदल व चांदजी जेधेहि होते. दुसरी तुकडी दोनशे मावळ्यांची बाबाजीच्या हाताखाली दिली. आणि निघाले.[३] यावेळीं मध्यरात्र उलटून गेली होती.[३]

खानाचें लष्कर रोज्याचे उपवास सोडून व जडान्न खाऊन गाढ झोपलें होतें. चौक्या, पहारे व गस्ती मात्र जाग्या होत्या.

खुद्द लाल महालांत एका मोठ्या दालनांत अनेक पडदे वापरून एकांत एक अशा अनेक खोल्या बनविलेल्या होत्या. जनान्याच्या राहाण्याची व्यवस्था त्यांत होती. खानहि यावेळीं त्यांतच होता. याशिवाय खोल्या, ओसऱ्या, दालनें, कचेऱ्यांची जागा, आबदारखाना वगैरे अनेक सदरा-सोप्यांनी व व्यवस्थांनी लाल महाल सजलेला होता. पंत दादाजी कोंडदेवांनी हौस धरून बांधलेला वाडा हा. वाड्यांत देवडीवर व आंतहि जागोजाग पहारे होते. खान झोपलेला होता. जनाना, जनान्यांतील दासी व नोकरचाकर झोपलेले होते.[३]

महाराजांची व चिमणाजीची टोळी शहराकडे निघाली. त्यांच्या मागोमागच बाबाजी देशपाड्यांची टोळी येत होती. अवघड परीक्षांना आता सुरुवात होणार होती. शहराभवती म्हणजेच खानाच्या छावणी-भवती सख्त पहारे होते. खास पुण्याची वस्ती ती किती ? कसब्याचें गाव, म्हणजे फार तर तीन हजार, चार हजार. परंतु छावणीच्या

पसाऱ्यान पुणें फार मोठें बनलें होतें. महाराजांचीं हीं सर्वच माणसें म्हणजे महा बिलंदर. त्यांच्या वागण्या-बोलण्यांत किंवा चेहऱ्यावर अगदी किंचितहि संशय घेण्यासारखीं चिन्हें कधी दिसायचीं नाहीत. आपण शिवाजीच्या गावचेहि नव्हेत असा विलंदर भाव आणि आव बेमालूमपणें त्यांनी आणला होता. खुद्द महाराजहि त्यांतच जमा. त्यांची आणि शिवाजीची ओळखहि नव्हती! न चाचरतां न कचरतां सारे हे लबाड लोक चालले होते खानसाहेबांना भेटायला!

छावणी आली. पहाऱ्यांच्या चौक्या होत्याच. हे सरळ थेट निघाले, तेव्हा अर्थात् चौकीवाल्यांनी अडविलेंच. तुम्ही कोण लोक? कोठून आलांत? कुठे निघालांत? प्रश्नांची सरबत्ती अशी सुरू झाली. पण या महा वस्तादांनी पहारेकऱ्यांना हातोहात चकविलें. चिमणाजीने आणि इतरांनीहि अगदी सहज सफाईने उत्तरें ठोकून दिलीं की,[१]

"आम्ही कटकांतील लोक! चौकीपहाऱ्यास गेलों होतों!"

—आम्ही आपल्याच मोंगल छावणींतील माणसें आहोंत की! रात्रीची छावणीबाहेरच्या छबिन्याची गस्त घालावयास गेलों होतों! काम संपवून माघारीं परतलों आहोंत!

महाराजांच्या माणसांची ही बतावणी इतकी सहज पचली[२] की, जागोजागचे चौकीवाले विचारीत होते अन् त्यांना हें उत्तर खरें वाटत होतें. त्याचें कारणच तसें होतें. शाइस्तेखानाच्या लष्करांत खूप मराठी फौजाहि होती. कारण शिंदखेडचे जाधवराव, सर्जेराव घाटगे, गाढे, कोकाटे, गायकवाड, काकडे, खंडागळे, पवार, भोसले, होनप—देशपांडे, रायबागन वगैरे मराठी सरदार खानाच्या फौजेंत महाराजांविरुद्ध सामील झालेले होते. त्या सर्वांचें लष्कर खानाच्या छावणींतच होतें. छावणीवर छापे पडूं नयेत म्हणून नेहमीच अशी रीत असे की, छावणीपासून कोस दीड कोस तरी लांबवर टेहळणीसाठी फिरते

सैनिक ठेवावयाचे. ह्यांना म्हणायचे 'छबिन्याचे पहारेकरी'. एवढ्या मोठ्या एक लाख फौजेंत कोणचीं माणसें कोणाचीं, हें कोणाला ओळखूं येणार? आणि त्यांतून मोंगली कारभार. ढिलेपणा, बावळटपणा आणि निर्बुद्धपणा यांची चढाओढ लागलेली.

हे आता पुण्यांत शिरणारे मराठे असेच थेट खानाचा गळा कापायला जाणार आहेत, अशी शंकाहि त्या पहारेकऱ्यांना आली नाही. इतकेंच काय, पण लाल महालांत शिरून आज कोणीं तरी दगा करणार आहेत असें त्यांना कोणीं सांगितलें असतें तरीहि त्यांना खरेंच वाटलें नसतें. हसले असते ते.

शिवाय ठिकठिकाणच्या पहारेकऱ्यांनी असाहि विचार केला असावा की, मागच्या पहारेकऱ्यांनी यांची अधिक पूसतपास केलीच असेल! त्यांच्या ओळखीचेहि असतील हे लोक! अशा रीतीने महाराज प्रत्यक्ष स्वत: आणि त्यांचे चारशे चेले सरळ छावणींत प्रवेशले. मग कोण विचारतो! लग्नाच्या घाईगर्दींत कांही सभ्य लबाड कित्येकदा कसा डाव साधून घेतात! त्यांचा कोणालाहि संशय येत नाही. वरपक्षीयांना वाटतें की, हे लोक वधूपक्षाचे असतील आणि वधूपक्षीयांना वाटतें की, हे लोक वरपक्षाचे असतील! आणि अखेर हे 'लबाडपक्षी' दोन्ही पक्षांकडचींहि पानसुपारीचीं चांदीचीं भांडीं घेऊन पसार झाल्यावर मग—? दोन्हीहि पक्ष एकमेकांच्या नांवाने खडे फोडीत बसतात!—अगदी नेमकें तसेंच हें! लग्नाची वऱ्हाडगर्दी आणि मोंगलांची छावणी एकसारखीच!

मग ही मंडळी मात्र अधिकच सावधतेने पण सहज भावाने लाल महालाकडे निघाली. एकदम घोळका दिसूं नये, संशय येऊं नये अशी काळजी ते घेत होते.

• लाल महालांत मुदपाकखान्याची म्हणजे स्वयंपाक तयार करण्याची

जागा होतीच. आबदारखाना, म्हणजे वापरण्यासाठी पाणी भरून ठेवण्याची जागा व मुदपाकखाना स्वाभाविकपणें जवळजवळच होते. या मुदपाकखान्यांतून थेट जनानखान्यांत जाण्यासाठी फक्त एक दिंडी होती. ही दिंडी साध्या मातींत विटांचें बांधकाम करून बंद करून टाकण्यांत आली होती. कारण जनानखान्याचा आलिप्तपणा चांगला राहावा म्हणून! मोंगली जनान्यांत पडद्यांची झाकापाक फार कडक असायची.[७] येथेहि तीच गोष्ट होती. पडद्यांची बाडेंच्या बाडें टांगून जनान्याचे महाल बंदिस्त केलेले होते.[८] जणू कांही सगळ्या बेगमा बाळंतिणींच्या खोल्यांतच विराजमान झाल्या होत्या, बाळंतविड्याची वाट पाहात! तें असो!—तर ही अशी दिंडी चिणून बंद केलेली होती. मुदपाकखान्यांत आचारी व नोकरचाकर झोपलेले होते. सगळ्यांत महत्त्वाची जागा हीच होती. मुदपाकखान्यांत शिरल्यावर पुढचा बेत जमूं शकणार होता. अभ्यास, स्मरण, तर्क, निरीक्षण आणि काळकामवेगाचा प्रमाणबद्ध विवेक करून अगदी काटेकोर योजना करावी महाराजांनीच. अन् ती पार पाडावी महाराजांच्या जिवलगांनीच. महाराजांनी सर्व गोष्टी कांही आयत्या वेळीं केलेल्या नव्हत्या. आधीच ते योजना करीत. योजना! योजना! उत्कृष्ट पूर्वयोजना म्हणजे निम्में यश. योजना न करतां मिळालेलें यश म्हणजे केवळ दैवी योगायोग. तें पूर्ण यश नव्हेच.

मुदपाकखान्यांत कसें व कुठून घुसायचें हें महाराजांना ठाऊक होतें. आंत शिरण्याची एकच अगदी साधी वाट होती. मुदपाकखान्यांतील नोकरचाकर, भिस्ती, पाणक्ये इत्यादि लोकांच्या येण्याजाण्याची (लाल महालाच्या पिछाडीस? परसांत?) ही वाट होती. ही वाट म्हणजे सर्वसामान्य दार असावें असें वाटतें. मोठा किंवा रुबाबदार दरवाजा नव्हता. ही वाट लक्षांत ठेवूनच महाराजांनी योजना केली होती.[९]

महाराज आपल्या साथीदारांसह आले आणि त्यांनी या चिरपरिचित वाटेंतून मुदपाकखान्यांत प्रवेश केला.[१] त्यांच्या मागोमाग पटापटा पण बिनबोभाट चिमणाजीच्या व बाबाजीच्या टोळ्यांनी प्रवेश केला. अंधार दाट होता. तलवारी उपसून यमदूतांच्या या काळ्याकुट्ट सावल्या दबत दबत पुढे सरकत होत्या. मुदपाकखान्यांत भांड्यांचा व कुणीतरी बोलत असल्याचा आवाज येऊं लागला.[१] सावल्या पुढे जाऊन डोकावल्या. पाहातात तों कांही लोक झोपलेले होते, कांही लोक स्वयंपाकाचीं भांडीं स्वच्छ करीत होते व कांहीजण स्वयंपाकाची तयारी करूं लागलेले होते.[१] हे सर्वजण शाइस्तेखानाचे आचारी होते. रोज्याचे उपवास चालू असल्यामुळे सर्व मंडळी पहाटेच जेवून घेत. म्हणून इतक्या लौकर हे आचारी खानाचा खाना तयार करण्याच्या कामीं लागले होते. मुदपाकखान्यांतून जनानखान्यांत जाण्यासाठी एक दिंडी होती ती माती-विटांनी बंद करून टाकलेली होती. तें बांधकाम पाडून महाराजांना पलीकडे जायचें होतें. वाट पाडायची म्हणजे थोडा तरी आवाज होणारच आणि त्या आचाऱ्यांना चाहूल लागणारच. म्हणून–

बिचाऱ्या आचाऱ्यांचे दैव फिरलें. निरुपाय होता. मावळ्यांनी अंधारांतून एकदम त्या भटारखान्यांत घुसून आवाजहि उमटूं न देतां व आचाऱ्यांच्या लक्षांतहि येऊं न देतां, त्या काम करणाऱ्या व झोपलेल्याहि आचाऱ्यांना ठार मारून टाकलें ![१]

लगेच तें माती–विटांचें बांधकाम पाडावयास सुरुवात झाली. त्याला फारसा वेळ लागलाच नाही. विटा भसाभस निघूं लागल्या. भगदाड पडलें. परंतु आंतली दिंडी बंदच होती. ती उघडण्याची धडपड सुरू झाली.[१]

याच वेळीं मुदपाकखान्याच्या पलीकडे आंतल्या बाजूस खानाचा एक नोकर झोपलेला होता, तो एकदम दचकून जागा झाला. त्याल

आवाजांची चाहूल आली. तो ताडकन् उठला आणि तसाच भराभरा-भरा शाइस्तेखानाकडे निघाला![१]

—दिंडी उघडली गेली. छातांडें धडधडत होतीं. प्रथम आंत शिरला चिमणाजी देशपांडा. मागोमाग महाराज. त्यांच्या मागोमाग मावळे.[३]

—तो नोकर घाबऱ्या घाबऱ्या खानाकडे आला. मोठ्या पहाटेच्या साखरझोपेंत खान सुखावला होता. तेवढ्यांत हा आला आणि त्याने खानाला हाका मारून उठविलें. चिडाचिडून खान उठला. त्याची झोप दुखावली गेली. चाकराने खानाला सांगितलें की, भटारखान्यांत कांही तरी गडबड आहे. तेथे आवाज ऐकूं येत आहेत![१] परंतु खानाला त्या नोकराचाच राग आला.[१]

भटारखान्यांतून आवाज येताहेत म्हणे! तेथे कोण गडबड करीत असतो काय? खानाने उत्तर दिलें की, आचारी लोक खाना पकवण्या-साठी उठले असतील![१]

हो! बरोबरच होतें खानसाहेबांचें! स्वयंपाकघरांत करून करून गडवड कोण करणार? आचारी नाही तर उंदीर! तेवढ्यासाठी खास हुजूर अख्दसना उठवायची काय जरूर?

खानाला काय कल्पना की, खरोखरच भटारखान्यांत उंदीर आले आहेत! डोंगरांतील उंदीर!

महाराजांसह मावळे आंत आले आणि भराभरा चौफेर महालांत धावत सुटले. जागोजागचे पहारे छाटण्यास त्यांनी सुरुवात केली.

हे लोक त्या दिंडींतून आंत घुसत असतांनाच खानाच्या दासी जाग्या झाल्या. त्यांनी त्या दिंडींतून तलवारी घेतलेले लोक आंत घुसतांना पाहिले. एका मागोमाग एकेक दासी खानाकडे धावत निघाली. दगा! कोणी तरी भयंकर लोक दिंडी फोडून आंत घुसलेत, अशा खबरी त्यांनी खानाला घाबऱ्या घाबऱ्या सांगितल्या. मधून अधून

आरोळ्या, किंकाळ्या उठूं लागल्या. आता मात्र अमीर उल उमरा शाइस्तेखान घाईने एकदम उठला. धनुष्य–बाण आणि भाला घेऊन खान जलदीने निघाला. एवढयांत कांही मराठे त्याच्या समोर आले. खानाने झटकन् एका मराठयावर बाण सोडला. पण तरीहि त्याने पुढे झेप घेऊन खानावर वार काढला. पण तेवढयांत कांही हुशार बायकांनी समया व शामादानें फुंकून विझविलीं. या झटापटींत त्यांतील दोन मराठे खानापुढे असलेल्या पाण्याच्या हौदांत पडले! त्या हुशार बायकांनी अंधारांत खानास हाताने धरून बाजूला नेलें. दिवे विझल्यावरोबर अंधारांतच मराठ्यांच्या तलवारी फिरूं लागल्या.[२] परमेश्वराची इच्छा असेल तो मरेल! मराठे तरी काय करणार त्याला! महाराज शाइस्तेखानाचा शोध घेत होते. त्यांना खानच हवा होता.[३]

बाबाजीनेहि धुमाकूळ सुरू केला होता. कांही पहारेकरी सावध होऊन झुंज देत होते. मावळ्यांनी आरंभींच पहारेकऱ्यांच्या देवड्यांत व खोल्यांत घुसून तेथे झोपलेल्या आणि जागे झालेल्या मोंगली हशमांना, “ असा पहारा करतां काय ? ” असें म्हणत म्हणत कापून काढलें होतें. सगळी तारांबळच. जो तो ओरडत होता. कोण आले, कोठून आले, आहेत किती हें कांहींच समजेना! महाराज किंवा मराठे स्त्रियांवर कधीहि शस्त्र धरीत नसत. परंतु अंधारांत फिरणाऱ्या तलवारींखाली खानाच्या दोन बायका सापडल्या. त्यांत एकीला तीस चाळीस जखमा झाल्या. ( पण तरीहि ती पुढे बचावली हें आश्चर्य! ) पण दुसरीचे अगदी असंख्य तुकडे झाले.[१] आग लागल्यावर आगींत सापडलेले लोक ओरडतात तसा भयंकर आरडाओरडा लाल महालांत उडाला होता. आगीविना लाल महाल पेटला होता! या गोंधळांत मराठेहि आरोळ्या मारीत होते. सैरावैरा लोक धावत होते. त्यांतच कांही मराठे वाड्यावरच्या नगारखान्यांत घुसले. तेथील वाद्यें वाजवणारे लोक तेथे होते. मराठ्यांनी

त्यांना हुकूम सोडला की वाजवा, नगारे चौघडे वाजवा ! खानसाहेबांचा हुकूम आहे ! वाजवा ![१] आणि मग एकच कल्लोळ उडाला. लष्करांतील लोक हा गोंधळ ऐकून वाड्याकडे धावत सुटले. परंतु मराठ्यांनी वाड्याचीं दारें—दरवाजे आंतून लावून घेतले होते ![१] नगाऱ्या-चौघड्यांचे दणदणाटांत मराठे खानाची दाणादाण उडवीत होते.

गोंधळ सुरू होतांच शाइस्तेखानाचा तरुण व शूर मुलगा अबुल फत्तेखान झोपेंतून जागा होऊन तलवार घेऊन धावला. त्याने दोन तीन लोकांस ठार मारलें. बापाचा जीव वांचवण्यासाठी हा तरुण धडपड करीत होता. पण तोच अखेर जबरदस्त जखमी झाला आणि मरण पावला. महाराजांच्या माणसांनाहि जखमा होत होत्या. चांदजी जेधे आणि कोयाजी बांदल असेच जखमी झाले.[५] खान जीव मुठींत धरून बसला होता.


खानाच्या बायकांनी खानाला जनान्यांतील एका पडदानशीन दालनांत नेलें होतें. तेथे आणखी कांही स्त्रिया होत्या. एवढ्यांत पडदा फाटला ! टर—टर—टर आवाज करीत महाराजांची तलवार पडद्यांत घुसली. बायकांनी किंकाळी फोडली. तेवढ्यांत खान आपली तलवार घेण्यासाठी उठला. पण महाराजांची नजर गेलीच. ते खानावर धावले. अंधार होता. महाराजांनी खानावर अंदाजाने खडाडकन् घाव घातला.[२] तेव्हा आरडाओरडा भयंकर उडाला. महाराजांना वाटलें खान मेला. परंतु खान मेला नाही. त्याच्या उजव्या हाताचीं तीन बोटें तुटलीं.[३]

चौकांत आणखी एक प्रकार घडला. हल्ला होऊन वाड्यांत आरडा-ओरड झाल्यावर वाड्यामागील एका धाडसी जमातदाराने बाहेरून वाड्याला शिडी लावली व वर चढून त्याने भिंतीवरून वाड्यांत उडी टाकली. पण त्याने उडी टाकतांक्षणींच मराठ्यांची झडप त्याच्यावर पडली आणि त्यांनी त्याला ठार मारलें.[१]

या वेळेपर्यंत वाड्यावाहेर खूप मोठें लष्कर गोळा झालें होतें. गनीम आला, या बातमीने छावणींतील लोक खडवडून उठले होते. लोक ओरडत होते, ' गनीम आया ! दगा ! ' मराठ्यांनीहि तसेंच ओरडायला आरंभ केला ![३] गनीम, गनीम ! कहां है गनीम ?

अखेर कोणीं उघडला कोण जाणे, पण लाल महालाचा दरवाजा आंतून उघडला गेला. लष्कराची गर्दी गनिमाला शोधायला आंत घुसली. अंधारांत, अर्धवट उजेडांत. त्याच गर्दीमध्ये ' गनीम गनीम ' म्हणून ओरडत, महाराज आणि मराठेहि सामील झाले ![३] सर्वच मोंगली गोंधळ ! महाराजांनी त्याचा पुरेपूर फायदा घेतला. शत्रूची शोधाशोध

*खानाचा काळ आला......परंतु वेळ चुकली......*



सर्वत्र छावणीभर सुरू झाली ! त्याच गडबडींत सामील होऊन महाराज व मराठे पसार झाले.[३]

मोरोपंत व नेताजी छावणीबाहेर उभे होते. महाराज येतांच सर्वजण एक होऊन व वाटेवर ठिकठिकाणीं ठेवलेल्या मावळ्यांच्या टोळ्या घेऊन सिंहगडकडे अत्यंत झपाट्याने दौडत दौडत पसार झाले.


लाल महालांतील रडारड आणि गोंधळ अजून चालूच होता. खानाचे सैनिक छावणींत धावपळ करीत गनिमांना शोधतच होते ! शाइस्तेखानाच्या तुटक्या बोटांतून रक्त ठिपकतच होतें.

* * *

---

**आधारः**—(१) शिचत्रूसं. ३ । पृ. ६८. (२) पसासंले. ९२३ व ९२७. (३) सभासब. पृ. ३२ ते ३४; शिचत्रूसं. २ । पृ. ६४; शिचवृ सं. ३ । पृ. ६८ व ६९; पसासंले. ९३०, ९३५, ९३७ ते ९३९; जेधेशका व करीणा; शिचसा खं. ५।७७४; F. B. of Sh. 197–8. (४) Shivaji–Times 87. (५) जेधे करीणा (६) राजा शिवछत्र. भा. १ पाहा. (७) ST–DO–M प्रस्तावना पाहा. (८) Shivaji– Times, 88; सभासदब. पृ. ३३. (९) शिचत्रूसं. ३।६८ व ६९. (१०) पसासंले. ९३०.

# लाल महाल
# * * आणि * * * * * * * ९ * *
# किल्ले कोंढाणा



तलवारीने महाराज अंधारांत आंधळी कोशिंबीर खेळले आणि लाल महाल रक्ताने लाल लाल होऊन गेला! खानाचीं एकूण पंचावन्न माणसें ठार झालीं. त्यांत त्याचा मुलगा अबुल फत्तेखान हा होता. विचारा खरोखरच दुर्दैवी! एकच दिवस आधी (दि. ४ एप्रिल १६६३) तो पुण्याच्या छावणींत दाखल झाला होता. तो अगदी तरुण होता, तितकाच धाडसी व शूर होता. स्वत: होऊन संकटांत उडी घेऊन, बापाला वांचविण्यासाठी तो धावला आणि लढतां लढतां मेला. खानाचे इतर दोन पुत्रहि जखमी झाले.[२] शिवाय एक जावई, एक सेनाधिकारी सरदार, चाळीस मोठे दरखदार व बाराजणी स्त्रिया ठार झाल्या.[३] त्यांत खानाची एक बेगम तर फार भयंकर रीतीने ठार झाली. अंधारांत तिच्या शरिराचे इतके तुकडे तुकडे झाले की, शेवटीं टोपल्यांत भरूनच तें छिन्नविछिन्न प्रेत दफनासाठी न्यावें लागलें.[१] पण हा दोष मराठ्यांचा नव्हता. अंधारामुळे कांहीहि दिसत नव्हतें. अंदाजाने दिसेल त्या सावलीला खान किंवा खानाचा शिपाई समजून मराठे घाव घालीत होते. मुद्दाम बायकांवर हल्ला करणें ही तर त्यांची नीतीच नव्हती. उलट शत्रूकडील बायकांचे बाबतींतहि शिवाजी किती शुद्ध आदराने वागतो याचा निर्वाळा याच वेळीं औरंगजेबाच्या दरबारांत असलेला व महाराजांचा अति कडवटपणाने द्वेष करणारा प्रख्यात तवारीखनवीस हाशिम अलीखान ऊर्फ मुहंमद हाशिम खाफीखान याने दिला आहे.[४]

वरील बड्या लोकांशिवाय लाल महालांत आचारी, नोकरचाकर व खोजे लोक किती मेले याची दखल कोण घेणार?

खुद्द महाराजांच्या भवानी घावाखाली नवाब शाइस्तेखानाचीं तीन बोटें साफ तुटलीं[५]. काय ही फजिती! आता उभ्या रियासतींतले लोक जन्मभर थट्टाच करीत राहणार हें त्याला स्पष्ट दिसत होतें. खरोखर खान मरायलाच हवा होता, किंवा पूर्णपणें बचावायला तरी हवा होता. मेला असता तर शहीद तरी ठरला असता. पण आता धड ना शहीद, धड ना शेर, धड ना सलामत. बावळटपणाचा शिक्का मात्र त्याच्या नांवाखाली कायमचा पडला. जगाच्या अंतापर्यंत!

एकूण या भयंकर छाप्यामुळे खानाच्या कुटुंबाची दैना उडाली. बायकांनी अतोनात शोक केला.[१]

खानाची अब्रू पार गेली. शिवाय तीन बोटें गेलीं तीं गेलींच! आता हा पराभव जन्मभर तळहातावर वागवायची वेळ आली. जेवतांना प्रत्येक घासाला आता शिवाजीची आठवण! प्रथम तर सर्वत्र बातमी पसरली की, खान ठारच झाला![६] खुद्द शिवाजीमहाराजांचीहि समजूत तशीच होती. परंतु ती खोटी ठरली.

खानाच्या छावणींत तर आश्चर्य, गडबड आणि घाबरगुंडी उडाली. आम्हां कोणालाहि थांगपत्ता लागूं न देतां हा शिवाजी आंत आलाच कसा? अन् वाड्यांत शिरलाच कसा? शिवाजी दगाबाज आहे. कपटी आहे!—धन्य! म्हणजे महाराजांनी सर्वांना विचारूनच जायला हवें होतें!

महाराजांच्या या धाडसी धुडगुसाने खानाची आणि अनेकांची तर खात्रीच झाली की, हा शिवाजी सैतानच असला पाहिजे.[१०] त्याला चेटूक येत असलें पाहिजे! त्याला नक्कीच हवें तेथे गुप्त अन् प्रकटहि होतां येत असलें पाहिजे!

लाल महालांतील दंगलींत महाराजांचेंहि नुकसान झालेंच. त्यांचीं एकूण सहा माणसें ठार झालीं आणि चाळीस मावळे मंडळी जखमी झाली.[३]

छावणींत असंख्य सरदार व एक लाखाच्यावर फौज होती तरी हें असें झालें. आणि मग असें कसें झालें याची चर्चा अन् कुजबूज सुरू झाली. अन् त्यांतून निष्कर्ष काय निघाला? तर म्हणे हें सर्व महाराजा जसवंतसिंहामुळे झालें![१] तो शिवाजीला फितूर असला पाहिजे!

—वड्याचें तेल वांग्यावर! स्वतः अजागळासारखें बेसावध झोपून राहायचें अन् शत्रु येऊन नाक कापून गेला म्हणजे कोणा तरी बड्या रजपूत सरदारावर त्याचें खापर फोडायचें अशी शाही सरदारांत वहिवाटच होती. वास्तविक जसवंतसिंहाचा खरोखरच कांही दोष नव्हता. जसवंतसिंहाच्या हाताखाली दहा हजार फौज होती तरीहि, पळून जात असलेल्या शिवाजीला त्याने कांहीहि केलें नाही![१] वास्तविक महाराज आणि त्यांचे लोक इतक्या बेमालूमपणें मोंगली सैन्याच्या बेशिस्त गर्दींत मिसळून पसार झाले की, कोणालाहि त्या रात्रीच्या अंधारांत पत्ता लागला नाही. खानाच्या लष्करांत मोंगल, पठाण, अरब, रजपूत लोक होते तसेच हजारो मराठेहि होतेच. त्यामुळे कोणचा मराठा शिवाजीचा अन् कोणता मराठा खानाचा हें कोणाच्या लक्षांत येणार? पण अखेर निष्ठेने वागणाऱ्या जसवंतसिंहावर शिक्का पडला फितुरीचा! लोक तर म्हणूं लागले की, जसवंतसिंहानेच शिवाजीला कळविलें असलें पाहिजे की, तूं असा छापा घाल![८] खानाच्या लष्करांत कांही एकटाच जसवंतसिंह नव्हता. कितीतरी खान होते. त्या खानांनी निष्ठेचे कोणते दिवे पाजळले? ते सर्वजण झोपलेलेच होते. या घटनेंत दोष कोणाचाहि असो परंतु कौतुक महाराजांचेंच. पण सर्वजण खडे फोडीत होते जसवंतसिंहाच्या नांवानेच. जसवंतसिंह शाइस्तेखानापुढे आला

तेव्हा खानाने त्याला खोचक शब्दांत फारच दोष दिला.[६]

खानाच्या कुटुंबांत बायकांची रडारड तर अतिशय चालू होती.[७] स्वाभाविकच होतें तें. फार लोक मेले होते. झालेला प्रकार इतका भयप्रद होता की, खुद्द शाइस्तेखानासारखा बहादूर मर्दहि अगदी हादरून गेला. 'शिवाजी' हें काय भयंकर गूढ आहे हें त्याला उमजेना. त्याने इतकी दहशत खाल्ली की, शिवाजीपासून जास्तींत जास्त लौकर आणि जास्तींत जास्त दूर निघून जाण्यासाठी त्याने पुण्याहून औरंगाबादेकडे कूच करण्याचें ठरविलें![७] झालेल्या फजितीची त्याला अत्यंत लाज वाटत होती.[८] त्याने कूच करण्याची तयारी सुरू केली.

महाराज सिंहगडावर होते. पण लगेच ते राजगडास गेले. ते समजत होते की, खान ठार झाला म्हणून. परंतु दोन प्रहरीं पुण्याची पक्की खबर हेरांनी आणली व महाराजांस रुजू केली की,[९]

"शास्ताखानाचीं तीन बोटें तुटोन गेलीं. उजवा हात थोटा जाहाला. वरकडहि कितेक लोक मेले. नवाब दहशत खाऊन दिल्लीस पळोन चालिला आहे!"

ही खबर ऐकून महाराजांस जरा वाईट वाटलें. खान मेला नाहीच तर एकूण! पण झालेला प्रकारहि कांही कमी किमतीचा नव्हता. मग महाराज बहूत बहूत खुशाल जाले. आणि जिजाबाईसाहेबांस म्हणाले की,[९]

"फत्ते होऊन आलों! शास्ताखानास शास्त केली. पातशाहाने नांव ठेविलें, परंतु नांव यथार्थ ठेविलें नाही! तें नांव आपण शास्त करून नांव रुजू केलें!"

महाराजांनी विनोदाने 'शास्त' (शिक्षा) शब्दावर श्लेष केला. राजगड खूष होऊन गेला. बहूत खुशाली केली. साखरा वांटल्या, भांडीं मारलीं. शिवबा, बाबाजी, कोयाजी वगैरे मुलांचा खोडकर पराक्रम

अनुक्रमांक २४४८४ वि. क्रमांक नों. दि.



पाहून आईसाहेबांना केवढें तरी कौतुक वाटलें. महाराजांनी सर्व हकीकतीचें एक पत्र स्वतः लिहून राजापुरास रावजी सोमनाथाकडे पाठविलें.[३]

शास्ताखानाने तंबू गुंढाळला. त्याने आपल्या बरोबरची कांही फौज पुण्यांतच जसवंतसिंहाच्या स्वाधीन केली व मोहीम नेटाने चालू ठेवण्याचा उपदेश करून तो पुण्याहून निघाला (दि. ८ एप्रिल १६६३). म्हणजे छापा ज्या रात्रीं पडला त्याच्या तिसऱ्याच दिवशीं.[१] तीन वर्षे पुण्यांत धुमाकूळ घालणारा खान आता तीन दिवससुद्धा येथे राहावयास तयार नव्हता! एक लाख फौजेचा हा महा मातबर सुभा बोटें फुंकीत फुंकीत औरंगाबादेकडे निघून गेला. तीन वर्षांची मोहीम मातींत गेली. महाराजांनी कमींत कमी फौजेनिशी,–अवघ्या चारशेच माणसांनिशी, कमींत कमी वेळांत,–फार तर एक तासांतच, जास्तींत जास्त फौज असलेल्या खानाचा संपूर्ण पराभव केला.

खानाच्या पराभवाने रामनवमीच्या आनंदांत भर पडली.

या वेळीं दिल्लीला कडक उन्हाळा होता ( एप्रिल १६६३ ). म्हणून औरंगझेब काश्मिरास निघाला होता. तो काश्मीरच्या वाटेवर असतांनाच मामांच्या फजितीची ही भयंकर कथा त्याच्यापाशी जाऊन थडकली ( दि. ८ मे १६६३ ). आणि औरंगझेब भयंकर रागावला. हें काय आहे? एवढी अफाट फौज, पैसा आणि युद्धसाहित्य मामापाशी असूनहि तीन वर्षांत कांहीच विशेष झालें नाही. आणि शेवटीं झालें काय, तर म्हणे शिवाजीने आमचीं बोटेंच तोडलीं! म्हणे तो कसा आला तेंच समजत नाही! मूर्खपणा सगळा! मूठभर डोंगरी उंदरांनी म्हणे आमच्यावर हल्ला केला! आणि आता औरंगाबादेकडे धूम पळतों आहोंत! औरंगझेबाचा अगदी तिळपापड उडाला. दिल्लीच्या चौपट उन्हाळा त्याच्या मस्तकांत रणरणूं लागला. पण आता पुण्यापासून

सहाशे कोसांवर हात चोळून काय होणार होतें? त्याची शाइस्तेखानावर इतराजी झाली. त्याने तडकाफडकी शाइस्तेखानाला फर्मान पाठविलें की, तुमची नेमणूक बंगालच्या सुभ्यावर करण्यांत आली आहे. तरी तावडतोब बंगालवर रवाना व्हा.

हें फर्मान खानाला मिळालें. त्याला फारच वाईट वाटलें. त्याने पुन्हा औरंगझेबाला अर्ज पाठविला की, मला अजून उमेद आहे! मी शिवाजीचा नक्की पराभव करीन! माझी बदली करूं नये.

यावर औरंगझेबाने स्पष्ट नकार कळविला. आता पुरें झालें! लौकर बंगालवर जा!

बंगाल–आसामची सुभेदारी म्हणजे नरकांतील नोकरी समजत असत. खुद्द औरंगझेबच म्हणत असे की, तो नरक असून तेथे खाण्यापिण्याची मात्र तरतूद आहे.[७]

अखेर दुःखी बिचारा शाइस्तेखान मान खाली घालून पावसाळ्या-नंतर निघाला (दि. १ डिसें. १६६३). तीन वर्षांपूर्वीचा त्याचा आवेश, रुबाब आणि मिजास आणि आताची अवस्था यांत फारच अंतर होतें. शिवाजी भोसला म्हणजे एक तुच्छ फोलपट समजून आपल्याच मोंगली घमेंडींत राहिल्याचें हें फळ!

शाइस्तेखानाच्या जागीं औरंगझेबाचा पुत्र शाहजादा मुअज्जम याची नेमणूक झाली होती. तो औरंगाबादेंत येऊन दाखल झाला. हे चिरंजीव म्हणजे रंगेल रंगरावच होते. खाना, पीना, मजा करना, शिकार मारना और सो जाना असा यांचा जोरदार जबरदस्त कार्यक्रम होता! या गृहस्थाची दख्खनच्या सुभ्यावर नेमणूक करणाऱ्या औरंगजेबाची तारीफ किती करावी! पुत्रप्रेमाला उपमा नाही म्हणतात!

जसवंतसिंहाला पुण्यांत ठेवण्यांत आलेलें होतें. पण काम काय करायचें हाच त्याच्यापुढे प्रश्न होता.

दा. क्र.

## भाग पांचवा

महाराजांच्यापुढे मात्र, आता काय काय करायचें हा प्रश्न पडला होता. अनेक कामगिऱ्या त्यांच्या मनांत घोळत होत्या. नुकत्याच जिंकलेल्या कोकणांत एक दौड मारून पुढच्या म्हणजे पावसाळ्या-नंतरच्या मोहिमेची आखणी करण्यासाठी महाराज राजगडावरून कोकणांत उतरले ( दि. १३ एप्रिल १६६३ ). खानावरील छाप्या-नंतर अवघ्या एकाच आठवड्यांत महाराज निघाले.[११] त्यांच्या जिवाला विश्रांति सोसवत नव्हती ! स्वराज्यासाठी अहर्निश कणाकणाने अन् क्षणाक्षणाने झिजण्यासाठीच त्यांचा जन्म होता. ध्येयाचा हिमशैल पूर्ण गाठल्याशिवाय जो कोणी आराम करील तो हराम आहे असेंच जणू ते स्वतःच्या कृतीने दाखवीत होते.

राजापुरास आतापर्यंत रावजी सोमनाथ हे अधिकारावर होते. रावजीपंतांनी गेल्या दोन वर्षांत फारच उत्तम कारभार केला होता. अनेक ठिकाणच्या राजकारणांवर पंतांची बारीक नजर असे. निरनिराळ्या ठिकाणच्या बातम्या काढून ते महाराजांस कळवीत. पंत जागे आणि चलाख होते. इंग्रज, वलंदेज, फिरंगी, सावंत, सिद्दी वगैरे कोकणकिनाऱ्यावरच्या उपद्व्यापी मंडळींवर डोळा ठेवायला रावजी सोमनाथ म्हणजे अचूक माणूस होता.

महाराजांनी कोकणांत उतरतांना दहा हजार पायदळ आणि चार हजार घोडदळ बरोबर घेतलें होतें. महाराज रावजीपंतांसह तळकोकणांत कुडाळ-कडे गेले.[१२] वाडीकर सावंत पोर्तुगिझांकडे नातें जुळवूं पाहात होते.[१३] नुकतेंच त्यांनी वेंगुर्ल्याच्या वलंदेज (डच) गोरंदोर जनरेलाला पत्र पाठवून तीस मण ( चोवीसशे पौंड ) दारूगोळा विकत मागितला होता. कशा-करिता ? शिवाजीराजापासून स्वतःचें रक्षण करण्याकरिता ![१४] वलंदेजांनी सावंतांना फक्त साडेसात मणच दारूगोळा दिला.

महाराज कुडाळ प्रांतांत येत आहेत, ही बातमी समजल्यावर सर्वच

विरोधकांची व अलिप्तांचीहि गडबड उडाली. गोव्याच्या पोर्तुगाळी फिरंग्यांनाहि नम्रता व गोड स्नेहाचें महत्त्व अकस्मात् पटलें. त्यांच्या गोरंदोराचीं पत्रें महाराजास येऊं लागलीं. एका पत्रांत हा फिरंगी लिहितो : [१५]

'.......... आपण वेंगुर्ल्यास (वास्तविक कुडाळास) येऊन पोहोचला अशी वातमी समजली. मोंगलांवरील (शाइस्तेखानावरील) विजयाबद्दल आपलें अभिनंदन करण्याकरिता आमचा वकील पाठवीत आहोंत. आपला व आमचा स्नेहाचा तह व्हावा' (दि. २३ मे १६६३).

या चोरांना आता महाराजांच्या स्नेहाची जरूर वाटूं लागली. हा वकील नजराणा घेऊन निघालाहि होता. परंतु महाराजांना राजगडास पावसाळ्याआधी परतण्याची ओढ होती. त्यामुळे त्याची व महाराजांची भेट घडूं शकली नाही.

वेंगुर्ल्याला वलंदेजांची व्यापारी वखार होती. महाराज येत आहेत हें समजल्यावर त्यांचीहि घाबरगुंडी उडाली.[१४] त्यांच्या रेसिडेंटाने आपला माल एका गलबतावर चढविला व कोणत्याहि क्षणीं पळून जाण्याची तयारी ठेवली. एवढ्यांत त्यांचा एक कमांडर व्हर्सप्रीट हा कांही जहाजें घेऊन वेंगुर्ला बंदरांत उतरला. त्यामुळे त्यांना जरा धीर आला. या वेळीं महाराजांनी एक जरासा गमतीचा डाव टाकून पाहिला. त्यांनी खुद्द डच वखारवाल्यांनाच एक पत्र लिहून विचारलें की, आमच्या मनांत फार इच्छा आहे की, वेंगुर्लें काबीज करावें. याबाबत आपला सल्ला काय आहे?

हें नसतेंच झेंगट गळ्यांत पडलेलें पाहून डच वखारवाले क्षणभर बावचळले. अनुकूल उत्तर द्यावें तर विजापूरकर बादशाह खवळणार अन् प्रतिकूल उत्तर द्यावें तर हा भयंकर शिवाजीच आपल्याला खाऊन

टाकणार ! शेवटीं त्यांनी उत्तर दिलें की, आम्ही व्यापारी लोक राजकारणापासून आलिप्त असतों. युद्धाच्या बाबतींत आम्ही सल्ला देऊं शकत नाही ![१४]

सध्या वेंगुर्ल्याकडे किंवा सावंतांकडे लक्ष द्यावयास महाराजांस सवड नव्हती. त्यांनी कुडाळ प्रांतावर रावजी सोमनाथांची सुभेदार म्हणून नेमणूक केली. त्यांच्यापाशी दोन हजार फौज ठेवली.[१६] व ते पुन्हा माघारीं राजगडाकडे वळले. परंतु पुढच्या मोठ्या मोहिमेची पूर्वतयारी करूनच परतले.

महाराज राजगडावर आले आणि एक भयंकर दमदाटीचें पत्र महाराजांस आलें. कुणाचें ? अफजलखानाचा मुलगा फाजलखान याचें ! विजापूरच्या बादशाहाने फाजलला चिपळूण व दाभोळ शहरें बहाल केलीं होतीं. परंतु दोन्हीहि शहरें होतीं शिवाजीच्या ताब्यांत ! म्हणजे बादशाहाने फाजलला ही नवी जहागीर देऊन त्याची थट्टा केली, की पराक्रमाला नवें रणांगण उघडें करून दिलें, कोण जाणे ! फाजलने मात्र लगेच महाराजांना पत्र पाठविलें की, ' बऱ्या बोलाने हीं शहरें सोडून द्यावीं, नाही तर प्रायश्चित्त भोगावें लागेल ! '[१७]

उंदराने नागाला दम देण्यासारखाच प्रकार होता हा ! महाराजांनी त्याची दखलहि घेतली नाही. दुबळ्यांनी कितीहि कडक खलिते पाठविले तरी त्याला कोण किंमत देणार हो ? हे असले पोकळ निषेधाचे खलिते अन् लखोटे विनोदी वाङ्मयांतच जमा व्हायचे.

पण एकंदरींत फाजलखानाला सर्व गोष्टींत अंदाज कमीच ! एखाद्या नवजवान प्रियकराच्या प्रेयसीने दुसऱ्याशी लग्न केल्यामुळे तो भग्नहृदय प्रियकर, आपल्याला पूर्वी तिच्याकडून आलेल्या प्रेमपत्रांकडे ज्या दुःखी व केविलवाण्या दृष्टीनें तासन् तास पाहात बसतो, त्याप्रमाणे बादशाहाकडून दाभोळ-चिपळूणच्या मिळालेल्या सनदांकडे फक्त

प्रेमाने व भक्तास विरहभावनेने पाहात बसण्याशिवाय फाजलखान कांहीच करूं शकला नाही.

* * *

आधारः—(१) F. B. of Sh. 197–98; शिचवृसं. ३।६८ व ६९. (२) पसासंले ९३८. (३) पसासंले ९३०. (४) शिचवृसं ३, पृ. ६६. (५) सभासदब. पृ. ३३; पसासंले. ९३०. (६) Shivaji–Times 90; शिचवृसं. ३।पृ. ६९. (७) Shivaji-Times 90. (८) पसासंले. ९३७. (९) सभासदब. पृ. ३५. (१०) Shivaji-Times 89. (११) शिचप्र. पृ. ५१. (१२) पसासंले. ९३७ व ९५९. (१३) पसासंले. ८५४ व ९४०. (१४) पसासंले ९४०. (१५) पसासंले ९३६. (१६) पसासंले ९४३ व ९४८. (१७) पसासंले ९४६.

## बहिर्जी नाईक

## * * आणि * * * * * * * * १० * *

## मोंगलांची सुरत



महाराजांना मात्र आता उसंत नव्हती. शाइस्तेखानाने केलेली स्वराज्याची नुकसानी त्यांना बेचैन करीत होती. ती कशी भरून काढायची या चिंतेंत ते व्यग्र होते. राजगडाच्या तटावरून त्यांची नजर पश्चिम क्षितिजाच्या पलीकडे जात होती. कोकणच्या किनाऱ्यावर कडवाडपासून दमणगंगेपर्यंत आपली आनिर्बंध हुकमत असली पाहिजे ह्यासाठी ते तगमगत होते.[1] त्यासाठी जबरदस्त जंजिरे आणि बलाढ्य आरमार असायला हवें होतें. पण हें उभें करायचें म्हणजे कणगीभर मोहरा हव्या होत्या. कोटि रुपयांची रास ओतल्याशिवाय जंजिऱ्याची भिंत उभी राहूं शकणार नव्हती. पंचवीस हजारांचा तोडा झेलत झेलत खर्चिल्याशिवाय नवीन लढाऊ गलबतें बांधतां येत नव्हतीं. महाराजांच्या खजिन्यांत एवढा पैसा होता कुठे ?

वैशाखाचें उन्ह जमीन आणि डोंगर भाजून काढीत होतें. नव्या आकांक्षांना मोहर येण्यासाठी पैशाचा ओलावा हवा होता. महाराज राजगडच्या तटावर चिंतामग्न अवस्थेंत शतपावली करीत होते.

पावसाळा सुरू झाला. पर्जन्यराजाकरिता आसुसलेली धरणी संतुष्ट झाली. चार महिने पर्जन्यराजाने धरणीला हसवलें, खेळवलें, सगळे लाड पुरविले अन् एके दिवशीं इंद्रधनुष्याची अंगठी त्या भोळ्या-भाबड्या मुलीच्या बोटांत घालून पर्जन्यराजा दुष्यंतासारखा निघून गेला.

नवरात्र बसलें. प्रतापगडावरची महाराजांची तुळजाभवानी नऊ रात्र जागत होती. महाराजांच्या हृदयस्थानीं तिने जागरण मांडलें

होतें. प्रेरणा तेथून होती. शक्ति तेथे होती. यश तेथे होतें. स्वराज्याच्या कार्यसिद्धीच्या चिंतनाची झांज-संबळ महाराजांच्या डोक्यांत नऊ रात्र सारखी वाजत होती. देवघरांत जगदंबेच्या शेजारींच महाराजांची यशोदायिनी समशेर उभी होती.

नव्या मोहिमेचे मनसुबे महाराजांच्या मनाची मंजुरी मिळविण्यासाठी खोळंबले होते. पूर्ण विचार करून महाराजांनी मनसुबा पक्का केला आणि नव्या वर्षीच्या पहिल्या शिलंगणाचा मान त्यांनी दिला बहिर्जी नाईक जाधवास.[२] या वर्षीच्या शिलंगणांतून महाराजांना खरोखरच हंडे हंडे भरून सोनें हवें होतें. स्वराज्याच्या संरक्षणासाठी हवें होतें. त्या सोन्याचा अचूक शोध घेण्यासाठी या आपल्या हेराची निवड महाराजांनी केली. त्याला सर्व ईर्षा-इषारती सांगितल्या.

आणि बहिर्जी नाईक निघाला.

नव्या मोहिमेचा पहिला नारळ फोडायचा मान महाराजांनी बहिर्जीला दिला होता. एका मोठ्या कामगिरीचा टिळा आपल्या भाळीं लागला या आनंदांत तो होता. पण जबाबदारीची जाणीवहि त्याला होती. परंतु काळजी मात्र वाटत नव्हती. तो काळजी करीत नसे. काळजीने वागत असे.

बहिर्जी म्हणजे हजार गुणांचा खंडोबा. सोंगें आणि वतावण्या तो फारच बेमालूमपणें करीत असे. मोठा हुन्नरबाज. हजरजबाबी. पक्का बनेल.

पण हें सारें स्वराज्याकरिता. सारें कांही महाराजांकरिता. महाराजांच्या अलीकडे त्याची कुणावर माया नव्हती अन् महाराजांच्या पलीकडे त्याच्यावर कुणाची छाया नव्हती. एकच देव,—महाराज ! पूर्वी अनेक प्रसंगीं बिनतोड हेरगिरी करून बहिर्जीने महाराजांकडून दोन्ही दोन्ही हातांची शाबासकी मिळविली होती.

आज नव्या कामगिरीचा नारळ फोडायला बहिर्जी निघाला होता.

हा नारळ वाकडातिकडा फुटतां कामा नये अन् नासका तर निघतांच कामा नये, ही जबाबदारी त्याच्या माथीं होती. कामगिरीसाठी जायचें होतें तरी किती दूर? राजगडापासून दीडशे कोस उत्तरेला! औरंगझेबाच्या क्रूर आणि बलाढ्य सत्तेच्या ऐन उजव्या दंडावर. पश्चिम किनाऱ्यावर. तिथे वसलेल्या एका अति प्रचंड, अत्यंत श्रीमंत आणि अत्यंत संरक्षित शहराची खडान्खडा माहिती हेरगिरी करून चोरून आणण्याची ही कामगिरी होती. तें शहर म्हणजे औरंगझेबाची लंका होती—सुरत! सुरत!

सुरत हें पश्चिम किनाऱ्यावरचें व्यापाराचें नाक होतें. पश्चिमेकडच्या जगाशीं सुरतेच्या बंदरांतूनच व्यापार चालत असे. मक्केचे यात्रेकरू येथूनच येत जात असत. औरंगझेबाच्या साम्राज्यांत दिल्लीच्या खालोखाल किंबहुना दिल्लीच्या तोडीचें हेंच एकमेव वैभवशाली शहर होतें.[३] येथे बळकट भुईकोट किल्ला होता. शहराला वेशी होत्या. औरंगझेबाचे पांच हजार स्वार येथे कायमचे सज्ज असत. एक सुभेदार व एक किल्लेदार सुरतेच्या रक्षणार्थ उभे असत. जगांतल्या व्यापाराच्या मोठ्यांतल्या मोठ्या घडामोडी येथे चालत. टोपीवाले इंग्रज, वलंदेज, आर्मेनी, फरांसीस, युनानी, फिरंगी वगैरे गोरे व्यापारी येथून मालाची ने-आण करीत. कांहींनी तर वखारीच थाटल्या होत्या. शिवाय इराणी, तुराणी, अरबी, हबशी, बोहरी, खोजा, यहुदी, अफगाणी, मोंगली, बलुची इत्यादि परदेशीय व्यापारी व्यापार करून येथून गलबतें भरभरून पैसा नेत होते. या सर्व लोकांनी सुरतेची पेठ गजबजलेली होती. गोऱ्या व्यापाऱ्यांकडून मोंगलांना तोफा, बंदुका व दारूगोळा मुबलक मिळत असे. औरंगझेबाला कराच्या रूपाने कोट्यवधि रुपये मिळत असत. सुरत म्हणजे औरंगझेबाच्या दारांतील पारडूं मेलेली, दुभती म्हैसच होती. सुरतेची वस्ती दोन लाख होती व सुरतेंतील

घरांची संख्या सुमारें सात हजार होती.[४]

महाराजांचें लक्ष इतक्या लांब गेलें. त्यांना सुरतेंतील संपत्ति हवी होती. स्वराज्यासाठी हवी होती. औरंगझेबाच्या फौजांनी स्वराज्याची तीन वर्षें रानडुकरासारखी नासाडी केली, त्याची भरपाई म्हणून महाराजांना सुरतेची तीन मुठी संपत्ति हवी होती. शत्रूकडून झालेल्या नुकसानीची भरपाई मागून मिळत नसते. अर्ज, विनंत्या व विनवण्या करूनहि मिळत नसते. जे सारें स्वराज्यच गिळायला बसले, ते असें कुठे कांही मागून देतील काय? म्हणून उघड उघड सूड घेऊन, छापा घालून दुष्मनाची दौलत लुटून आणावयाचा बेत महाराजांनी मांडला.

पुण्यापासून सुरतेपर्यंतचा सर्व प्रदेश मोंगली सत्तेखाली होता. म्हणजे शत्रूच्या मुलखांत दीडशे कोस आंत मुसंडी मारून सुरतेवर पोहोचायचें होतें. केवढा विलक्षण धाडसी बेत होता हा! वाटेंत मोंगलांचे किल्ले, लष्करी ठाणीं, अवघड वाटा, नद्या, डोंगर आडवे होते. तरीहि महाराजांना सुरतेची सूरत हवी होती.

एखादी मोहीम हातीं घेतली की, महाराज तिची योजनाबद्ध, शिस्तबद्ध आणि काटेकोर पूर्वतयारी केल्याशिवाय पुढचें पाऊल टाकीत नसत. याचसाठी इतक्या दूरच्या धाडसाला आधी पूर्णपणें सुरतेची माहिती असणें जरूर होतें. बहिर्जी तेवढ्यासाठी निघाला होता.

बहिर्जी सुरतेच्या मार्गाला लागला.

सुरतेच्या दक्षिण वेशीचें नांव होतें, बऱ्हाणपूर दरवाजा. भव्य अन् भक्कम. दख्खनचा राजरस्ता यांतूनच वाहात होता. शहराजवळून तापी नदी समुद्राला येऊन मिळाली होती. याच नदीच्या कांठीं पण शहराच्या अंगास टोपीकर इंग्रजांची वखार होती. तिला थोडीशी तटबंदी होती. वखारीच्या जवळच हाजी सय्यद बेग नांवाच्या कोट्यधीश व्यापाऱ्याचा

टोलेजंग वाडा होता. इंग्रजांच्या वखारीपासून थोड्याशाच दूरवर वलंदेजांची कोटबंद वखार होती. वलंदेज म्हणजे डच. या वखारीच्या जवळच बहरजी बोहरा नांवाच्या एका लक्षाधीशाची टोलेजंग इमारत होती.

सबंध सुरत शहर मोठमोठ्या बादशाही हवेल्यांनीं गजबजलेलें होतें. प्रवाशांसाठी वा व्यापारासाठी येणाऱ्या लोकांसाठी मोठमोठ्या सराया बांधलेल्या होत्या. नक्षीदार कमानींच्या खिडक्या, प्रशस्त सज्जे, मिनार आणि मेघडंबऱ्या बसवून सजविलेल्या गच्च्या, मोठ्या मोठ्या शोभिवंत दरवाजाच्या हवेल्या आणि उंच उंच जोत्यांवर मधून मधून दिसणारे मोंगली महाल यामुळे सुरत म्हणजे राजधानीच शोभत होती. अन् व्यापाऱ्यांची ती राजधानीच होती. बहरजी बोहरा, हाजी सय्यद बेग, हाजी कासम, सय्यद शहीद बेग, मुल्ला अब्दुल जाफर वगैरे लक्षाधीश व कोट्यधीश व्यापारी म्हणजे सुरतेतील बादशाहाच होते.

सुरतेतील रस्ते पहाटेपासून रात्रीचा पहिला प्रहर उलटेपर्यंत गजबजलेले असत. उंची उंची पोषाख घालून हिंडणारे अमीर, लगबगीने पावलें टाकणारे व्यापारी, घाम गाळीत ओझीं वाहणारे हमाल, पालख्या-मेणे वाहून नेतां नेतां आंत बसलेल्या मालकांच्या निमूटपणें शिव्या खाणारे गुलाम, कानावर लेखण्या आणि हातांत तांबड्या वेष्टणाच्या हिशेबी चोपड्या घेऊन गंभीर चेहऱ्याने बाजारपेठेकडे जात असलेले कारकून, विडे चघळत चकाट्या पिटणारे रंगेल जवान अन् हाजच्या यात्रेसाठी शहरांत आलेले श्रद्धावंत यात्रेकरू रहदारींतल्या विविधतेंत सामील असत.

कबुतरांचे थवेच्या थवे चौकाचौकांतून दाणे टिपतांना दिसत. श्रीमंतांनी ठेवलेल्या सार्वजनिक पाणपोयांवर सतत पाण्याची धार दिसे; तर फकिरांचे कटोरे धनधान्याने उतू जातांना दिसत.

हमरस्त्यावर तर प्रत्येक देशाचें अन् वेषाचें दर्शन होत असे. तांबड्या

रंगाने दाढी मिशा रंगवलेले गोरेपान अरब व्यापारी अंगावरचीं काळीं डगलीं सावरीत सावरीत कुजबुज करीत चाललेले असत. नाकाखालच्या मिशा काढून टाकून फक्त टोकावरच मिशा व सबंध दाढी राखणारे मोंगल मुसाफीर मालकीच्या तोऱ्याने फिरत. नखशिखान्त पांढरे कपडे घालून 'केम् छे, केम् छे' करणारे संजाणी पारशी सर्वांशींच गोड गोड बोलतांना दिसत. फक्त हनुवटीखाली कुंच्यासारखी दाढी ठेवणारे बोहरी गुजराथी भाषेंत बोलून आपण मूळचे कोण हें दाखवून देत. धोतराचा पोकळ अन् तोहि उलटा कासोटा घालून आणि पुढचा सोगा उजव्या हातीं धरून डाव्या हाताचे हातवारे करीत मोठमोठ्याने गप्पा मारीत जाणारे लोक कोण असावेत, हें सांगावेंहि लागत नसे! दहा जणांना पुरेल एवढें कापड एकट्याच्याच घोळदार लेंग्याला वापरून, वर ढगळ सदरा व मखमलीचें जाकीट घातलेले अन् गळ्यांत चांदीच्या चौकोनी ताइतांचें पेंडें घालून, कर्र कर्र चढाव वाजवीत चालणारे अगडबंब देहाचे पठाण बदाम-पिस्ते चघळतांना दिसत. वेणीचे दोन पेड घालून ते पुढे वक्षः-स्थलावर सोडणाऱ्या अन् डोक्याला चौकोनी रंगीत रुमाल बांधून निर्भय अन् निःसंकोचपणें हिंडणाऱ्या बलुची युवती दिसत. रंगाने गोरे गोरे-पान अन् घारे घारे डोळे असलेले टोपीवाले इंग्रज, तंग विजारी आणि गळ्याभोवती मोठी थोरली झालर लावलेलें खमीस घालून, पायांतलें न्यारेंच पायताण टाकटुक टाकटुक वाजवीत जातांना मधून मधून दिसत. हे टोपीवाले तर मोठे गुलहौशी. कामधाम नसलें की, हे लोक आपल्या बायलीला संगतीं घेऊन रस्त्यांतून हिंडायचे! अन् त्या बाया पण विनलाजेच्या. खुशाल भररस्त्यांत आपल्या कारभाऱ्याचा हात धरून चालायच्या! असे कितीतरी निरनिराळ्या रंगांचे, रक्तांचे, आकारांचे अन् विकारांचे लोक सुरतेंत वावरतांना दिसायचे. सुरत हें अठरापगड वस्तीचें शहर होतें.

शिवाय रस्त्यांतून घोडे, गाड्या, उंट, हत्ती, उंटावरच्या अंबाऱ्या, इंग्रजी चारचाकी फलटणी अन मेणे-पालख्या लगबगीने धावतांना दिसत. श्रीमंतांचे मेणे मोठे शानदार असत. चंदनावर हस्तिदंताचें नक्षीकाम केलेले मेणे आणि पालख्या आपल्या सुवासाने आणि सौंदर्याने लोकांचें लक्ष वेधून घेत.

सुरतेची बाजारपेठ म्हणजे इंद्राचें भांडार होतें. शेकडो दुकानें शेकडो तऱ्हेच्या मालाने गच्च भरलेलीं होतीं. डोळे दिपून जात. हिऱ्या-मोत्यांचे व्यापारी अनेक होते. त्यांचीं दुकानें नवतेजाने नवरंगांत सदैव झगमगत असत. एका मोतीवाल्या व्यापाऱ्याच्या दुकानांत अठ्ठावीस शेर वजनाच्या, एका मोठ्या आकाराच्या घवघवीत लडी होत्या. बहरजी बोहऱ्याच्या जवळ सहा पिंपें भरून जवाहीर होतें. एका व्यापाऱ्यापाशी तीस पिपें सोन्याने तुडुंब भरलेलीं होतीं. इतर मालांचा व्यापार करणाऱ्यांचीं दुकानें व तिजोऱ्या संपत्तीने ठेचून भरल्या होत्या. एका व्यापाऱ्यापाशी आठ कोटि रुपये रोख होते. मुल्ला अब्दुल जाफरचीं मालाने ठेचून भरलेलीं एकोणीस गलबतें या वेळीं बंदरांत उभीं होतीं. कापडचोपड, मसाल्याचे पदार्थ, केशर, कस्तुरी, चंदन, अत्तर, रेशीम, जरीचें कापड, हस्तिदंताच्या वस्तु, मिन्याचीं नक्षीदार भांडीं, गालिचे इत्यादि नाजूक साजूक मालाने कोठारें भरलेलीं होतीं. शिवाय सुंदर सुंदर बायकांच्या खरेदीविक्रीचा अन् निर्यातीचा मोठा व्यापार होता. गुलामांचा व्यापार तेजींत होता.

पण महाराजांना यांतलें कांहीहि नको होतें. त्यांना फक्त सोनें, चांदी, हिरे, माणिकमोती, पाचू, रत्नें—बस्स्. दुसऱ्या गोष्टीकडे ते ढुंकूनहि बघणार नव्हते.

या वेळीं जॉर्ज ऑक्झेंडन, व्हॉल्कार्ड इव्हर्सन, हेन्री गॅरी, अँथनी स्मिथ, निकोलस कॅलेस्ट्रॉ, हे प्रमुख युरोपियन व्यापारी किंवा व्यापारी

कुंपण्यांचे प्रमुख अधिकारी सुरतेंत होते.

सुरतेंत बहिर्जी येऊन केव्हाच दाखल झाला होता. चौकाचौकांतून बाजारपेठांतून, दुकानादुकानांतून, व्यापाऱ्यांच्या अड्ड्याअड्ड्यांतून, जकातचौक्यांतून, बंदरावरून तो तीक्ष्ण नजर टाकीत आणि तिखट कान टवकारून फिरत होता. जास्तींत जास्त लग्गा कुठे हातीं लागेल, कोणत्या भागांत किती लोक प्रथम घुसायला हवेत, कोणत्या भागांत जाण्याचेंहि कारण नाही, पक्क्या चिरेबंदी इमारती कोणत्या, त्यांत घुसायला वाटा कोणत्या, तेलांचे व्यापारी कुठे राहतात, लूट कुठे गोळा करणें सोयीचें जाईल इत्यादि हजार गोष्टींची तो निरखणी करींत होता. प्रत्येक बारीकसारीक गोष्टीपासून तों सर्वांत गडगंज धनवानांच्या मानगुट्या कशा पकडतां येतील येथपर्यंतच्या सर्व गोष्टींचा डाव तो मनांत मांडीत होता.

या वेळीं सुरतेंत एक हजार घोडेस्वार होते. वास्तविक पांच हजार मोंगल फौज असणार, अशी महाराजांची व बहिर्जीची कल्पना होती. पण प्रत्यक्षांत फक्त एकच हजार फौज होती. मग बाकीची चार हजार फौज गेली कुठे? तर ती सुरतेच्या सुभेदाराच्या पोटांत गेली! म्हणजे? म्हणजे असें की, सुभेदारसाहेब बादशाहाकडून पांच हजार फौजेचा तनखा मिळवीत अन् प्रत्यक्षांत एक हजार फौज ठेवीत! बाकीचा तनखा पोटांत! सुभेदारसाहेब मोठे हुशार होते. त्यांनी असा विचार केला की, सुरतेच्या एका दिशेला अथांग समुद्र आणि इतर तीनहि दिशांना शेकडो कोस आपलेंच मोंगली साम्राज्य पसरलेलें असल्यावर सुरतेकडे कोण वाकड्या नजरेने बघतो?

—शिवाजी बघतो! त्याचा तिसरा डोळा आत्ताच फिरत होता सुरतेमधून. किल्ल्याचे तट व बुरूज उंच व बळकट होते. किल्ल्याला स्वतंत्र किल्लेदार होता. पण सुरतेचा सर्व अम्मल सुभेदाराच्या हातीं

होता. सुभेदार अगदीच गाफील व दिखाऊ कर्तबगारीचा होता. जसा तो तशीच त्याची फौज. ह्या सुभेदाराचें नांव होतें इनायतखान. सुरतेंत लक्ष्मी राहात होती. हा खान तिचा सख्खा भाऊ होता! शंख!!

महाराजांच्या तिसऱ्या डोळ्याला जें जें दिसत होतें अन् समजत होतें, तें अगदी फायद्याचेंच होतें. सर्व श्रीमंत लोक, त्यांचे वाडे, दुकानें आणि कोठारें किल्ल्याच्याच बाहेर शहरांत होतीं. ही केवढी सोयीची गोष्ट होती! सुभेदारापाशी तोफा होत्या, पण सर्व किल्ल्याच्या तटावर होत्या.

समुद्रकिनाऱ्याचे दोन भाग होते. एक खुद्द सुरतेचें जंगी बंदर व दुसरा म्हणजे नदीपलीकडची स्वालीची गोदी. सुरतेच्या बंदरांत इनायतखानाचें वा दुसऱ्या कोणाचेंहि एकहि लढाऊ गलबत नव्हतें.

इंग्रज व वलंदेज यांच्या वखारींना तटबंदी होती व तेथे किरकोळ चार-दोन तोफांचीं तोंडेंहि वरून डोकावतांना दिसत. या दोन्ही गोऱ्या टोपीवाल्यांपाशी सैन्य असें मुळींच नव्हतें. त्यांचे व्यापारीच एकूण संख्येने सुमारें शंभर-सव्वाशे होते. त्यांत आणखी दीडशे एक काळे शिपाई त्यांनी नोकरीस ठेवलेले होते. सुरतेंत जर टणक खडक कुठे असेल तर तो या गोऱ्या टोपीवाल्यांच्या वखारीशींच होता. बाकी सर्व भुसभुशीत जमीन होती. त्यांतल्यात्यांत इंग्रज जास्त चिवट. तेव्हा जर यांच्या वखारी लुटायच्याच ठरलें तर यांच्याशीं दोन हात करावेच लागणार होते महाराजांना.

एकूण सुरतेची सम्पत्ति रावणाच्या लंकेसारखी आणि परिस्थिति धनगराच्या मोकाट कळपासारखी होती. बहिर्जीने सुरतेची खडान्खडा माहिती हेरली, चोरली आणि तो तडक राजगडच्या वाटेला लागला. पण ही माहिती मिळवितांना बहिर्जीने केलेली वेषभूषा आणि वापरलेल्या युक्त्या इतक्या सावधपणें त्याने हाताळल्या की, त्याची नेमकी

हकीकत इतिहासालाहि त्याने कळूं दिली नाही ! याला म्हणतात गुप्त हेर !

बहिर्जी नाईक राजगडावर येऊन पोहोचला.[२] महाराज त्याची इंतजारी करीतच होते. त्याने काय खबरा आणल्या आहेत हें जाणायला ते उत्सुक होते. एकांतांत मुजरा झाला. बहिर्जीने सुरतेची खडान् खडा पोथी महाराजांपुढे वाचली आणि म्हणाला,[२]

" सुरत मारल्याने अगणित द्रव्य सापडेल ! "

सुरत म्हणजे रावणाची लंकाच. फक्त या लंकेचा रावण राहात होता सुरतेपासून तीनशे मैल लांब दिल्लींत अन् सध्या पहाऱ्यावर होता कुंभकर्ण !

महाराजांनी सुरतेचें वर्णन ऐकलें आणि त्यांचें सुरतेवर तावडतोब प्रम बसलें ! आणि त्यांनी मनसुबा पक्का केला. सुरत मारायचीच ! अशा तोलदार मनसुब्यासाठी खास जातीनेच जाण्याचें त्यांनी ठरविलें. ते मनाशीं म्हणाले की,[२] 'लष्कर चाकरी नफरी. काम मनाजोगें होणार नाही. याजकरिता जावें तरी आपण खासा लष्कर घेऊन जावें.'

बेत ठरला. तपशील ठरला. दिवस ठरला.

राजगडावर स्वारीसाठी शिबंदी जय्यत तयार झाली.

हा महिना मार्गशीर्षाचा होता. पावसाळी चातुर्मास संपून लगीन-सराइची हळद उधळूं लागली होती. मुंडावळ्या तयार होत्या. बहिर्जी मुलगी पाहून आला होता. मुलगी खूबसुरत होती. आता देवाच्या पायां पडायचें अन् घोड्यावर बसायचें. मुख्य व्याही होते बहिर्जी नाईक ! त्यांचा मान बिनीचा.

राजगडच्या नगारखान्याला इशारत झाली. दणदण नौबत दणाणूं लागली. शिंगें, ताशे कडाडूं लागले. आठ हजार निवडक स्वारांचें वऱ्हाड जमलें. कुठे जायचें, कुठलें गाव, काय नांव ? कुणालाच कांही

ठाऊक नाही. कुणीहि कांहीहि पुसत नाही.

महाराजांनी जगदंबेचें दर्शन घेतलें आणि आईसाहेबांच्या पायांवर मस्तक ठेवलें. महाराजांबरोबर नेताजी पालकरहि होताच.

आणि महाराज निघाले. मातबर पागा सांगातीं घेऊन महाराजांनी राजगड सोडला. मराठी घोडदळ मोंगलाई अमलांत दीडशे कोस आंत घुसून औरंगझेबाच्या काळजाचा लचका तोडून आणण्यास निघालें[६] (दि. ६ डिसेंबर १६५३).

आणि गमतीची गोष्ट अशी की, पुण्यांत असलेल्या मोंगली फौजेसह महाराजा जसवंतसिंहाने कोंढाणा किल्ल्यास वेढा घातला ![४] (इ. १६६३ डिसेंबर प्रारंभ)! पावसाळा संपला होता. आता कांही तरी बादशाही सेवाचाकरी केली पाहिजे, म्हणून जसवंतसिंहाने कोंढाण्याला वेढा दिला. कोंढाणा घेण्याची या सैन्यांत कितपत ऐपत आहे हें महाराजांना ठाऊक होतें. जसवंतसिंहाला मात्र कल्पनासुद्धा नव्हती की, आपल्या शेजारून, म्हणजे तीन कोसांवरून मराठी उंदरांची फौज थेट सुरतेवर चालली आहे !

प्रथम त्र्यंबकेश्वरास जाऊन तेथून जव्हारकरांच्या कोळवणांतून सुरतेवर जाण्याचा मार्ग महाराजांनी ठरविला होता.

महाराजांनी त्र्यंबकेश्वराकडे लगाम खेचला. राजगडपासून त्र्यंबकेश्वर शंभर कोस.

महाराज दिवसां मुक्काम करीत होते आणि रात्रीं प्रवास करीत होते.[५] मुक्काम पडे तोहि जंगलांतच. कोणालाहि सुगावा लागूं न देतां सुरतेंत जाऊन थडकायचें होतें. फक्त त्र्यंबकेश्वरास देवदर्शनादि गोष्टी करावयाच्या असल्यामुळे तेथे बोभाटा होण्याची शक्यता होती. परंतु तेथेहि दुसराच एक बोभाटा उडवून देण्याचा बेत त्यांनी केला होता. त्र्यंबकेश्वरावरून

आम्ही औरंगाबादेस जाणार आहोंत, स्वारी करणार आहोंत, हा तो बोभाटा !

पहिला वेध त्र्यंबकेश्वर. गोदावरीच्या उगमापाशी. नासिकच्या पश्चिमेस बारा कोसांवर.

शिवरात्र नव्हती किंवा पर्वणीहि नव्हती. पण अचानक यात्रा लोटली. पांच हजार सशस्त्र भक्तांची त्र्यंबकेश्वरास मिठी पडली. महाराज त्र्यंबकेश्वरास पोहोचले. ठण् ठण्ण ! घंटेचे निनाद अविरत गाभाऱ्यांत घणघणत राहिले. त्र्यंबकेश्वराचें आवार सशस्त्र भक्तांनी गजबजून गेलें. 'शंभो हर हर' गर्जनांचे प्रतिध्वनि गाभाऱ्यांत घुमूं लागले. त्र्यंबकेश्वर म्हणजे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक फार प्राचीन स्थान. हेमाडपंती सुंदर मंदिर. गाभाऱ्यांत काळोख, पण सारें वातावरण अत्यंत शांत, शीतल आणि सुगंधी.

महाराजांचे क्षेत्रोपाध्याय वेदशास्त्रसम्पन्न ढेरगेभटजी यांना निमंत्रिण्यांत आलें. त्यांनी सर्व पूजाविधीची सांगासिद्धता केली.

महाराजांनी नेत्र मिटून, मस्तक लववून, हात जोडले. महाराजांबरोबर सरदार मंडळी होती.

महाराज काय मागत होते देवापाशी ?—तें देवाला कळलें होतें, कळत होतें. दानवांनाहि कळून चुकलें होतें. पण महाराज ज्या समाजासाठी हें मागणें मागत होते, त्या समाजाला मात्र कळूनहि वळत नव्हतें.

षोडशोपचारपूर्वक त्र्यंबकेश्वराची महापूजा महाराजांनी केली. दानधर्म केला. उपाध्याय वेदोनारायण ढेरगेशास्त्री यांचीहि योग्य संभावना केली. या दिवशीं पौष शुद्ध द्वादशी होती (दि. ३१ डिसें. १६६३).

महाराज औरंगाबादेवर चालून जाणार ही हूल सर्वत्र पसरत गेली. थेट औरंगाबाद परगण्यापर्यंत. त्या बाजूला लोकांची धावपळ उडाली.

यामुळे मोंगलांच्या औरंगाबाद छावणींतले लोक प्रतिकाराला सज्ज राहिले. कोणीहि तेथून हालला नाही. महाराजांना आडवायला सुरतेच्या वाटेवर कोणीहि आडवा आला नाही. कारण महाराज औरंगाबादेवरच येणार ही खात्री. ते सुरतेवर जातील, ही कल्पना कोणाला स्वप्नांतहि सुचली नाही.

महाराजांनी फौजेसह यात्रा पार पाडली.


यात्रा पार पडली आणि महाराजांनी फौजेस हुकूम सोडला. घटकेच्या आंत त्र्यंबकेश्वराचा परिसर रिकामा झाला.

आपल्याबरोबरचे जादा रिकामे घेतलेले घोडे घेऊन मराठी लष्कर बिनबोभाट निघून गेलें. पण लोकांना मात्र एकच माहीत होतें की, महाराज औरंगाबादेकडे गेले !

ग्रंथप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:
१२-२-५९

आधारः—(१) पसासंले. ९५८, (२) सभासदब. पृ. ६२. (३) F. B. of Sh. 73. (४) जधेशका. (५) F. B. of Sh. 198. (६) शिचप्र. पृ. ५१.

# महाराजांचा हेजीब
# ★ ★ आणि ★ ★ ★ ११ ★ ★
# सुभेदार इनायतखान



त्र्यंबकेश्वराच्या उत्तरांगाची खिंड आणि घाट उतरून महाराज कोळवणांत म्हणजे जव्हारकर कोळी राजाच्या मुलखांत उतरले. परंतु रातोरात प्रवास अन् दिवसां अरण्यांत मुक्काम पडत असल्यामुळे बोभाटा होत नव्हता. बोभाटा उडाला होता शाहजादा मुअज्जमच्या डोक्यांत! तो औरंगाबादेस नुकताच सुभेदार म्हणून आला होता. शिवाजी चालून येणार म्हणून गडबड उडाली होती. पिंजरे लावून उंदीर येण्याची वाट पाहात होता तो! परंतु उंदीर मात्र धावत होते सुरती बर्फीच्या दिशेने!

महाराजांनी कोळवण ओलांडलें.[1] महाराजांच्याहि पुढे बहिर्जी दौडत होता. त्याच्या मागोमाग सारे. तो वाटाड्या होता. अत्यंत वेगाने फौज चालली होती.[1]

महाराजांनी दमणगंगा ओलांडली.

गुजराथची सरहद्द लागली.

महाराजांची गति वाढली. आता सुरत फक्त तीस कोस.

आणि त्र्यंबकेश्वराहून निघाल्यापासून पांचव्या दिवशीं रात्रीं महाराज घणदेवी येथे येऊन पोहोचले. येथून सुरत फक्त एक मजल. या दिवशीं तारीख होती ४ जानेवारी १६६४ सोमवार.

घणदेवींत गडबड उडाली. हें काय नवीन अरिष्ट आलें? पण महाराजांनी घणदेवीला कांहीच तोशीस दिली नाही. पण लोकांची फारच घाबरगुंडी उडाली. तिथले लोक दिङ्मूढ होऊन पाहात होते. हा कोण धटिंगण?

तारीख ५ जानेवारी १६६४, मंगळवारीं सकाळपासूनच घाबरलेल्या लोकांची धावपळ सुरू झाली. या फौजेंत शिवाजी आहे, असें लोकांत

कर्णोपकर्णी पसरलें आणि मग तर त्यांच्या जिभा टाळ्यालाच चिकटल्या!

सुरत अगदी नेहमीच्या व्यवहारांत मग्न होती. मोठी मोठी शेठमंडळी नेहमीच्या निर्धास्तपणाने सौदे करीत होती. रस्ते नेहमीप्रमाणेच गजबजलेले व मजेंत होते. बाजारपेठेंतल्या तागड्या रोजच्याप्रमाणे खालीवर जात होत्या. सराफकट्टयावरच्या नाजूक तराजूंत लक्ष्मी हळूच आपलें पाउल टाकीत होती.

वलंदेजांच्या वखारींतला माल अगदी निर्धास्तपणें वखारीच्या बाहेर पडला होता. त्यावरचें रंगकाम चालू होतें. रंगारी संथपणें काम करीत होते.

सरायांत नवे नवे पाहुणे आलेले होते. त्यांत ॲबिसिनियाच्या बादशाहाकडून, औरंगझेबाकडे जाण्यासाठी एक हबशी वकील येऊन उतरला होता. त्याने औरंगझेबासाठी मौल्यवान् उंची नजराणा आणलेला होता.

इनायतखान शहरांत आपल्या कोतवालींत होता. त्याचें घोडदळ तेथेच होतें. त्याच्या कांहीहि ध्यानींमनीं नव्हतें.

घणदेवीस महाराजांनी मुद्दामच लोकांस सांगावयास सुरवात केली की, आम्ही औरंगझेबाचेच सरदार आहोंत व ही फौज घेऊन महाबतखानाच्या बोलवण्यावरून अहमदाबादेला व तेथून पट्टणचें बंड मोडण्यासाठी जाणार आहोंत! तेव्हा लोकांना जरा बरें वाटलें!

मंगळवारीं (५–१–६४) सकाळीं सुमारें दहा वाजतां सुरतेत पहिली आरोळी येऊन धडकली! कांही लोकांनी घाबऱ्या घाबऱ्या इनायतखानाच्या हवेलीकडे धाव घेतली व त्याची भेट घेऊन घाम पुशीत पुशीत त्याला पुण्याकडचा तो भयंकर शिवाजी घणदेवीपाशी फौज घेऊन आला आहे, अशी बातमी दिली. ही बातमी ऐकून इनायतखान मनसोक्त हसला! खानाला हसूंच आवरेना.

शिवाजी इकडे इतक्या लांब येईल ही कल्पनाच त्याला हास्यास्पद वाटली !

एवढयांत रस्त्यावरून लोक कुजबुज कुजबुज करूं लागले !

महाराज घणदेवीहून फौजेसह निघाले व सुरतेच्या अलीकडे फक्त सव्वादोन कोसांवर असलेल्या उटना या गावीं येऊन पोहोचले.

आता मात्र सुरतेच्या रस्त्यावरून लोक पिसाटासारखे ओरडत धावत सुटले. शिवाजी आया! आया ! एकच गोंधळ उडाला. विशेषतः पैसेवाल्या मंडळींत. शिवाजी ? मारी ऽऽ बाप ! मरी गयो रे बालाजी ! लोकांनी डोळे पांढरे करून आरोळ्या ठोकल्या. शेठ आणि शेठाण्या पोरें काखेला मारून पळत सुटल्या. एकदम भयंकर वादळ सुटल्यासारखी स्थिति झाली. लोक बोचकीं गाठोडीं घेऊन पळत सुटले. ही धावपळ उलट्यासुलट्या दिशांनी आणि सर्व रस्त्यांवर सुरू झाली. लोक पडत होते. टकरा होत होत्या.

तागडीचें एक पारडें दणकन् आदळलें ! सुरतेच्या बाजारपेठेंत तर हाहा:कार उडाला. शेटें व देह सावरीत मंडळी पळूं लागली. एवढी मोठी संपत्ति आता सांभाळायची कशी ? हाय रे ठाकुरजी !

या अल्ला ! या खुदा ! हमे बचाव, बचाव !

मुल्ला अब्दुल जाफर, हाजी सय्यद वेग, हाजी कासम, बहरजी बोहरा धावत सुटले ! सुरतेच्या रस्त्यांत आरडाओरडा, किंकाळ्या, रडारड, पडापड यांनी एकच गिल्ला उडाला. इनायतखानाला हें समजलें तेव्हा त्याची अगदी किंचित् धुंदी उतरली. त्याने महालांतून हें दृश्य पाहिलें. भेदरट लोकांचें त्याला हसूं आलें व रागहि आला.

महाराज उटना येथे आलेच होते. पुढच्या योजनेंत ते मग्न होते.

एवढ्यांत इनायतखानाला बातमी आली की, शिवाजी–विवाजी कोणीहि नाही. आपलाच एक मोंगल सरदार उटन्यापाशी आला

असून महाबतखानाच्या बोलावण्यावरून, तो अहमदाबादेकडे जाणार आहे! मग तर इनायतखान खूपच हसला. त्याने ताबडतोब आपला एक स्वार उटन्याकडे पिटाळला. त्याजपाशी त्याने निरोप दिला की, तुम्ही सुरतेच्या जवळ येऊं नका! लोकांत उगीचच घबराट उडाली असून लोक पळत सुटले आहेत. हें जर शहेनशाह जिल्हे इलाही (औरंगझेब) हजरतींना कळलें तर ते तुमच्यावर अशाने फार रागावतील!

हा हास्यास्पद निरोप त्या बावळट निरोप्याने महाराजांकडे येऊन सांगितला. महाराज एकदम ओरडले की, गिरफदार करा या इसमाला!

ताबडतोब त्या निरोप्याची गठडी वळली गेली. त्याची तर बोबडीच वळली.

सुरतेंत वलंदेजांनी आपला वखारीबाहेर पडलेला माल भराभरा वखारींत नेला. वलंदेजी गोरंदोराने आपलीं दोन माणसें उटन्याकडे सहज टेहळणीसाठी पाठविलीं. पाहूं तरी खरें काय आहे! शिवाजीच आहे की—? शिवाजी कशाला येईल इकडे म्हणा!

वलंदेजांचे ते दान हेर उटन्यापाशी आले. पण त्यांनी पाहाणी करण्याऐवजी त्यांचीच पाहाणी झाली! मराठी ढालाइतांच्या नजरेला ते पडतांच त्यांनी त्या हेरांना बांधून महाराजांपुढे नेलें! महाराजांनी त्यांच्याकडे पाहिलें. थोडा विचार केला आणि म्हटलें, "द्या सोडून यांना!"

दोघेहि सुटले. यांपैकी एकाने पूर्वी राजापुरावर महाराजांनी छापा घातला होता तेव्हा, महाराजांस प्रत्यक्ष पाहिलेलें होतें. त्याने महाराजांस एकदम ओळखलें! सारें भविष्य त्याला दिसूं लागलें!

हे सुटलेले हेर शहरांत गेले. त्यांनी बातमी पक्कीच आणली की, शिवाजीच आला आहे! शिवाजी! शिवाजी!

वलंदेजांनी व इंग्रजांनी जाम बंदोबस्त सुरू केला. इंग्रजांचा गोरंदोर जॉर्ज ऑक्झेंडन हा तावडतोब इनायतखानाकडे गेला. त्याने इनायतखानाला विनंती केली की, आमचा वखारींतील माल व माणसें आम्ही स्वालीच्या गोदीकडे हलवितों. तुमची परवानगी द्या.

यावर इनायतखान उफाळून म्हणाला, “ बुझदिल ! डर किस चीजका ! गर तुम्ही इस तरह शहर तर्क कर भाग जाओगें तो खल्क को हँसनेकी कोई वजह नहीं ! ”

जॉर्ज ऑक्झेंडन लगेच वखारींत गेला. या वेळीं दुपारचे अडीच वाजलेले होते. जॉर्जने स्वाली होलकडे माणूस पाठवून आपल्या लॉयल मर्चंट नांवाच्या गलबतावरच्या इंग्रज अधिकाऱ्यास कळविलें की, तावडतोब हत्यारबंद माणसें सुरतेच्या वखारींत पाठवा. त्याप्रमाणे स्वाली होलहून दहा हत्यारबंद इंग्रज वखारीकडे निघाले.

वलंदेजांनाहि सुभेदाराने असेंच दटावलें. तेव्हा वलंदेजांनीहि इंग्रजां-प्रमाणेच स्वसंरक्षणाची तयारी केली. दोघांच्याहि वखारींत खूप अंतर होतें. दोघांनीहि आपापल्या वखारीचे दरवाजे बंद करून आंतून माल रचला. तटावर तोफा चढवल्या. गार्डिंग सुरू केलें. इंग्रजांच्या वखारींत फक्त दोनशे इंग्रज व सुमारें पन्नास काळे शिपाई होते.

इनायतखानाच्या भोवती हाजी कासम, सय्यद बेग, मुल्ला जाफर, झहीद बेग, बहरजी वोहरा वगैरे अनेक व्यापारी दीनवाणे होऊन गोळा झाले होते. ते विलक्षण घाबरले होते. घामाघूम झाले होते. ते खानापाशी संरक्षण मागत होते. अद्यापहि इनायतखान आपल्याच घमेंडींत होता. फक्त आता तो हसत नव्हता !

एवढ्यांत महाराजांनी उटन्याहून आपला एक वकील सुरतेंत इनायत-खानाकडे धाडला. वकिलावरोवर महाराजांनी स्पष्ट व खणखणीत निरोप पाठविला.

वकील दौडत दौडत कांही स्वारांसह बऱ्हाणपूर दरवाजांतून शहरांत प्रवेशला. लोक घाबऱ्या मुद्रेने त्याच्याकडे टक्टका पाहात होते. वकिलाला इनायतखानापुढे नेण्यांत आले. वकिलाने महाराजांचें म्हणणें खानाला स्पष्टपणें सांगितलें व महाराजांचें पत्रहि खानास दिलें. वकील म्हणाला, "उद्या बुधवारीं आमचे महाराज सुरतेंत दाखल होतील! त्या वेळीं तुम्ही स्वतः आणि हाजी सय्यद बेग, बहरजी बोहरा व हाजी कासम या सर्वश्रेष्ठ व्यापाऱ्यांनी महाराजांस जातीने भेटून महाराजांची खंडणी ठरवावी! आणि ठरेल ती रक्कम भरण्याची तजवीज करावी! हें तुमच्याकडून न झाल्यास शहराची लूट व जाळपोळ आम्हांस करावी लागेल. मग त्याची जबाबदारी आमच्यावर नाही!"

पत्रांतहि हाच मजकूर होता. महाराजांचा हा निरोप ऐकून त्या व्यापाऱ्यांची तर कंबरच खचली. शिवाजीपुढे जातीने हजर व्हायचे? जिवंतपणीं? ना रे बापा!

महाराजांच्या वकिलाला इनायत किंवा ते तिघे व्यापारी यांच्याकडून कांहीच जवाब मिळाला नाही. निरुपायाने वकील परत फिरला.

* * *

---

**आधारः**—सुरतलुटीचे सर्व आधार शेवटीं दिले आहेत.

# सुरत शहरांत आणि शहराच्या बाहेर

## १२

सुरतेंतील धावपळ चालूच होती. जेवढें कांही बांधून घेतां येईल, तेवढें घेऊन लोक बायकापोरांसह पळत होते. तरीहि अद्याप सुरतेंत निम्याहून जास्त लोक होतेच.

शिवाजीची निव्वळ दमदाटी आहे. तो डोंगऱ्या उंदीर काय करतो? सुरत शहरांतून दंड पाहिजे म्हणे याला दंड ! कोणता दंड पाहिजे याला? सुरतेला हात लावणें म्हणजे काय एखाद्याचीं बोटें तोडण्याइतकें किंवा एखाद्याचें पोट फाडण्याइतकें सोपें आहे काय ? ती भेकड दगाबाजी इतर खानांपुढे ! इनायतखानापुढे नाही चालणार हें !–इनायतखान अजूनहि असेंच समजत होता. त्यान लगेच आपला वकील महाराजांकडे पाठविला. महाराजांची थट्टा करणारा उर्मट जवाब त्याने वकिलाबरोबर रवाना केला.

सकाळींच महाराज पुढच्या चालीकरिता तयार झाले. इनायतखानाचा कांहीच निरोप आला नाही. अखेर महाराजांनी फौजेसह सुरतेकडे कूच केलें.

एवढ्यांत इनायतखानाचा वकील आला. या वकिलाने महाराजांना इनायतखानाने सांगून पाठविलेला उर्मट सवाल सुनावला की, आपणास आमच्याकडून दंड हवा काय ? बोला, कोणता 'दंड' करूं ?

हा उर्मट जवाब ऐकतांच महाराजांनी त्या वकिलाला गिरफदार केलें व चिडून सुरतेकडे चाल केली.

उटन्याहून शिवाजी सुरतेकडे पुढे पुढे येत असल्याची खबर सुरतेंत

उठली. मोठी थोरली फौज घेऊन तो येत आहे व सुरत लुटणार आहे, ही बातमी पसरली. आणि मग सुरतेंत ‘ न भूतो न भविष्यति ’ गोंधळ उडाला. भयंकर पळापळ सुरू झाली.

अनेकांना अद्याप आपल्या दणकट वाड्यांचा विश्वास वाटत होता. घरच्या धनाची माया सुटत नव्हती. पळून जाववत नव्हतें. त्या लोकांनी धडाधड दरवाजे, माड्या, खिडक्या बंद केल्या. आंतून अडसर घातले. वाटा बंद केल्या आणि ते आंतल्या आंत खुदाचें वा देवाचें नांव घेत बसले.

इनायतखानाने व शहरांतील श्रीमंतांनी पैसा खर्चून जर अगदी सुरुवातीलाच बाहेरून सैन्य आणवलें असतें तर तें सुरतेचें थोडें फार

*—आणि खानाचा कुचेष्टेचा निरोप घेऊन वकील निघाला..—*



तरा संरक्षण करूं शकलें असतें. परंतु घमेंड हा पदार्थ दारू अन् अफू पेक्षाहि अमली आहे. श्रीमंतीच्या घमेंडींत व्यापारी वावरत होते. इनायतखान कशाची घमेंड धरीत होता कोण जाणे ! त्याच्यापाशी ना शौर्य, ना अक्कल, ना फौज. पोकळ घमेंड म्हणतात ती हीच मूर्तिमंत !

महाराज आता मात्र सुरतेकडे दौडत निघाले. ह्या वेळीं सकाळचे नऊ वाजले होते.

इनायतखानाने शहराच्या रक्षणाची कांहीहि व्यवस्था केली नव्हती. शिवाजी आपल्या धारिष्टवान् खलित्यानेच पळून जाईल, अशी खानाची समज होती ! पण शिवाजीने आपल्या वकिलालाच कैद केलें असून तो स्वतः फौजेसह सुरतेवर येतोय् हें खानाला समजतांच खानाची अकस्मात् घाबरगुंडी उडाली ! धैर्याचा बुरूज एकदमच कोसळला ! सारे बडे बडे व्यापारी आपल्याला बचावण्याकरिता त्याची मनधरणी, पायधरणी करूं लागले. तेव्हा खान गोंधळला. शिवाजीमहाराज सुरतेपासून अगदी एका हाकेवर येऊन पोहोचल्यामुळे शहरांत अक्षरशः हलकल्लोळ उडाला होता. खानाभवती व्यापाऱ्यांचा केंविलवाणा लकडा लागला होता. वाटेल तेवढे पैसे देतों पण आम्हांला वांचवा असे ते म्हणत होते. तेव्हा त्या नादान सुभेदाराने मोठमोठ्या रकमांचीं आश्वासनें घेऊन सुरतेच्या किल्ल्यांत बायकापोरांसह आश्रय देण्याचें त्यांना वचन दिलें ! केवढी कर्तव्यदक्षता ! व्यापारी आपल्या बायकापोरांसह व शक्य तेवढ्या संपत्तीसह किल्ल्याच्या दरवाजापाशी जमा झाले. इतरहि हजारो लोक किल्ल्याच्या दरवाजापुढे गोळा झाले.

एवढ्यांत सुभेदार आपल्या हजार शूर घोडेस्वारांसह भर शहरांतून दौडत दौडत किल्ल्यापाशी आला. लाच देणाऱ्या व्यापाऱ्यांनाच फक्त त्याने आंत घेतलें व किल्ल्याचे दरवाजे बंद करून टाकले ! ॲबिसिनियाचा राजकीय वकील किल्ल्याच्या दरवाजापुढे खानाला विनवीत

होता की, मला आंत घ्या. पण त्याला घेण्यांत आलें नाही. तो बिचारा पळत पळत माघारीं आपल्या सराईंत गेला. किल्ल्यांत हाजी कासम, वोहरा वगैरे सर्व होते.

इतक्यांत इंग्रजांच्या वखारीच्या बाजूने टापांचे खाडखाड् आवाज ऐकूं येऊं लागले. इंग्रज गोरंदोर जॉर्ज ऑक्झेंडन् याने दोनशे इंग्रज व पन्नास नेटिव्ह शिपायांचा याच वेळीं शहरांतून रूटमार्च काढला. हजार स्वार असलेला सुभेदार शौर्याच्या गप्पा मारतां मारतां किल्ल्यांत पळून गेला होता. अडीचशे लोक असलेला एक गोरा व्यापारी रूट-मार्च काढून आपल्या धैर्याचें प्रदर्शन करीत होता. रूटमार्च किल्ल्या-वरून परत वखारीकडे गेला.

महाराज बऱ्हाणपूर दरवाजाच्या बाहेर येऊन दाखल झाले. या वेळीं दुपारचे अकरा वाजले होते. शहरांतून कोणीच तहासाठी येत नाही, हें पाहून महाराजांनी आपल्या सरदारांस शहरांत घुसण्याचा हुकूम दिला.

मराठी स्वार शहरांत घुसले. शहरांतील सर्व रस्ते ओस पडलेले. रस्त्यावर कुत्रेंसुद्धा फिरतांना दिसत नव्हतें. एरव्ही सदैव गजबजलेले असणारे रस्ते भकास दिसत होते. कागदाचे कपटे अन् गवताच्या काड्या वाऱ्याने उडत होत्या.

स्वारांच्या हातांत भर दिवसां मशाली धडाडत होत्या. मराठ्यांच्या टोळ्यांमागून टोळ्या शहरांत घुसत होत्या. स्वार एकएका श्रीमंत व्यापाऱ्याच्या घराकडे तरवारीने खूण करीत पुढे दौडत होते. शहराच्या मध्यभागीं दणादण घाव घालून मराठ्यांनी दरवाजांचीं कुसें मोडलीं. धडाडाड़ आवाज करीत दरवाजे कोसळले. मशाली घेऊन मराठे आंत घुसले. आंतून किंकाळ्या उठत होत्या. सोन्यामोत्यांच्या थैल्या लोक गोळा करीत होते.

सुरतेच्या वेशीबाहेर असलेल्या बागेंत महाराजांकरिता एक

शामियाना उभारला होता. महाराज शामियान्यांत बसले होते. भोवती मावळे मंडळी होतीच.

भयंकर दरडावण्या व आसुडाचे तडाखे घराघरांतून ऐकूं येत होते. घराच्या श्रीमंत मालकांना मराठे मुकाट्याने धन देण्याबद्दल सांगत होते. ' नाही धन ! ' ' संपलें ! ' ' एवढेंच ! ' असें खोटें सांगूं लागले की आसुडाचे तडाखे, भाल्यांची टोचणी अन् मशालींचे चटके बसलेच ! मग भराभरा जडजवाहिरांचे डबे पुढे येत.

तिजोऱ्या धडाधड फुटत होत्या. मराठे थैल्याच्या थैल्या भरून महाराजांकडे नेत होते. प्रत्येक क्षणाला ढीग चढत होते.

मराठ्यांच्या स्वारांच्या तडाख्यांत एक गोरा इंग्रज गवसला. त्याचें नांव अँथनी स्मिथ. स्वाली होलकडून हा इंग्रजांच्या वखारीकडे येत असतां मराठ्यांनी त्याला पकडला. लगेच त्याला महाराजांकडे नेण्यांत आलें.

सरायांतून लोक उतरलेले होते. मराठ्यांनीं सरायांवर धाड घातली. पाहुणे मंडळींना साफ धुऊन काढण्यांत आलें. त्यांतच ॲबिसिनियाचा वकील सापडला. वास्तविक तो लौकरच दिल्लीला जाणार होता. त्याने नजराणाहि खूप मोठा आणला होता. मराठ्यांनी त्याला पकडून महाराजांकडे नेलें. तेथे अनेक व्यापाऱ्यांस पकडून आणलेलें होतें. सम्पत्तीच्या ठेवी मिळविण्यासाठी त्यांच्यावर साम-दंड-भेदाचे प्रयोग चालू होते. आसुडांनी बडवण्यापासून तों हात तोडण्यापर्यंत सर्व प्रकार होते. ॲबिसिनियन वकिलाने महाराजांस पाहिलें. खळाखळा थैल्याच्या थैल्या त्यांच्यापुढे येऊन पडत होत्या. हा राजा औरंगझेबाचा कट्टा शत्रु आहे हें त्या वकिलाने जाणलें. त्याने आपणांस सराईंत परत घेऊन चलण्याची विनंती मराठ्यांना केली. तो सराईंत परत आला व एका ठिकाणीं ठेवलेला, औरंगझेबासाठी हबशी बादशाहानें दिलेला खास

नजराणा त्याने बरोबर घेतला व तो महाराजांकडे आला. महाराजांच्या पुढे जाऊन त्याने तो नजराणा महाराजांसच देऊन टाकला.

त्याची महाराजांनी तावडतोब सुटका केली.

सुरतेच्या जकातघरांत अगणित जकात जमा झालेली होती. एका तुकडीने प्रथम जकातघरावर हल्ला चढविला. सारी जकात महाराजांपुढे आली. याच जकातघरापुढे इंग्रजांचा माल पडला होता. त्यांत सोनें, मोती नव्हते, तरी मराठ्यांनी त्याचा फन्ना उडविला. बहुधा ह्यांत कापड, खोबरें, काजू इत्यादि माल असावा !

मराठी धाड एका फार मोठ्या घराकडे वळली. इंग्रजांच्या वखारीच्या जवळच हाजी सय्यद बेगचें टोलेजंग घर होतें. घरांत पैसा खूप होत माणसें मात्र नव्हतीं. तीं किल्ल्यांत जाऊन बसलीं होतीं. मराठयांनी हाजीच्या घराचा दरवाजा फोडला व घर साफ लुटलें. पण मराठे इंग्रजांच्या आजिबात वाटेला गेले नाहीत. लढून ताकद खर्च करण्यापेक्षा दुसरीकडे त्यांना रग्गड धन लौकर मिळत होतें.

पण महाराजांनी मात्र खडा टाकून पाहिला. पकडून आणलेल्या अँथनी स्मिथला महाराजांनी आपले स्वार बरोबर देऊन वखारींत धाडलें व निरोप दिला की, तीन लाख रुपये खंडणी आणून द्या.

स्मिथ वखारींत गेला. जॉर्ज ऑक्झेंडनची त्याने भेट घेतली व महाराजांचा निरोप सांगितला. तेव्हा जॉर्जने सांगितलें की, ' आम्ही व्यापारी लोक; आमच्यापाशी रोख पैसा नसतो. मागत असाल तर मसाल्याचे पदार्थ देतों ! '

ही इंग्रजांची लबाडी महाराज जाणत होते. पण जर यांचा पैका काढायचा म्हटलें तर चिमूटभर पैक्याकरिता माणसें व महत्त्वाचा वेळ खर्चावा लागेल, हें महाराजांस दिसत होतें. इंग्रजांपाशी सहा तोफा व अडीचशे बंदुका सज्ज होत्या. तीच गोष्ट वलंदेजांची. आपण लढायला

आलेलों नाहीं; पैका न्यायला आलेलों आहोंत, हें जाणूनच महाराजांनी या गोऱ्या व्यापाऱ्यांच्या नादीं लागायचें नाही, असे आपल्या लोकांस हुकूम दिलेले होते. अँथनी स्मिथला मात्र महाराजांनी सोडले नाही.

मराठे आता सबंध शहरभर पसरले होते. किल्ल्याच्या अवतीभवर्त ते खुशाल हिंडत होते. लूट आणीत होते. खान आंत लपून बसला होता. मराठ्यांच्या एका तुकडीने तर किल्ल्यावरच बंदुका घेऊन हल्ला चढवल. ते माळा लावून तटावर चढले व आंतल्या लोकांवर गोळ्या झाडूं लागले. खानापुढे नवाच प्रश्न निर्माण झाला. तेव्हा खानाने खालून तोफांचा मारा सुरू केला. मराठे तर तटावरून पळून गेले. पण खानाच्या माऱ्याने बाहेरचीं शहरांतील घरें मात्र बरींचशीं पडलीं ! हा तोफखाना खानाने रात्रभर चालू ठेवला होता ! मराठ्यांना याचा कांहींच त्रास झाला नाही.

आजच्या दिवसांत शहराच्या मध्यभागीं थोड्याशा आगी लागल्या. लूट मात्र खूप मिळाली. अनेकांना कैद करून ठेवलेलें होतें.

महाराजांचे लोक लूट करतांना स्त्रियांना, मुलांना, वृद्धांना, फकिरांना, गरिबांना, मशिदी, दर्गे, अग्याऱ्या, गाई वगैरेंना अजिबात उपसर्ग लागूं देत नव्हते.

बलंदेजांचे दोन गोरे इसम फकिराच्या वेषांत सबंध शहरभर हिंडले व महाराजांच्या तळावरहि जाऊन आले. त्यांना कोणीं धक्काहि लावला नाही. कारण ते फकीर बनले होते. त्यांनीच नंतर आपल्या वखारींत येऊन लुटीचें वर्णन केलें.

साऱ्या शहरांत मराठे धिंगाणा घालीत होते; परंतु कोणाच्याहि धार्मिक वस्तूंना, वास्तूंना किंवा व्यक्तींना ते शिवतहि नव्हते. तिकडे लक्षहि देत नव्हते. शहरांत कॅपुसीन ( Capucin ) ख्रिश्चनांचें एक मिशनरी केंद्र किंवा मठ ( Monastery ) होता. मराठे लूट करण्यासाठी या ख्रिश्चनांच्या

कॉन्व्हेंटवरून दौडत जौत येत होते. परंतु त्यांनी या मिशनला किंवा मिशनऱ्यांना किंचितहि त्रास दिला नाही. महाराजांचा तसा सक्त हुकूम होता. पहिल्याच दिवशीं ( दि. ६ जानेवारीस ) या चर्चमधील मुख्य मिशनरी रेव्हरंड फादर ॲम्ब्रॉस हा महाराजांकडे सरळ गेला. महाराजांनीहि त्याची भेट घेतली. रेव्हरंड फादरने मोठ्या कळकळीने महाराजांस विनंती केली की, सुरतेंतील आमच्या गरीब ख्रिश्चनांस आपणाकडून त्रास न व्हावा. निदान त्यांचा रक्तपात तरी न व्हावा. महाराजांना या फरांशीस मिशनऱ्यांबद्दल फार आदर वाटत होता. महाराजांनी रे. फादर ॲम्ब्रॉसला अभय दिलें आणि म्हटलें, " फरांशीस किरिस्ताव पाद्री फार चांगले लोक आहेत. त्यांना कोठल्याहि प्रकारची तोशीस हरगीज लागणार नाही. त्यांच्या किरिस्ताव लोकांनाहि तोशीस लागणार नाही. "

आणि महाराजांनी रे. फादरच्या विनंतीप्रमाणे त्यांच्या हिफाजतीची सर्व तजवीज केली. ही हकीकत मॉन्सीयर डी थिवेनो ( Thevenot ) या फ्रेंच समकालिनानेच लिहून ठेवली आहे. बर्नियरनेहि या हकीकतीची नोंद आपल्या प्रवासांत करून ठेवली आहे.

महाराजांनी गोरगरिबांना जसा त्रास दिला नाही तसाच कांही धनाढ्य लोकांनाहि मुळींच त्रास दिला नाही. एका श्रीमंत डच दलालाच्या हवेलीला मराठ्यांनी धक्कासुद्धा लावला नाही. स्वत: हा डच धनिक आता जिवंतहि नव्हता. फक्त त्याचें बाकीचें कुटुंब होतें. परंतु या दलालाने हयात असतांना खूपच दानधर्म केला होता. लोकांच्या तो अतिशय उपयोगी पडला होता. तो स्वत: ख्रिश्चन होता; परंतु त्याने मदत करतांना कधीहि ख्रिश्चन आणि बिनख्रिश्चन असा भेद केला नव्हता. या त्याच्या थोर सद्‌गुणावर लुब्ध होऊन महाराजांनी या मृत दलालाचें घर अगदी सुखरूप राखलें. महाराज लबाडांचे वैरी होते. हजार मार्गांनी धन गोळा करून बेफिकीर परक्या भावनेने जीवन

जगणाऱ्या व पैशाच्या पंखांखाली स्वार्थाचीं अंडीं उबविणाऱ्या श्रीमंत लोकांचे वैरी होते.

—इंग्रजांच्या वखारींत एक नवीनच बातमी येऊन धडकली. सुरतेच्या समुद्रांत सुखरूप उभ्या असलेल्या जहाजांची लूट करण्यासाठी शिवाजीचीं लढाऊ गलबतेंहि चालून येत आहेत अशी ही बातमी होती! इंग्रजांचीं तोंडें अधिकच गोरींमोरीं झालीं. आता काय करायचें? प्रश्नच होता. जॉर्ज ऑक्झेंडनने वखारीचा बंदोबस्त उत्कृष्ट ठेवला होता. पण बंदरांतील मालाच्या जहाजांचें काय? अर्थात् ही बातमी खोटी ठरली. पण जर खरोखरच असें आरमार चालून आलें असतें तर मात्र गोऱ्या लोकांची दाणादाण उडाली असती.

महाराजांच्या तळावर गर्दी खूप होती. लोक लूट आणीत होते. थैल्या भरल्या जात होत्या. महाराज कैद्यांकडून पैक्याच्या कबुल्या घेत होते. ते एका बाजूस उंच आसनावर बसले होते. शहाबेगम बागेपासून स्मशानापर्यंत मराठ्यांचा तळ पसरलेला होता. पण सबंध तळावर महाराजांच्या शामियान्याशिवाय एकहि तंबू नव्हता. सर्व लोक उघड्यावरच वावरत होते. महाराजांच्या शामियान्याला कनातीहि नव्हत्या.

महाराजांनी प्रत्येक गोष्ट दक्षतापूर्वक आखली होती. सुरतेच्या भोवतालीं त्यांनी आपले गुप्त हेर आल्याबरोबर पेरून ठेवले होते. जर मोंगलांची फौज येऊं लागली तर कमींत कमी एक दिवस आधीं खबर मिळाली पाहिजे म्हणून!

पहिल्या लुटींत मोठाच लाभ झालेला होता. पण मराठ्यांना एक मोठेंच घबाड एकदम मिळालें. दोन हिंदु व्यापारी तीस पिपें संपत्ति घेऊन तापी नदीच्या पलीकडे पळून जाण्याची खटपट करीत होते. तीस पिपें संपत्ति म्हणजे निव्वळ सोनें होतें. एवढें अवजड धन नदीपलीकडे न्यायचें कसें, हा प्रश्नच त्यांच्यापुढे होता. पण हा प्रश्न

तावडतोब सुटला. मराठी स्वारांच्या तें नजरेस पडलें ! तीस पिपें सोनें महाराजांपुढे येऊन दाखल झालें !

आणखी एक गोरा टोपीवाला सापडला. हा युनानचा ( ग्रीस ) रहिवासी होता. निकोलस कॅलोस्ट्रॉ हें त्याचें नांव. महाराजांपुढे त्याला नेण्यांत आलें. महाराजांनी त्याला वकील म्हणून पुन्हा एकदा इंग्रजांकडे पाठविलें. पण इंग्रजांनी मुळींच दाद लागूं दिली नाही. अगदी थोडी माणसें असूनहि दुर्दम्य आत्मविश्वास, शिस्त आणि नेत्यावरची निष्ठा जगाला काय दाखवूं शकते याचें हें उदाहरण होतें. पण महाराज इंग्रजांना भ्याले अशीहि घमेंड इंग्रज इतिहासकारांनी मारण्याचें कारण नाही. महाराज जर इंग्रजांवर खरोखरच चालून गेले असते, तर इंग्रज तासभर तरी टिकले असते की नाही, ही शंकाच आहे. महाराजांचा हेतु महाराज साधीत होते. राजापूरच्या इंग्रजांची वखार कुदळीने खणून काढून, नव्वद हजारांची लूट करून, अनेक इंग्रजांना दोन वर्षे रायगडच्या तुरुंगांत डांबून ठेवणाऱ्या शिवाजीमहाराजांना इंग्रज इतिहासकारांनी ओळखावें. शिवाजी इंग्रजांना भ्याला अशी कल्पना करून घेणें चुकीचें ठरेल.

रात्र झाली. मशाली पेटवून मराठे शहरांत धुमाकूळ घालीत होते. अहोरात्र लुटीचें काम चालू होतें. ढोल, ताशे बडवीत शहरभर मराठ्यांचा धुमाकूळ चालू होता. बंदुकांच्या फैरी झाडीत रात्रभर इंग्रज लोक मात्र वखारीच्या रक्षणासाठी जागून पहारा करीत होते. रात्रीं सुरतेच्या कोतवालाचा भाऊ सुरतेच्या किल्ल्यांतून चाळीस लोकांसह बाहेर पडला आणि इंग्रजांच्या वखारीपाशी आला. त्याने जॉर्जला विनंती केली की, आमच्या दिमतीला कांही लोक द्या. जॉर्जला ही मदत नाकारणेंहि अशक्य होतें. त्याने थोडेसे ( नेमके किती तें समजत नाही ) लोक दिले. मुळांत इंग्रजी वखारींत फक्त दोनशे पन्नासच लोक होते ! आणि

पुढे या चिमूटभर मदतीनिशी त्यां भावाने केलें काय? कांहीहि नाही !

गुरुवारीं सात जानेवारीच्या सकाळीं मराठी टोळ्या नव्या उत्साहाने लुटीस निघाल्या. आज पहिली झडप पडली बहरजी बोहराच्या राजेशाही प्रासादावर. वलंदेजांच्या वखारीजवळ बहरजीचा वाडा होता. बहरजीची संपत्ति ऐशी लाख रुपयांची होती. तो कालच किल्ल्यांत पळाला होता. मराठे बहरजीच्या वाड्यावर गेले. दरवाजा फोडून ते वाड्यांत घुसले. गडगंज दौलत मराठ्यांना मिळाली. त्यांत अठ्ठावीस शेर मोती मिळाले. ही लूट चालू असतांनाच महाराजांच्या शामियान्यांत एक विलक्षणच प्रकार घडला.

सकाळीं दहा वाजतां ही गोष्ट घडली.

महाराज लुटीच्या शामियान्यांत बसले होते. पुढे पडलेल्या लुटीची ढोबळ मानाने निवड चालली होती. कारकून याद्या करीत होते. चांदीच्या वस्तु, सोनें, हिरे, मोती व खिचडी अशा थैल्या भरण्यांत येत होत्या. नवीन भर आणून टाकणारे मराठे खळ्ळ् करीत थैल्या ओतीत होते. एका बाजूला कैद्यांच्या रांगा उभ्या होत्या. महाराजांच्या शेजारीं थोडें मागच्या बाजूस कांही मावळे तरवारी खांद्यावर धरून उभे होते. शामियान्याच्या पुढे मराठ्यांची गर्दी होती. धावपळ, आरोळ्या चालूच होत्या.

याच वेळीं सुरतेच्या किल्ल्याच्या दरवाजाची कर्रकर्र अशी हालचाल झाली. म्हणजे? दरवाजा उघडून सुभेदार सैन्यासह बाहेर येणार होता काय? नाही. तसें कांहीहि नव्हतें. दरवाजा उघडला गेला आणि एक तरुण पुरुष दरबारी वकिलाच्या पोषाखांत किल्ल्यांतून बाहेर पडला. इनायतखानाने खास आपला वकील महाराजांबरोबर वाटाघाटी करण्यासाठी सोडला !

हा तरुण वकील किल्ल्यांतून निघाला आणि महाराजांच्या खास तळावर येऊन दाखल झाला. त्याची चौकशी झाली. कोण? कुठले?

कोणाला भेटायचें आहे? काय पाहिजे आहे? त्या तरुणाने दरबारी आदवीने सांगितलें की, सुरतेच्या सुभेदाराने मला वकील म्हणून शिवाजीराजांच्या मुलाखतीस पाठविलें आहे. मला त्यांना भेटावयाचें आहे.

महाराजांच्या परवानगीने तो वकील आंत आला व महाराजांपुढे ाखल झाला. त्यांनी वकिलाची विचारपूस केली. वकील लगेच ्तरला की, इनायतखान सुभेदार यांनी आपणासाठी कांही अटी ाळविल्या आहेत.

या अटी लगेच वकिलाने महाराजांस सांगितल्या. त्या अटी काय काय होत्या तें समजत नाही. परंतु महाराजांस त्या मुळींच रुचणाऱ्या नव्हत्या. शिवाय, अटी घालणारा हा कोण? घालायच्याच झाल्या तर महाराजांनी अटी घालायच्या. भेकडासारखा लपून बसणारा सुभेदार 'अटी' कळवतो आहे हें पाहून महाराज चिडले आणि म्हणाले,

"तुमचा मालक स्वतः बायकोसारखा लपून बसला आहे आणि आम्हांला अटी कळवतोय! या अटी मान्य करायला आम्ही काय बायका आहोंत काय?"

महाराजांचें उपहासाचें बोलणें ऐकल्यावर तो वकील "महाराजसे तनहाइ में खबरे-अहेमियत् कहनी हैं।" असें म्हणत म्हणतच झटकन् पुढे आला आणि निमिषार्धांत, त्याने लपवून आणलेली कट्यार काढून एकदम महाराजांवर झडप घातली! त्याच्या कट्यारीचा रोख महाराजांच्या काळजावर होता. त्याने उगारलेली कट्यार महाराजांच्या काळजांत घुसणार–इतक्यांत विजेच्या वेगाने एका मराठ्याच्या तलवारीचा घाव खाडकन् त्या वकिलाच्यां उगारत्या हातावर बसला आणि तो दगाबाज हात कट्यारीसकट वर उडाला!

हेजिबाने भयंकर किंकाळी फोडली. तो इतक्या जोराने महाराजांच्या

अंगावर झाप टाकणार होता की, त्याचा हात तुटला तरीहि तो त्याच्या वेगामुळे महाराजांच्या अंगावर जाऊन आदळला. तुटलेल्या हातांतून भळभळा वाहणारें रक्त महाराजांच्या अंगावर पडून ते रक्तमय झाले. महाराजहि हेजिबाच्या आघाताने कलंडून बाजूला जमिनीवर पडले. एका क्षणांत सबंध शामियान्यांत भयंकर गडबड उडाली. कारकून, शिलेदार, सरदार वगैरे सर्वजण एकदम महाराजांकडे धावले. हेजिबाच्या दगाबाजीमुळे भयंकर क्रोध उसळला. महाराजांभंवतीच्या मराठ्यांनी तरवारींचे खडा खड घाव घालून त्याच्या शरीराच्या चिरफाळ्या उडवून टाकल्या. हेजिबाचें प्रेत तुकडे तुकडे होऊन रक्तांत पडलें. महाराजांस अजीबात जखम झालेली नव्हती. पण दगाबाज मारेकऱ्याच्या रक्तांत ते न्हाऊन निघाले होते.

शामियान्यांतले मराठे फारच खवळले. त्यांनी भराभर तेथे कैद करून आणलेल्या कैद्यांचींच मुंडकीं उडविण्यास सुरुवात केली. त्यामुळे आरडाओरडा, आर्त विनवण्या यांनी शामियाना दणाणून गेला. अनेकांचे हात कापले गेले. महाराज एकदम ह्या आपल्या खवळलेल्या लोकांकडे धावले व त्यांनी या कैद्यांची कत्तल थांबविली.

इनायतखानाने हा दगलबाजीचा प्रकार केल्यामुळे महाराजांचे लोक सरसहा पिसाळून गेले. शेकडो आणि हजारो मशाली पेटल्या आणि सुरतेच्या रस्त्यांतून हे मशालवाले मराठे आगी लावीत धावत सुटले गांधीलमाशांचे जणू थवेच. घरांच्या खिडक्या-दारांतून घुसून ते घरें पेटवीत सुटले. कालच्यापेक्षाहि लूट आणि आग फुगत चालली. तेलाच्या व्यापाऱ्यांचीं दुकानें फोडण्यांत आलीं. बुधलेच्या बुधले तेल रस्त्यावरून घरांच्या आगींत फेकून आगी भयंकर भडकविण्यांत आल्या. शहरांत आगीचा डोंब उसळला. लोक एकमेकांना हाका मारीत घरें फोडीत होते. लुटीत होते व लगेच आगी लावीत होते.

हाजी झहीद बेगचा वाडा साफ लुटून पेटवून देण्यांत आला. शहरांतील मोठमोठीं घरें पेटूं लागलीं. इंग्रजांच्या वखारीपाशीच झहीदचें घर होतें. मराठे ढोल वडवीत होते. ओरडत होते. मशाली घेऊन धावत होते.

शहरांत आता आगीचें राज्य होतें. जिथे आग नव्हती, त्या घरांत राठ्यांचें राज्य होतें. मराठे घराबाहेर पडतांच घरांत आग घुसत होती. रतेची स्थिति 'ट्रॉय' शहरासारखी झाली होती. प्रचंड आग !

। हाजी बेगचें घर इतकें भयंकर भडकलें की, आगीचे लोळ ढगाला ।भिडले. इंग्रजांची वखार शेजारींच होती. ते लोक मोठ्या धारिष्टाने

*खानाच्या दगाबाजीने मराठे अधिकच खवळले...*



आपल्या वखारीचें रक्षण मराठ्यांपासून करीत होते. पण एवढ्यांत वारा एकदम फोफावला व ज्वाळा फरारत इंग्रजांकडे येऊं लागल्या. या वेळीं इंग्रज अधिकारी जेवण करीत होते. ते उठतात न उठतात तोंच या ज्वाळा 'आ' करून वाऱ्यावरोबर वखारीकडे येत असल्याचें त्यांना दिसलें. शहराच्या पूर्व व उत्तर भागांत आगीने अत्यंत उग्र अवतार धारण केला होता. मोठमोठ्या इमारतींचे मजले आधार सुटून कडाड आवाज करीत कोसळत होते. इंग्रज प्रेसिडेंट सर जॉर्ज ऑक्झेंडन घाबरला व त्याने कागदपत्रांचीं दफ्तरें तरी निदान वांचवावींत म्हणून बाहेर काढलीं. पण त्याचें तकदीर शिकंदर. वाऱ्यानेच तोंड फिरविले आणि वखार वांचली.

वहरजी वोहराचा वाडा वलंदेजांचे वखारीपाशी होता. तोहि धडाधडा पेटला. हीच स्थिति वलंदेजांवर आली होती, पण तेहि अगदी असेच बचावले. शहरभर धूरच धूर पसरला होता. रस्त्यावर मराठे स्वार कैद्यांना फटके मारीत नेत होते. ओरडत होते. मशाली घेऊन दौडत होते.

महाराजांच्या शामियान्यांतील क्रोधाग्नि अजूनहि शांत झालेला नव्हता. मराठे चिडलेले होते. महाराज क्रुद्ध होते. वकिलाच्या दगाबाजीचा तो परिणाम होता. अनेक कैदी ठार झालें होते. अनेकांचे हात तुटले होते. अँथनी स्मिथला पुढे खेचण्यांत आलें. त्याचे हात तोडण्याचा हुकूम झाला. तेव्हा तो म्हणाला, "माझे हात तोडण्यापेक्षा डोकेंच कां उडवीत नाही? माझें डोकेंच उडवा!"

परंतु स्मिथचें डोकेंहि वांचलें व हातहि बचावलें. महाराजांनी त्याला ठार न करण्याचा हुकूम सोडला.

गवर पैसेवाल्यांकडून पैसे काढण्याकरिता अगदी निरुपायाने महाराजांना हे कठोर उपाय योजावे लागत होते. मोंगलांच्या भस्तवाल

बगलबच्चांना व मग्रूर सरदारांना दख्खनच्या क्रांतीची योग्य ती जरब बसविणें भागच होतें. एक एक लाख मोंगली फौज स्वराज्यावर सतत तीन तीन वर्षे अत्याचार व बलात्कार करून गरीब मराठी गावकरी शेतकऱ्यांना नागवीत, छळीत होती. त्या तीन तीन वर्षांच्या मानानें हा अगदीच मामुली, तीनच दिवस महाराज सूड घेत होते. पांच पन्नास श्रीमंतांचें आणि मोंगली कैद्यांचे हात तुटले आणि तीस पसतीस लोक ठार झाले म्हणजे अगदीच किरकोळ गोष्ट. इंग्रज इतिहासकारांनी मानवतेच्या नांवानें रडण्याचें कांहीहि कारण नाही. आणि रडायचेंच असेल तर त्यांनी स्वतःचाच इतिहास काढून पाहावा. अश्रुसिंचनासाठी त्यांना हवीं तेवढीं स्थळें त्यांत सापडतील !

शामियान्यांत कैद करून आणलेल्या नव्या-जुन्या प्रत्येकाकडून दंड व संपत्तीचा शोध मिळविण्याचा तडाखा चालूच होता. अँथनी स्मिथकडेहि महाराजांनी दंडाची मागणी केली. तेव्हा दुसऱ्या एका अर्मेनियम व्यापारी कैद्याने स्मिथबद्दल सांगितलें की, हा अगदीच सामान्य, गरीब माणूस आहे. तेव्हा महाराजांनी स्मिथकडे फक्त साडेतीनशे रुपयांची मागणी केली. ती स्मिथने मान्य करून तेवढी रक्कम मुकाटयाने भरली. अखेर त्याची सुटका झाली. या स्मिथचे कपडे अगदीच दरिद्री दर्जाचे होते. गबाळ वेषभूषेचा असा फायदा होतो !

गुरुवारच्या रात्रीं आगीचें रूप फारच भयानक दिसत होतें. दिवसां धुरामुळे सुरतेंत रात्र झाल्यासारखें वाटत होतें; तर आगीमुळे रात्रीं दिवस उगवल्यासारखें वाटत होतें. वाऱ्याच्या तालावर अग्नि तांडवनृत्य करीत होता. रात्रीच्या गहन अंधारांत सुरतेच्या आगीचें प्रतिबिंब समुद्रांत पडून लाटांवर नाचत होतें. जणू समुद्रहि पेटला होता.

शुक्रवारींहि आगीचे लोळ नव्याने उठूं लागले. लुटीला तर खंड नव्हता. लुटीच्या पहिल्या दिवसापासून थैल्या भरण्याचें काम सुरू

झालें होतें. शुक्रवारींहि तें चालूच राहिलें. रात्रीं मात्र लुटीचें काम जवळ जवळ संपत आलें; तरीहि उरलीसुरली लूट जमा होत होती व असंख्य लहानमोठीं घरें पेटत होतीं.

लुटीच्या थैल्या व पडशा एकूण तीन हजार होत्या. यांत सोनें, चांदी, हिरे, मोती, जडजवाहीरच फक्त होतें.

शनिवारच्या पहाटे महाराज सर्व सरदारांस आवरासावरीचे हुकूम देत होते. तेवढ्यांत, सुरतेच्या आसपासच्या प्रदेशांत पहिल्याच दिवशीं पिटाळलेले महाराजांचे हेर दौडत सुरतेंत आले व महाराजांपुढे दाखल झाले. हेरांनी बातमी आणली की, बादशाहाचा सरदार महाबतखान मोठ्या फौजेनिशी सुरतेवर येत आहे !

लगेच महाराजांनी आपल्या मंडळींना हुकूम दिला की, आवरा, निघण्याची तयारी करा !

बहुतेक काम संपलेंच होतें. मराठी लष्कराने येतांना आणलेल्या रिकाम्या घोड्यांवर लुटीच्या पडशा लादण्यांत आल्या.

सकाळीं सर्व लूट घेऊन फौज तयार झाली. महाराजांनी फक्त पांचशे स्वार रक्षणार्थ पिछाडीस ठेवले आणि ते सुरतेंतून फौजेसह निघाले.

उरलेल्या पांचशे स्वारांनी एकवार शहरांत जाऊन सर्व रस्त्यांवरून दौड मारली. कोळसा, राख, धूर, पडलेलीं घरें, भयप्रद भगदाडें आणि स्मशानवत् शांतता सुरतेंत शिल्लक होती. एखाद्या सुंदर युवतीच्या अर्धवट जळलेल्या प्रेतासारखी सुरतेची स्थिति दिसत होती.

सुरतेंतून निघून जाण्यापूर्वी त्या जळत असलेल्या नगरीकडे घोड्यावर बसून पाहात महाराज म्हणाले :

" कोणाशींहि आमचें व्यक्तिगत वैर नव्हतें आणि नाही. आम्हीं सुरत लुटली ती औरंगझेबाची म्हणून लुटली. औरंगझेबाने आमच्या मुलखाची सतत तीन वर्षे बर्बादी केली. कत्तली केल्या. त्याचा सूड


म्हणून आम्हीं सुरत लुटली. बरेच दिवसांची आमची मसलत आज पार पडली ! ”

महाराजांनी घोड्याला टाच मारली आणि मागोमाग मराठी लष्कर निघालें. सुरतेंत महाराजांचे गेलेले पांचशे संरक्षक स्वारहि मागोमाग दौडत निघाले.

* * *

**आधारः**—सुरत-प्रकरणांचे सर्व आधार पुढील प्रकरणाच्या अखेरीस एकत्रच दिलेले आहेत.

# महाबतखान
# * * आणि * * * १३ *
# जॉर्ज ऑक्झेंडन



महाराजांनी सुरत लुटली. महाराज प्रथम अगदी लांब उभे राहून सबंध शहराकडून मिळून मोजकी रक्कम मागत होते. त्यासाठी मुलाखतीकरिता व ही रक्कम ठरविण्याकरिता त्यांनी शहरांतील कुबेरांना बोलावणें पाठविलें होतें. तरीहि ते कोणी आले नाहीत. अखेर त्यांनी झडप घातली. या लुटींतून कोणत्याहि धर्माचा वा जातीचा श्रीमंत सुटला नाही. स्वकीय किंवा परकीय असाहि भेद करण्यांत आला नाही. औरंगझेबाला नजराणे आणि मोंगली अंमलदारांना लाच द्यावयास या श्रीमंतांजवळ पैसा असे. औरंगझेबाने लादलेला जबर जेझिया कर द्यावयासहि तेथील हिंदु लोकांपाशी पैसा असे. महाराजांना द्यावयास मात्र कोणीहि राजी नव्हता. अर्थात् लुटीशिवाय दुसरा मार्गच उरला नाही. रक्तमांस गोठून शरिरावर जशा निर्जीव किंवा बधिर गांठी याव्यात तशाच पैशाच्या गांठी सुरतेला आल्या होत्या. महाराजांनी एका फार मोठ्या कल्याणकार्यासाठी त्या गांठी कापून काढल्या. त्यांत कांही 'रोगी' दगावले! निरुपाय होता!

महाराज सुरतेची लूट घेऊन निघाले. त्र्यंबकेश्वराहून सुरतेस जितक्या वेगाने ते आले, तेवढ्या वेगाने महाराजांस माघारी जातां येईना, कारण प्रत्येक स्वारापाशी लुटीचें ओझें होतें. तरीहि जास्तींत जास्त वेगाने महाराज राजगडच्या रोखाने येत होते. पहिल्याच दिवशीं त्यांचा मुक्काम सुरतेपासून सहा कोसांवर पडला. त्यांना व फौजेला गेले चार दिवस अजीबात विश्रांति मिळालेली नव्हती. अहोरात्र लुटीची धावपळ करून सर्वच जण फार थकलेले होते.

मराठे सुरतेंतून निघून गेले. प्रचंड वादळ आलें होतें तें गेलें. पण अग्नि मात्र अद्याप सर्व ज्वालाग्राही गोष्टींची लूट करीतच होता. अजूनहि त्याचें पोट भरलें नव्हतें. आपल्या ज्वालांच्या जिभांनी तो चाटून पुसून सर्व फस्त करीत होता. सुरतेच्या रस्त्यांवरून हिंडणें अशक्य होतें. दोन्ही बाजूंनी घरांना आगी लागलेल्या होत्या, त्यांची झळ होरपळून काढीत होती. सुरतेच्या बाजूला पांखरूं फिरकेना. इतकी आग आग ! एकूण तीन हजार घरें जळत होतीं.

इतकें भयंकर तांडव गेले तीन दिवस चाललें होतें तरी सुभेदार इनायतखानाचें किल्ल्याबाहेर पडण्याचें धारिष्ट झालें नाही. इतकेंच काय, पण महाराज निघून गेल्यानंतरहि त्याला किल्ल्याबाहेर येववेना. वलंदेज व इंग्रज वखारवाल्यांनी मात्र धारिष्टाने आपल्या वखारींचा बंदोबस्त करून रक्षण केलें. इनायतखानानेहि आपल्या एक हजार घोडदळाचें रक्षण केलें !

तारीख १७ जानेवारी १६६४ या दिवशीं, म्हणजे महाराज निघून गेल्यानंतर आठव्या दिवशीं, महाबतखानाच्या हुकमतीखाली मोंगल फौज सुरतेंत येऊन दाखल झाली. महाबतखान सुरतेंत शिरला तेव्हा त्याला सुरतेचें स्वरूप इतकें भयानक दिसलें की, ही सुरत आहे हें ओळखणें अशक्य होतें. सूरत गेली होती. बदसुरत राहिली होती. बहुतेक मोठमोठे वैभवसम्पन्न वाडे राखेंत लुप्त झाले होते. उभीं राहिलेलीं भिताडें धुराने काळींठिक्कर पडलीं होतीं. घोटीव दगडांचीं जोतीं व चौथरे उष्णतेने तडकले होते. शहरांत घरेंच जाग्यावर नव्हतीं तर माणसें कोठून असणार ? मराठे निघून गेल्यामुळे क्वचित् कुणी लोक शहरांत आपलें घर शोधीत हिंडत होते. आगीने सर्व खाऊन टाकून ढेकर दिला होता. आता मधूनअधून कुठे कुठे धूर निघत होता. क्वचित् कुठे लहानसहान ज्वाळा दिसत होत्या. आकंठ मेजवानीनंतर

अग्नि आता तांबडालाल विडा चघळीत हुक्क्याचे झुरके मारीत होता !

महाबतखानाची फौज सुरतेकडे दौडतांना पाहून सुरतेंतून पळून गेलेले लोक सुरतेकडे धावत आले. लोकांच्या झुंडी शहरांत येऊं लागल्या. ती आपल्या घरादारांची राख पाहून लोकांना भयंकर चीड आली इनायतखानाची. या नादान अंमलदाराने स्वतःचा जीव फक्त भेकडासारखा लपून छपून वांचविला आणि बाकीची प्रजा असहाय स्थितींत वाऱ्यावर सोडली. 'हरामखोर ! शिवाजी मागत होता ती खंडणी देऊन टाकून कां ही हानि या नादानाने वांचविली नाही ? शांतपणें खंडणी घेऊन शिवाजी माघारी जात होता, तें मूर्खाने केलें नाही आणि कणखरपणें सुरतेच्या रक्षणाचा प्रयत्नहि केला नाही. उलट याने एक दिवस शिवाजीवर मारेकरी पाठवून आग भडकविली. प्रतिकार न करतां स्वकीयांच्या कत्तली पाहाणारे व जाळपोळी पाहात बसणारे अंमलदार तोफेच्या तोंडीं देण्याच्या लायकीचेच असतात.' अशांसारखे विचार लोकांच्या तोंडून बाहेर पडूं लागले. महाबतखानाचे स्वार शहराच्या रस्त्यारस्त्यावरून आले. इंग्रजांचा गोरंदोर सर जॉर्ज ऑक्झेंडनने लगेच वखारीचे दरवाजे उघडले. इंग्रजी निशाण वखारीवर फडकत होतें. जॉर्ज आपल्या सहकाऱ्यांसह महाबतखानाकडे भेटावयास निघाला.

शहरांत महाबतखानाची फौज आल्याची खात्री झाल्यावर सुभेदार इनायतखान सुरतेच्या किल्ल्यांतून बाहेर पडला. त्याच्याबरोबर त्याचे दुय्यम अधिकारी व त्याचा मुलगा होता. इनायतखानाला आता तोंड दाखवायला जागा नव्हती. तो आपल्या शहरांतल्या कोतवालीकडे जाऊं लागला. लोकांनी त्याला पाहिलें. लोक चिडलेले होते. लोक त्याला शिव्या देऊं लागले. थुंकूं लागले. तो निर्लज्जपणें पुढे चाललाच

अनुक्र. २८८४८ दि:
क्रमांक ... नों: दि:

होता. त्याचा मुलगा मात्र हा प्रकार पाहून बेचैन झाला. त्याला हा आपल्या बापाचा होत असलेला पाणउतारा फारच झोंबला. इनायत-खान आणखी पुढे गेला तों लोकांचा त्वेष जास्तच भडकला. लोकांनी त्याच्यावर शेणाचे गोळे फेकावयास सुरुवात केली. आता मात्र खानाचा पोरगा चवताळला. त्या पोराने आपलें धनुष्य काढलें व बाण जोडून एकदम त्या लोकांवर जोराने सोडला. लोकांतून एक आर्त किंकाळी उठली व एक बनिया माणूस उरांत घुसलेला बाण धरून जमिनीवर कोसळला. तो एक अगदी निरपराध प्राणी होता. हा चिरंजीवाचा पराक्रम ! लोकांत धावपळ झाली.

महाबतखानाकडे इनायतखान व इंग्रज टोपीवाला जॉर्ज ऑक्झेंडन आले. इनायतला महाबतखान कांहीच बोलला नाही. परंतु त्याने जॉर्जची मात्र मनःपूर्वक पाठ थोपटली. त्याचें फार कौतुक केलें. त्याने लगेच एक उत्कृष्ट घोडा, उत्तम किंमतवान पोषाख व एक अत्यंत मौल्यवान् तरवार जॉर्जला देण्यासाठी आणविली. व्यक्तिगत गौरवाचा तो झगमगाट पाहून जॉर्जलाहि फार आनंद झाला. त्याची इंग्रजी छाती अभिमानाने फुगली. ती गौरवाची देणगी पुढे येतांच जॉर्जचें इंग्रजी रक्त मेंदूकडे झपाट्याने वाहूं लागलें ! टोपीवाला लगेच नम्रपणाने म्हणाला की, मला स्वतःला हें बक्षीस नको. आम्ही व्यापारी लोक आहोंत. आमच्या देशाच्या या व्यापारी कंपनीला व्यापारी सवलती मिळाव्यात एवढीच माझी इच्छा आहे ! आम्हांला जकातीची माफी मिळावी अशी विनंती आहे.

केवढी नवलाची गोष्ट ! लाच खाऊन फितुरी करणारे नादान घरबुडवे खूपच भेटतात. पण प्रेमाने दिलेलें बक्षीसहि स्वतःकरिता न घेतां देशाच्या व्यापारी कंपनीसाठी कांहीतरी मागणारा हा टोपीवाला इंग्रज म्हणजे अगदीच अव्यवहारी ! वेडा !

जॉर्जने जकातीची माफी मागितली. परंतु माफी देण्याचा अधिकार बादशाहालाच होता. नंतर जॉर्जने एक अर्ज लिहून दिला व मोंगल अधिकाऱ्यांनी तो अर्ज बादशाह औरंगझेबाकडे पाठविला. अर्जावर त्यांनी शिफारसीहि लिहिल्या.

सुरतेच्या लुटीने मोंगल अंमलदार इतके हादरून गेले की, इतक्या भयंकर प्रसंगीं त्यांनी इंग्रजांचें कौतुक केलें नसतें तरच आश्चर्य होतें.

जॉर्ज खूष झाला. त्याने आभार मानले.

सुरतेच्या प्रचंड लुटीची खबर औरंगझेबास लाहोर येथे समजली. जानेवारीच्या सुरुवातीस नुकताच तो काश्मीरहून लाहोरास आला होता. सुरतेची राखरांगोळी झाली, सुरत साफ लुटली गेली व शहर आगीच्या भक्ष्यस्थानीं पडलें, हें त्याला समजलें. हें ऐकून औरंगझेबाच्या अंगाची आग आग आली. काय करूं अन् काय नाही हें त्याला समजेना. औरंगझेबाच्या मस्तकांतहि आग भडकली आणि तीहि भडकविली शिवाजीनेच ! त्यांतल्या त्यांत एक विशेष गम्मत म्हणजे औरंगझेब काश्मीरहून दि. ५ जानेवारी १६६४ चे सुमारास लाहोरला आला तो असा विचार करीत करीतच आला की, या शिवाजीचा एकदाचा कायमचा नायनाट करून टाकायचा ! औरंगझेब चिडला होता लाल महालावर महाराजांनी घातलेल्या छाप्याबद्दल; पण विचार करे करेपर्यंत ती गोष्ट शिळीहि झाली ! अगदी ताजी ताजी बातमी त्याच्यापुढे दाखल झाली सुरतेच्या नाशाची ! सुरतेसारख्या इतक्या दूर व संरक्षित शहरावर शिवाजी आलाच कसा, हें त्याला समजेना. वास्तविक न समजण्यासारखें त्यांत काय होतें ? एक म्हणजे लबाड व नामर्द इनायतखानाने फौजच पुरेशी ठेवली नव्हती आणि होती तिच्यासह तो लपून बसला. शहरांतील लोक तर भेदरटच होते.

शिवाजीमहाराजांच्या वेळींच हिंदुस्थानांत आलेल्या बार्थेलेमी कॅरे नांवाच्या एका युरोपीय टोपीवाल्याने सुरतेच्या लुटीसंबंधी लिहितांना म्हटलें आहे की, सुरत शहरांतील लोक इतके भेदरट होते की, रक्तपाताचा व हिंसेचा विचारसुद्धा त्यांना पेलणारा नव्हता !

कांहीहि असो, सुरतेच्या स्वारीमुळे औरंगझेब भयंकर खवळला व तो महाराजांच्या समूळ नाशाचा विचार करूं लागला. पण त्या संतप्त स्थितींतहि जेव्हा जॉर्ज ऑक्झेंडनच्या धैर्याची हकीकत त्याला समजली तेव्हा तो जॉर्जवर फार खूष झाला. त्याने जॉर्जच्या इच्छेला मान देऊन एक वर्षभर जकात माफ केली. खरोखर इंग्रजांच्या धैर्याचें कौतुक कोणीहि करीलच. इतक्या कठीण प्रसंगीं चिमूटभर इंग्रज ताठ मानेने वखारीच्या रक्षणार्थ उभे राहिले होते. महाराजांनी अनेकदा त्यांना भयंकर दमदाटीचे निरोप पाठवून पाहिले पण इंग्रज यत्किंचितहि घाबरले नाहीत. उलट जॉर्जने शेवटीं महाराजांकडे असा निरोप पाठविला की, यापुढे जर पुन्हा तुमच्याकडून निरोप घेऊन कोणीहि जासूद आला तर आम्ही त्याला ठार करूं !

अगदी एकदिलाने ते इंग्रज लोक इंग्लिश देश, इंग्लिश समाज आणि इंग्लिश कंपनी यांची प्रतिष्ठा सांभाळण्याकरिता प्राण धोक्यांत घालून उभे राहिले होते. हजारो कोसांवरून परक्या प्रचंड देशांत येऊन ऐन मृत्यूच्या दाढेंतहि हीं माणसें स्वाभिमानाने वागतात हें पाहून खरोखर अत्यंत आश्चर्य व कौतुक वाटत राहातें. या संकटांतहि त्यांची शिस्त, आज्ञांकितता, कर्तव्यतत्परता ऐक्य, स्वाभिमान वगैरे गुण ढिले पडले नाहीत. याच पिळदार वर्तनांतून राष्ट्रें मोठीं होतात. याच स्वाभिमानी व धैर्यशाली वर्तनांतून दिव्य आणि भव्य भविष्यकाल घडतो. या प्रसंगानंतर अवघ्या नव्वद वर्षांतच हेच इंग्रज याच सुरत शहराचे सत्ताधीश बनले ! यांत काळाचा महिमा वगैरे कांहीहि नव्हता. यांत

केवळ इंग्लिश लोकांच्या अमोल सद्गुणांचा महिमा होता.


महाराज झपाट्याने घाट चढून देशावर आले. महाराजांस आडवायास कोणीहि आला नाही. संपूर्ण लूट सुरक्षितपणें घाट चढली.

महाराज राजगडाकडे चालले होते. प्रत्येक स्वाराला तें गोड ओझें हलकें वाटत होतें. महाराज आता आईसाहेबांस भेटावयास आतुरले होते. संक्रांतीचा सण उलटून गेला होता. सूर्य आपल्या रथाचे सातहि घोडे उधळीत भरवेगानें आकाशांत नवें संक्रमण करीत होता.

* * *

अनुक्रमांक वि. नों: दि:
REFBK-0009870

आधार:—सुरतेच्या एकूण हकीकती पुढील साधनांतून घेतल्या आहेत : (१) पसासंले. १६६ ते १७९. (२) Foreign Biographies of Shivaji. (३) सभासदबखर ( सभासदाने सुरतेच्या दोन लुटींच्या हकीकतींची भेसळ केली आहे, ती लक्षांत घेऊन ). (४) जेधेशकावली. (५) Travels in the Mogul Empire. (६) Shivaji and his times. (७) Storio-Do-Mogore ( अगदीं थोड्या प्रमाणांत ).


मध्य महाराष्ट्र
स्वराज्य-प्रयत्नांचा प्रदेश
कल्याण
मुंबई
मिरा डोंगर
पेण
लोहगड
चाकण
विसापूर
अलिबाग
उंबरखिंड
पुणें
खेड शिवापूर
सिंहगड
सासवड
जंजिरा
रायगड
राजगड
तोरणा
पुरंधर
नीरा नदी
माणकेश्वर
भीमा नदी
महाड
बिरवाडी
जावळी
वाई
तुळजापूर
करकंब
शंभुमहादेव
महाबळेश्वर
सुवर्णदुर्ग
प्रतापगड
वेण्णा नदी
मलवडी
भोसें
शिंगणापूर
पंढरपूर
परळी
सातारा
चिपळूण परशराम
शृंगारपूर
पाटण
कोयना
कऱ्हाड
संगमेश्वर
विजापूर
रत्नागिरी
विशाळगड
राजापूर
पन्हाळा
गजापूर खिंड
कृष्णा नदी
विजयदुर्ग
नेसरी